उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन!




हार्दिक पांड्याला पाहण्यासाठी तुफान गर्दी; सामन्याचं ठिकाण बदललं!

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८७ ■ अंक : ९५ ■ नाशिक, शनिवार, दि. ६ डिसेंबर २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

# भविष्यात अडचणी आल्या, तरी तेलपुरवठा कायम सुरू राहील

## पुतिन यांनी केली थेट घोषणा; अमेरिकेसाठी मोठा धक्का

**नवी दिल्ली :**
**रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतिन दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. गुरुवारी (दि. ४) त्यांचे भारतात आगमन झाले. दरम्यान, त्यानंतर शुक्रवारी (दि. ५) पंतप्रधान नरेंद्र मोदी व रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतिन यांच्यात जवळपास दीड तास महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत रशिया आणि भारतादरम्यान अनेक करार झाले आहेत. भविष्यात कितीही अडचणी आल्या, तरी रशियाकडून भारताला तेलपुरवठा कायम सुरूळीत सुरू राहणार आहे.**

या बैठकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पुतिन यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना पंतप्रधान मोदी यांनी म्हटले की, भारत आणि रशियाच्या २३ व्या शिखर परिषदेमध्ये पुतिन यांचे स्वागत करताना मला आनंद होत आहे. भारत आणि रशियाची मैत्री अनेक ऐतिहासिक माइलस्टोनचा टप्पा पार करत असताना पुतिन यांचा हा भारत दौरा होत आहे. पुतिन यांच्या या भारत भेटीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. विशेषः अमेरिकेचे सर्वांत जास्त लक्ष पुतिन यांच्या या दौऱ्याकडे आहे.

अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लावला आहे. भारताने रशियाकडून तेलाची खरेदी करू नये, अशी त्यांची भूमिका आहे. मात्र, भारताची रशियाकडून तेलाची खरेदी सुरू आहे. त्यानंतर आता रशियाचे राष्ट्रपती पुतिन यांनी या पत्रकार परिषदेत मोठी घोषणा केली आहे. रशियाकडून भारताला कच्च्या तेलाचा पुरवठा करण्यात येत आहे. भविष्यात कितीही अडचणी आल्या, तरी तेलपुरवठा कायम सुरूळीत सुरू राहील, असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान आता हा अमेरिकेसाठी मोठा धक्का मानला जात आहे. कारण भारताने रशियाकडून तेल खरेदी करू नये, म्हणून अमेरिकेकडून दबाव निर्माण केला जात आहे. मात्र, आता पुतिन यांच्याकडून थेट मोठी घोषणा करण्यात आली आहे.

भारताने रशियाकडून तेल खरेदी करू नये, अशी अमेरिकेची भूमिका आहे. मात्र, भारताने रशियाकडून तेलाची खरेदी सुरूच ठेवली आहे, दुसरीकडे रशियानेदेखील भारताला कच्च्या तेलाच्या किमतीमध्ये प्रति बॅरलवर मोठी सूट देण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी घेतला होता, त्यानंतर आता पुतिन यांच्याकडून थेट मोठी घोषणा करण्यात आली आहे, हा डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे.



## पुतिन यांच्यासाठी विशेष डिनर; राहुल, खरगेंना आमंत्रण नाही

### काँग्रेसच्या बड्या नेत्याला निमंत्रण

**नवी दिल्ली :**
रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन भारत दौऱ्यावर आहेत. त्यांच्या सन्मानार्थ शुक्रवारी रात्री भोजनाचे आयोजन करण्यात आले. मात्र, या कार्यक्रमाला विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना निमंत्रण देण्यात आले नाही. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनाही कार्यक्रमाचे निमंत्रण नाही. परदेशातून येणाऱ्या राष्ट्रप्रमुखांना भेटण्याची परवानगी मोदी सरकार देत नाही, असा आरोप राहुल गांधी यांनी कालच केला होता. त्यानंतर शुक्रवारी महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. रशियाचे अध्यक्ष पुतिन कालच भारतात दाखल झाले. संध्याकाळी सातच्या सुमारास त्यांचे दिल्लीतील पालम विमानतळावर आगमन झाले. यानंतर शुक्रवारी (दि. ५) भारत आणि रशिया यांच्यात अनेक करार झाले. पुतिन यांच्या दौऱ्याची सांगता उद्या होणार आहे. त्याआधी त्यांच्या सन्मानार्थ शुक्रवारी रात्री भोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. मात्र, या कार्यक्रमाचे निमंत्रण काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना देण्यात आले नाही. विशेष म्हणजे, काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील खासदार शशी थरूर यांनी निमंत्रण देण्यात आले.

## युक्रेन-रशिया युद्धात भारत तटस्थ नाही

### पंतप्रधान मोदींचे युद्धावर महत्त्वाचे विधान

**नवी दिल्ली :**
रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात शुक्रवारी द्विपक्षीय संबंधांवर बैठक पार पडली. यावेळी दोन वर्षांहून अधिक काळ सुरू असलेल्या युक्रेन-रशिया युद्धावर पंतप्रधान मोदींनी भारताची भूमिका मांडली. ''भारत या युद्धात तटस्थ नाही, तर आम्ही शांततेच्या बाजूने आहोत,'' असे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केले. मी अनेक जागतिक नेत्यांशी चर्चा करत असताना आमची ही भूमिका वेळोवेळी मांडत आलो आहे, असेही ते म्हणाले.

दिल्लीतील हैदराबाद हाउसमध्ये व्लादिमीर पुतिन आणि पंतप्रधान मोदी यांच्यात बैठक झाली. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले, ''जगाने आता शांततेच्या मार्गावर परतले पाहिजे. आम्ही शांततेच्या हरेक प्रयत्नांना पाठिंबा देऊ. युक्रेन संघर्षात भारत तटस्थ नाही. भारत शांततेच्या बाजूने आहे. भारत-रशिया संबंध अधिक दृढ होऊन त्याने नवी उंची गाठायला हवी.'' पंतप्रधान मोदींच्या या भूमिकेबद्दल राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी आभार मानले.

## पुतिन यांना भगवद्गीता भेट

**नवी दिल्ली :** रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचे भारतात आगमन झाल्यावर पहिल्याच भेटीत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी त्यांना रशियन भाषेत अनुवादित भगवद्गीतेची प्रत भेट दिली.
भगवद्गीता जशी आहे तशी... या शीर्षकाची ही आवृत्ती आहे. हे सूचक यासाठी की पंतप्रधान मोदींनी पुतिन यांना सादर केलेल्या भगवद्गीतेच्या आवृत्तीवर रशियात मोठा खटला सुरू होता. सन २०११ मध्ये रशियामध्ये भगवद्गीतेवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली होती. तेव्हा भारत सरकारने तत्कालीन रशियन सरकारकडे त्याबद्दल तीव्र निषेध नोंदवला होता.

## मेक इन इंडिया मिशनला बळ मिळणार : पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली :**
रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन सध्या भारताच्या दौऱ्यावर आहेत. शुक्रवारी पुतिन यांनी दिल्लीतील हैदराबाद हाउस येथे पंतप्रधान मोदींची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांनी महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा केली. यानंतर दोन्ही देशांमध्ये वेगवेगळ्या करारांवर स्वाक्षरी झाली. या करारानंतर दोन्ही नेत्यांनी झालेल्या कराराविषयी पत्रकार परिषद घेत सविस्तर माहिती दिली.

यावेळी पंतप्रधान मोदींनी या करारामुळे दोन्ही देशांमधील आयात-निर्यात वाढणार असल्याची माहिती दिली. तसेच या करारांमुळे भारताच्या मेक इन इंडिया मिशनला बळ मिळणार असल्याचेही सांगितले. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

दोन्ही नेत्यांच्या संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, १५ वर्षांपूर्वी २०१० मध्ये दोन्ही देशांमध्ये धोरणात्मक करार झाला होता. गेल्या अडीच दशकांमध्ये राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी दोन्ही देशांतील नाते सातत्याने पुढे नेले आहे. त्यांच्या नेतृत्वात चांगल्या-वाईट अशा दोन्ही परिस्थितीत दोन्ही देशांमधील संबंध नव्या उंचीवर पोहोचले आहेत. माझे मित्र पुतिन यांचे भारताप्रति असलेल्या सकारात्मक नात्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो.' /-...५



**नाशिक गारठले : गेल्या चार-पाच दिवसांपासून तापमानात घट होत असल्याने थंडीपासून बचाव करण्यासाठी ठिकठिकाणी शेकोटीचा आधार घेतला जात आहे.**

## राज्यातील सर्व निवडणुका ३१ जानेवारीपूर्वी घ्या

### निवडणूक आयोगाला सुप्रीम कोर्टाचे निर्देश

**नवी दिल्ली :**
महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित निवडणुकांवर अखेर सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत कडक भूमिका घेत स्पष्ट आदेश दिले आहेत. राज्यातील सर्व नगरपालिका, नगरपंचायती, महानगरपालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक असल्याचे न्यायालयाने सांगितले. कोणत्याही परिस्थितीत निवडणुका पुढे ढकलल्या जाऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश देत सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेवरील




अनिश्चिततेला पूर्णविराम दिला. निवडणूक आयोगाने ३१ जानेवारीची ही मुदत पाळायला हवी, असे न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले.

दोन डिसेंबरला झालेल्या नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केले. २१ तारखेपूर्वी मतमोजणी घेण्यास न्यायालयाने स्पष्ट नकार दिला.

उच्च न्यायालयांमधील विविध याचिकांचा, प्रकरणांचा किंवा खंडपीठांच्या आदेशांचा परिणाम होऊन निवडणुका पुढे ढकलल्या जाणार नाहीत, याची विशेष खबरदारी घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

नागपूर, औरंगाबाद खंडपीठ किंवा मुंबई उच्च न्यायालय असेल, त्यांच्या कोणत्याही आदेशाचा परिणाम निवडणुका लांबण्यावर होऊ नये, असे न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले.

या मुदतीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका कोणत्याही परिस्थितीत पुढे ढकलता कामा नयेत. नगरपालिका आणि नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार आहे.सर्वोच्च न्यायालयाने मतमोजणी २१ तारखेपूर्वी करण्यास /-...५

## पान मसाला, सिगारेटवर अतिरिक्त कर; लोकसभेत विधेयक मंजूर

**नवी दिल्ली :**
संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोकसभेत आरोग्य सुरक्षेतून राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक मंजूर झालं आहे. या विधेयकाचं कायद्यात रूपांतर झाल्यावर सिगारेट, पान मसाला यांसारख्या उत्पादनांवर सरकार अतिरिक्त कर लावेल. सरकारच्या तिजोरीत जमा होणारा अतिरिक्त पैसा राष्ट्रीय सुरक्षेसाठी वापरण्यात येईल, असे सरकारकडून सांगण्यात आले आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ही माहिती शुक्रवारी लोकसभेत दिली.

विधेयक मंजूर झाल्याने पान मसालासारख्या वस्तू महाग होतील. या विधेयकावर संसदेत बराच वेळ चर्चा झाली. दोन दिवस चर्चा झाल्यानंतर विधेयक लोकसभेत मंजूर झालं. यानंतर अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी विधेयकावर भाष्य केलं. 'कारगिलमधील युद्ध तयारी कमी असल्याने झाले. लष्कराकडे केवळ ७० ते ८० टक्के हत्यारं, दारूगोळा आणि शस्त्र असल्याचे /-...५

## राज्यातील साठ हजार शाळा बंद

### राज्यभरात शिक्षकांचे आंदोलन; अधिवेशनात धरणे आंदोलनाचा इशारा

**पुणे :**
टीईटी परीक्षेच्या विरोधात शुक्रवारी (दि. ५) राज्यभर शिक्षक रस्त्यावर उतरले होते. टीईटी सक्ती आणि १५ मार्च २०२४ संच मान्यतेच्या जीआरच्या विरोधात राज्यातील शिक्षक शाळा बंद आंदोलनात सहभागी होत आहेत. मुंबईतील २०० ते ३०० च्या जवळपास मुख्यत्वे खाजगी अनुदानित शाळा बंद राहणार असल्याचा शिक्षक संघटनांचा दावा होता. राज्यभरातील जवळपास दीड हजार शाळा या बंद राहतील




अशी माहिती होती. त्यामध्ये काही विनाअनुदानित आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसुद्धा समावेश असल्याची माहिती शिक्षक संघटनांनी दिली होती.

टीईटी सक्तीमुळे शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ५३ पेक्षा कमी वय असणाऱ्या सर्व शिक्षकांना टीईटी परीक्षा देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने सक्ती केली आहे. यावर राज्य सरकारने /-...५

## सौरपंपासाठी दहा हजार कोटी मंजूर : मुख्यमंत्री फडणवीस

**छत्रपती संभाजीनगर :**
पुढील वर्षी दहा लाख सौर कृषिपंप बसवण्याचे उद्दिष्ट पूर्ण केले जाईल. शेतकऱ्यांसाठी वेगळी सौरऊर्जा तयार होत असून, एकूण १६ हजार मेगावॅट वीजनिर्मिती प्रकल्पांपैकी तीन हजार मेगावॅटचे प्रकल्प साकार झाल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सौरऊर्जेसाठी दहा हजार कोटींचे कर्ज मंजूर झाल्याची माहिती येथे दिली.



सोळा हजार मेगावॅटनिर्मिती सौरऊर्जेतून होऊन पर्यावरणाची हानी थांबणार आहे. शेतकऱ्यांना पुढील २५ वर्षे विजेचे बिल लागणार नाही. २४ तास पाणी मिळणार असल्याने तीन पिकं घेण्याची /-...५

## वृक्षतोडीविरोधात मनसेचे ॲड. पंडित यांची उच्च न्यायालयात याचिका

### भारत मंडपम्‌लाही स्थगिती देण्याची मागणी

**नाशिक : प्रतिनिधी**
**तपोवनातील साधुग्राममधील वृक्षतोडीवरून वातावरण पेटलेले असताना याविरोधात आता थेट मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर उपाध्यक्ष ॲड. नितीन पंडित यांच्याकडून शुक्रवारी (दि.५) न्यायालयात याचिका दाखल करून प्रस्तावित वृक्षतोड रद्द करावी आणि साधुग्रामच्या जागेवर मनपाने काढलेली २२० कोटींची एक्झिबेशन सेंटरची निविदा रद्दची मागणी करण्यात आली आहे.**

येत्या दोन वर्षांनी शहरात होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याकरिता महापालिका साधुग्राम येथील १,८२५ झाडे तोडण्याच्या तयारीत आहे. मात्र, या निर्णयाला स्थगिती देण्याचे निर्देश महापालिकेला देण्यात यावेत, तसेच भारत मंडपम्‌च्या निर्णयाला स्थगितीची मागणीही याचिकेद्वारे केली आहे.



दरम्यान, या याचिकेवर लवकरच सुनावणी होणार आहे. तपोवनात साधुग्राम साकारण्यासाठी महापालिकेच्या वतीने १,८२५ झाडे तोडण्याचा प्रस्ताव आहे. मात्र, यामागे वेगळेच काही कारण असण्याची शंका पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे. भारत मंडपम्‌च्या नावाखाली ही जागा ठेकेदाराला देण्याचा घाट असल्याचे बोलले जात आहे.

> **साधुग्राममधील वृक्षतोड निर्णयासह व भारत मंडपम्‌च्या निविदेला स्थगिती देण्यात यावी याकरिता शुक्रवारी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावर लवकरच सुनावणी होणार आहे.**
> **- ॲड. नितीन पंडित, उपाध्यक्ष, मनसे**

राज्य शासनाच्या पोर्टलवर साधुग्राममध्ये प्रदर्शन केंद्र उभारण्यासाठी २२० कोटींच्या निविदा मागवल्याचे स्पष्ट झाले आहे. कुंभमेळ्यादरम्यान त्यावर कोणत्याही प्रकारचे /-...५

## रिझर्व्ह बँकेने रेपो रेट घटवला, गृहकर्जाचा दर कमी होणार

**नवी दिल्ली :**
भारतीय रिझर्व्ह बँकेने मोठा निर्णय घेतला असून, व्याजदरात मोठी कपात करण्यात आली आहे. गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी रेपो दरात ०.२५ टक्क्यांची कपात जाहीर केली आहे. आरबीआयने रेपो रेटमध्ये केलेल्या कपातीमुळे गृहकर्ज आणि वाहन कर्जाच्या ईएमआयचा भार कमी होणार आहे. महागाई दर सातत्याने कमी आणि आर्थिक विकासदरात चांगली वृद्धी होत असल्याने आरबीआयने व्याजदर घटवल्याचे सांगितले जाते.




भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीने शुक्रवारी (दि. ५) नवे पतधोरण जाहीर करताना रेपो रेटमध्ये कपात करण्याची घोषणा केली. त्यानुसार रेपो रेटमध्ये ०.२५ टक्क्यांची कपात करण्यात आली आहे. त्यामुळे रेपो रेट आता ५.२५ टक्क्यांच्या पातळीवर येऊन पोहोचला आहे. रेपो रेटमध्ये ०.२५ टक्क्यांची कपात करण्याचा रिझर्व्ह बँकेचा हा निर्णय सर्वसामान्य ग्राहकांसाठी मोठा दिलासा मानला जात आहे.

## संक्षिप्त

### सारंगखेड्यात ११ लाखांची घोडी

**नंदुरबार :** जिल्ह्यातील सारंगखेडा येथील अश्वबाजारात यंदाही विविध राज्यांमधून अनेक दिव्य आणि दिमाखदार घोडे विक्रीसाठी येथे दाखल झाले आहेत. दौंडचे भाजप आमदार राहुल कुल यांचे पुत्र आदित्य कुल यांचे अश्वप्रेम यावेळी विशेष लक्षवेधी ठरले आहे. आदित्य यांनी बाजारातून तब्बल ११ लाख ११ हजार १११ रुपये देऊन नुकरा जातीची घोडी खरेदी केली आहे. जातिवंत आणि उमद्या अश्वांसाठी प्रसिद्ध असलेल्या सारंगखेडा बाजारात यंदा सुमारे २५०० घोड्यांची नोंद झाली आहे. आतापर्यंत ५० लाखांहून अधिक उलाढाल झाली आहे. युवराज, सुलतान, रुबी आणि मानसी हे घोडे यंदाही बाजारात सर्वाधिक चर्चेत असून, अश्वशौकिन त्यांना पाहण्यासाठी मोठी गर्दी करत आहेत.

### दिल्ली-मुंबई एक्स्प्रेस-वेला वेग

**नवी दिल्ली:** दिल्ली-मुंबई महामार्गाच्या सर्वांत महत्त्वाच्या टप्प्यांपैकी एकाचे काम ९४ टक्क्यांहून अधिक पूर्ण झाले आहे. हा भाग जून २०२६ पासून कार्यान्वित होणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते आणि वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी दक्षिण दिल्लीचे खासदार रामवीरसिंग बिधुरी यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना लोकसभेत दिली. देशातील सर्वांत लांब द्रुतगती मार्गाच्या पूर्णत्वाकडे जाणारा हा मोठा टप्पा ठरणार आहे. आग्रा कालव्याच्या क्रॉसिंगसाठी उत्तर प्रदेश सिंचन विभागाकडून सामान्य व्यवस्था रेखाचित्रांना मंजुरी मिळण्यात झालेला उशीर हे विलंबाचे प्रमुख कारण होते.

### मुंबईत १६ हजारांची गर्द पावडर जप्त

**मुंबई :** विक्रोळी परिसरात अमली पदार्थांची तस्करी करण्यासाठी आलेल्या एका सराईत आरोपीला विक्रोळी पोलिसांनी अटक केली. या आरोपीच्या ताब्यातून पोलिसांनी १६ हजार रुपये किमतीची गर्द पावडर जप्त केली आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. काल रात्री विक्रोळीतील टागोरनगर परिसरात पोलीस गस्त घालताना अशरफ खान (वय ४१) संशयास्पद फिरत असल्याचे पाहून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

### कोकणात खासगी बस दरीत कोसळली

**रत्नागिरी :** रत्नागिरी- नागपूर महामार्गावरील संगमेश्वर तालुक्यातील आंबा घाटातील एका वळणावर नियंत्रण सुटल्याने नेपाळी कामगारांना घेऊन येणारी खाजगी बस ७० फूट दरीत कोसळली. या अपघातात आठ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत, तर इतर सर्व प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. ११० कामगारांना घेऊन ही बस शुक्रवारी पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास कोकणात येत असताना अपघात झाला.

### शीतल तेजवानीच्या माहेरी झाडाझडती

**पुणे :** मुंढवा येथील शासकीय जमीन गैरव्यवहार प्रकरणातील मुख्य सूत्रधार शीतल तेजवानीला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. ४० एकर शासकीय महार वतन जमिनीची बनावट कागदपत्रे तयार करून ती परस्पर हस्तांतरित केल्याचा आणि मुद्रांक शुल्कात शासनाची फसवणूक आरोप शीतलवर आहे. हीच जमीन पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीला विकण्यात आली होती. अशातच शुक्रवारी शीतलच्या माहेरी पुणे पोलिसांनी झाडाझडती घेतली.

## संक्षिप्त ▸▸

### आईसह भावाला मारण्याची धमकी देत युवतीवर दोन वर्षांपासून बलात्कार

**पंचवटी : प्रतिनिधी** माझ्याकडे बंदूक आहे. तू जर माझ्यासोबत शरीरसंबंध ठेवले नाही, तर तुझ्या आई व भावाला मारून टाकीन, अशी धमकी देत युवतीवर दोन वर्षांपासून बलात्कार करण्यात आल्याची घटना पंचवटीत घडली आहे. याप्रकरणी पंचवटी पोलिसांनी कुणाल सुनील चौरे (२६, रा. सुदर्शन कॉलनी, पेठ रोड) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यातील पीडितेने दिलेल्या तक्रारीनुसार, सन २०२३ पासून हा अत्याचार सुरू होता. आरोपीने पीडितेला बंदुकीचा धाक दाखवून त्र्यंबकेश्वर येथील एका लॉजवर तसेच गंगापूर रोडवरील प्रमोद महाजन गार्डनच्या पाठीमागे नेत धमकी दिली. तसेच वेळोवेळी बळजबरीने शारीरिक संबंध करून वाईट शिवीगाळ करून पीडितेला मारहाण केली. उपनिरीक्षक सचिन चव्हाण पुढील तपास करत आहेत.

### रिक्षाचालकांच्या सन्मानासाठी पोलीस आयुक्तालयातर्फे चित्रकला स्पर्धेचे आयोजन

**पंचवटी : प्रतिनिधी** शहरातील सत्यावरील आदर्श आणि धाडसी रिक्षाचालकांना सन्मान देण्यासाठी एक विशेष चित्रकला स्पर्धेचे आयोजन नाशिक शहर पोलीस आयुक्तालयातर्फे करण्यात आले आहे. या चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन वाहतूक शाखा युनिट दोनचे पोलीस हवालदार सचिन जाधव यांनी केले आहे. चित्रकला स्पर्धेसाठी 'आदर्श रिक्षाचालक व कर्तव्यनिष्ठ रिक्षाचालक' लोगो स्पर्धा हा विषय असून, स्पर्धेत केवळ इयत्ता ५ वी ते १० वीमधील सर्व विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होणे आवश्यक आहे. चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी ५ इंच गोल आकारातील लोगो/चित्र तयार करायचा आहे. लोगोमध्ये आदर्श रिक्षाचालकाचे गुण दर्शवावेत, जसे की - प्रामाणिकपणा, शौर्य, मदतशील स्वभाव, शिस्त, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी. हा तयार केलेला लोगो नंतर शहरातील उत्तम आणि धाडसी रिक्षाचालकांना सन्मानित करण्यासाठी वापरण्यात येईल. विद्यार्थ्यांनी बनवलेले चित्र हे दि. ३१ डिसेंबर २०२५ सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालय शहर वाहतूक विभाग गंगापूर रोड या ठिकाणी जमा करावयाचे आहे. स्पर्धेतील पारितोषिके पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील. स्पर्धेतील पारितोषिकांचे प्रकार प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पुरस्कार याप्रमाणे असून, यात प्रशस्तिपत्र व स्मृतिचिन्ह देण्यात येईल. यासाठी वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार सचिन जाधव यांच्याशी ९९२३३९९४२४ यावर संपर्क साधावा.

### श्रीकांत पाटील यांची वॉलोनिया बेल्जियम ब्रॅण्ड अॅम्बेसेडरपदी निवड

**नाशिक : प्रतिनिधी** श्रीकांत पाटील यांची वॉलोनिया बेल्जियमच्या



अधिकृत प्लॅटफॉर्म वॉलोनिया बीईच्या ब्रॅण्ड अॅम्बेसेडरपदी निवड झाली आहे. नाशिकचे हे उद्योगतज्ञ, स्टार्टअप इंडिया मेंटॉर आणि भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाच्या एनपी कौन्सिलचे माजी वरिष्ठ सल्लागार असून, बीआयएस इंडिया व अमेरिकन वेल्डिंग सोसायटीचे तांत्रिक समिती सदस्यही आहेत.

श्रीकांत पाटील एमएसएमई, स्टार्टअप्स आणि निर्यातदारांना मार्गदर्शन करत असून, भारत-युरोप व्यापार व सहकार्य वाढवण्यासाठी काम करतात. त्यांनी स्टार्टअप इंडिया, भास्कर, एसटीपीआय, मायटी, एआयसीटीई, आयआयटी मुंबई व मद्रास, बेलॉर युनिव्हर्सिटी (यूएसए) यांसारख्या संस्थांमध्ये मेंटरशिप करीत आहेत. युरो एक्झिम बँक, ईबीआरडी, आफ्रिकन आणि आशियाई विकास बँकांसह अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांचे वित्त सल्लागार आहेत. महाराष्ट्र चेंबर, निमा समितीचे अध्यक्ष आणि क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाचे सल्लागार म्हणूनही कार्यरत आहेत. जिल्हा ते आंतरराष्ट्रीय स्तरावर चार वर्षांपासून सक्रिय असून, विविध पुरस्कारांनी सन्मानित केले गेले आहेत.

### रघुत्तम सोसायटीत दत्त जयंती साजरी

**इंदिरानगर : वार्ताहर** रघुत्तम सोसायटीच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी भक्तिमय वातावरणात श्री दत्त जयंती सोहळा पार पडला. सोहळ्याचे हे सहावे वर्ष होते. यानिमित्ताने श्री गुरुदेव दत्त महाराजांची आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नाशिक शहर सरचिटणीस योगेश दिवे व शालिनी दिवे यांच्या हस्ते दत्त महाराजांची पूजा व महाआरती करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन रघुत्तम सोसायटीमधील सर्व सभासद व महिलांनी केले होते. कार्यक्रमप्रसंगी पोपट डावरे, राजू चव्हाण उपस्थित होते. यावेळी पांडवनगरी व परिसरातील भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यशस्वीतेसाठी योगेश सोनवणे, सुनेर सुखदेवे, नामदेव जोगदंड, नीलेश दिवे, ओंकार शिरसाठ, हर्षल चव्हाण, साहिल जुमडे, नयन निकुंभ, अक्षय दिवे, प्रथमेश दिवे, स्वराज सोनवणे, प्रियंका सुखदेवे, अनुसया जोगदंड, मीरा सोनवणे, प्रयागबाई जोगदंड, रंजना लभडे, वर्षा शिरसाठ, आकांक्षा देवरे यांनी परिश्रम घेतले.

# 'कृउबा'कडून वसूल केल्या जाणाऱ्या शुल्काविरोधात व्यापारी एकवटले

## पेठरोडवरील शरदचंद्रजी मार्केट यार्डातील अन्नधान्य विभागाचा कडकडीत बंद

**पंचवटी : प्रतिनिधी**

**नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीकडून वसूल केल्या जाणाऱ्या बाजार शुल्काविरोधात पेठरोडवरील शरदचंद्रजी पवार मार्केट यार्डातील किराणा व्यापारी एकवटले असून, शुक्रवारी (दि. ५) कडकडीत बंद पाळला गेला. राज्य कृती समितीने राज्यभरात हे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला होता. यास नाशिक शहरातील व्यापारी संघटनांनी त्याला साथ देत बंदची घोषणा केली होती.**



शहरातील २५ हजार किरकोळ आणि ३०० घाऊक व्यापारी या बंदमध्ये सहभागी झाले होते. यात नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पेठरोडवरील शरदचंद्रजी पवार मार्केट यार्डातील अन्नधान्य व्यापारी यांनी सहभाग नोंदविला. बाजार समिती कायदा १९६३ मध्ये निर्माण झाला असून, तो आता कालबाह्य झाला आहे. यावेळी बाजार समितीतर्फे व्यापाऱ्यांकडून वसूल केले जाणारे हे बाजारशुल्क हा ग्राहकांवर पडणारा अतिरिक्त भार असून, तो पडू नये याकरिता हा बंद असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

बाजार सेस म्हणजे कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये होणाऱ्या खरेदी-विक्रीवर आकारला जाणारा विशिष्ट कर आहे. नाशिकमध्ये हा कर शेकडा १ रुपया ५ पैसे इतका वसूल केला जातो.

> भारत सरकारने देशात वन नेशन, वन टॅक्स म्हणून जीएसटी आणला. तो वसूल केला जात आहे. त्यामुळे बाजार समितीसारखे सेसरूपी जी करवसुली सुरू ठेवली, यामुळे सामान्य ग्राहकाची लूट होत आहे. जीवनावश्यक वस्तू असल्याने यावर कुठलाही उपकर नको. यासाठी सरकारने बाजार समित्यांना अनुदान द्यावे. एपीएमसी करमुक्त व्यापारासाठी चालना मिळावी. कर का भरावेत? भरलेला कर शेवटी व्यापारी नाइलाजाने ग्राहकांकडूनच वसूल करतो. हा कर रद्द झाल्याचा सर्वाधिक दिलासा ग्राहकांना मिळणार आहे.
> - प्रफुल्ल संचेती, अध्यक्ष, नाशिक धान्य किराणा घाऊक व्यापारी असोसिएशन

## भुसावळ विभागातील प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर बंदी

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**



भुसावळ विभागातील नाशिक, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला आणि बडनेरा स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घातली.

महापरिनिर्वाण दिनाच्या पार्श्वभूमीवर रेल्वे स्थानकांवर होणारी गर्दी नियंत्रित करण्यासाठी भुसावळ विभागातील काही प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घालण्यात येत आहे. प्लॅटफॉर्मवर होणारी गर्दी नियंत्रित करणे आणि स्थानक परिसरात प्रवाशांची सुरक्षा हालचाल सुनिश्चित करणे हा उद्देश आहे. प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवरील निर्बंध दि. ०५.१२.२०२५ ते दि. ०६.१२.२०२५ पर्यंत प्रभावी आहेत. भुसावळ विभागातील नाशिक, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला आणि बडनेरा या स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांची विक्री तात्पुरती प्रतिबंधित असेल. प्रवास सुलभ व्हावा यासाठी ज्येष्ठ नागरिक आणि वैद्यकीय गरजा असलेल्या लोकांना या निर्बंधांमधून सूट देण्यात आली आहे. दरम्यान, सुरक्षित आणि सुरक्षित प्रवास अनुभवण्यासाठी प्रवाशांनी त्यानुसार नियोजन करावे आणि नवीन नियमांचे पालन करावे, अशी विनंती रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आली आहे.



## येवल्यात कुत्र्याचा सहा जणांना चावा; बंदोबस्ताची मागणी

**येवला : प्रतिनिधी** शहरात गेल्या अनेक दिवसांपासून भटक्या कुत्र्यांनी धुमाकूळ घातला असून, शुक्रवारी येवला शहरात भटक्या कुत्र्याने पाच ते सहा जणांना चावा घेऊन रक्तबंबाळ केले आहे.

शहरात गेल्या अनेक दिवसांपासून भटक्या कुत्र्यांचा धुमाकूळ सुरू आहे. भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांनी पालिका प्रशासनाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, शहरातील भटक्या कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, काल सायंकाळच्या सुमारास एका भटक्या कुत्र्याने नगर-मनमाड महामार्गावर पाच ते सहा जणांना चावा घेतला. काही व्यक्तींच्या हाताला तर काही व्यक्तींच्या पायाला चावा घेऊन गंभीर जखमी केले. या सर्व जखमींवर येवला शहरातील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून, पालिका प्रशासनाने शहरातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

## चारचाकी उलटून अपघात; महिलेसह दोन जण गंभीर

**सातपूर : प्रतिनिधी** कार उलटल्याने एका महिलेसह दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. हा अपघात नाशिक जिल्ह्यातील गंमत-जंमत हॉटेलजवळ असलेल्या वळणावर घडला. कार उलटल्याने झालेल्या अपघातामध्ये एक जण गंभीर तर दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.



अपघाताचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. मात्र, चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने गाडी वळणार उलटल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने, गाडी वळणावर उलटली आणि रोडवरच असलेल्या खड्ड्यात जाऊन कोसळली. या घटनेमध्ये एका गंभीर तर दोन जण जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. या अपघातामध्ये जखमी झालेल्या लोकांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. सर्व जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू असून, जखमींची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळते.

# नितीन उपासनी पोलीस कोठडीत

## शालार्थ आयडी गैरव्यवहार : फिर्यादी चव्हाणही रडारवर

**नाशिक : प्रतिनिधी** बनावट शालार्थ आयडीद्वारे झालेल्या कोट्यवधींच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात या गुन्ह्याचे फिर्यादी ठरलेले तत्कालीन शिक्षण उपसंचालक भाऊसाहेब चव्हाण यांच्याच भूमिकेवर संशयाची सुई जाते आहे. या प्रकरणात बुधवारी (दि. ३) अटक करण्यात आलेले माजी शिक्षण उपसंचालक नितीन उपासनी यांना न्यायालयाने सोमवार(दि. ८)पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. उपासनी यांच्या अटकेमुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या घोटाळ्यात आणखी बडे आसामी अडकण्याची शक्यता तपास संस्थांकडून व्यक्त केली जात आहे. आर्थिक गुन्हे शाखेने चव्हाण यांच्या अटकपूर्व जामिनावर न्यायालयाला दिलेल्या लेखी उत्तरात त्यांनाही मुख्य संशयित म्हटल्याने त्यांच्या अटकेची टांगती तलवार आहे.



नाशिकरोड पोलीस ठाण्यात मार्च २०२५ मध्ये नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यानुसार जिल्ह्यातील दहा शिक्षणसंस्था, मुख्याध्यापक, शिक्षक व लिपिकांनी संगनमत करून बनावट शालार्थ आयडी तयार केले. या आयडीच्या माध्यमातून शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात आर्थिक गैरव्यवहार केल्याचा संशय आहे. या माध्यमातून दहा कोटींपेक्षा अधिक रकमेचा घोटाळा झाल्याचे चौकशीत समोर आले आहे. गुन्ह्याच्या तपासादरम्यान अमळनेर येथील मनोज पाटील, नीलेश पाटील, अविनाश पाटील व दत्तात्रय पाटील या संशयितांना अटक करून पोलिसांनी सखोल चौकशी केली. त्यानंतरच उपासनी तसेच इतर अधिकाऱ्यांवर संशय निर्माण झाला. पोलिसांनी उपासनी यांना बुधवारी रात्री अटक केली. गुरुवारी न्यायालयात हजर केल्यानंतर चार दिवसांची पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली आहे. तपासात चव्हाण यांचाही सहभाग दिसल्याने त्यांच्या अटकपूर्व जामिनावर पोलिसांचे लेखी उत्तर दिले आहे. तपास अधिकाऱ्यांच्या पुराव्यांचे फेरफार केल्याप्रकरणी तत्कालीन पोलीस निरीक्षक अशोक गिरी यांचे निलंबन करण्यात आले आहे. फिर्यादी भाऊसाहेब चव्हाण यांनीच हा गुन्हा दाखल केला असला, तरी तपासात त्यांचीच भूमिका संशयास्पद असल्याचे आर्थिक गुन्हे शाखेने न्यायालयात स्पष्ट केले. घोटाळा उघडकीस येण्याची चिन्हे दिसताच चव्हाण यांनी फिर्याद देत स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही तपास संस्थेकडून समोर आला आहे. उपासनी व इतर अटकेतील संशयितांचे जबाब, गोळा झालेला पुरावा तसेच शिक्षण मंत्रालयापर्यंत पोहोचणारे धागेदोरे यांच्या आधारे अनेक नवे खुलासे होण्याची शक्यता आहे. चव्हाण यांची अटक झाल्यास या घोटाळ्यातील अजून मोठ्या टोळीची साखळी उघड होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# देशभरातील साधू-महंतांची आजपासून त्र्यंबकहून गोदावरी परिक्रमा

## पीठाधिश्वर जगद्गुरू महायोगी रामानंद आचार्य सिद्धबाबा यांची माहिती

**पंचवटी : प्रतिनिधी** कलियुगामध्ये गोदावरी परिक्रमेला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. प्रभू श्री रामचंद्र यांनी गोदावरीच्या पावन भूमीत बारा वर्षे वास्तव्य केले आहे. अनेक संत-महंत, ऋषी-मुनींनी या गोदावरी नदीच्या तीरावर तपश्चर्या, आराधना केली आहे. धार्मिक महत्त्व असलेल्या या गोदावरी नदीची शनिवार, दि. ६ डिसेंबरपासून उगमस्थान असलेल्या त्र्यंबकेश्वर येथून परिक्रमा करण्यात येणार आहे. तर २१ डिसेंबरला त्र्यंबकेश्वर येथे सकाळी समारोप होणार आहे.

चार राज्यांतून जाणाऱ्या या परिक्रमेत देश-विदेशातील ५०० हून अधिक साधू-महंत, महामंडलेश्वर सहभागी होणार असल्याची माहिती नेपाळ येथील पीठाधिश्वर जगद्गुरू महायोगी रामानंद आचार्य सिद्धबाबा यांनी दिली.

तपोवन येथील श्री लक्ष्मीनारायण बडा मंदिर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, यापूर्वी गोदावरी परिक्रमा केलेली आहे. परंतु देश-विदेशातील संत, महंत, महामंडलेश्वर व भाविक प्रथमच एकत्रित येत ही परिक्रमा करणार आहेत. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूचा काही भाग या राज्यांतून ही परिक्रमा मार्गस्थ होईल. संतस्पर्शाने त्या तीर्थस्नानाला एक वेगळेच महत्त्व प्राप्त होते. संतांशिवाय पावन तीर्थक्षेत्र होऊ शकत नाही. त्यामुळे दक्षिण पूर्व पश्चिम उत्तर या सर्वच चारी भागातून संत-महात्मे या परिक्रमेत सहभागी होणार आहेत. त्र्यंबकेश्वर येथे २१ डिसेंबरला परिक्रमा समारोपानिमित्त भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. संत-महात्म्यांचे स्वागत, सत्कार, मार्गदर्शन आणि विशाल भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे महाराजांनी सांगितले. यावेळी श्री लक्ष्मीनारायण मंदिराचे महंत रामस्नेहीदास महाराज, श्री हनुमान मंदिराचे महंत शंकरदास महाराज (करंजाळी), जगद्गुरू श्री रामानंदाचार्य सेवापीठ वराहक्षेत्र, नेपाळ अध्यक्ष बाबूराजा, अयोध्या तसेच जगद्गुरूंचे शिष्यगण नवल किशोरी दास, प्रशांत राम दास, यतीराम दास, राज नारायणदास, पूर्णारामदास, माधवरामदास, रामकृष्ण रामदास आदी उपस्थित होते.



**या उद्देशाने परिक्रमेचे आयोजन**

सांस्कृतिक आदान-प्रदान, राष्ट्रीय अखंडता आणि आगामी कुंभमेळा या प्रमुख उद्देशाने या परिक्रमेचे आयोजन करण्यात आले असल्याचे नेपाळ येथील पीठाधिश्वर जगद्गुरू महायोगी रामानंद आचार्य सिद्धबाबा यांनी सांगितले. कुंभमेळ्याच्या तयारी व इतर बाबींविषयीदेखील यात विचारविनिमय करण्यात येणार आहे.

# साठहून अधिक शिक्षक मान्यता देणारे उपासनी अडचणीत

**नाशिक : प्रतिनिधी** नाशिक विभागाचे माजी शिक्षण उपसंचालक नितीन उपासनी यांना बनावट शालार्थ आयडीप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने अटक केल्यानंतर शिक्षण वर्तुळात खळबळ उडाली आहे. अटकेनंतर त्यांचे अनेक जुने कारनामे पुन्हा समोर येऊ लागले आहेत. माध्यमिक शिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार असताना उपासनी यांनी एकाच दिवशी शहरातील नामांकित शिक्षण संस्थेच्या साठहून अधिक शिक्षक मान्यतांना मंजुरी दिल्याची माहिती समोर आली आहे.

उपासनींच्या अटकेनंतर शिक्षण विभागातील अनेक अधिकाऱ्यांची धडधड वाढली आहे. या प्रकरणाचे धागेदोरे उच्चपातळीवरील आणखी अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचू शकतात, अशी चर्चा जोरात आहे. त्यांच्याविरोधात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आता पुढे येत असून, उपासनी यांनी केलेल्या अनियमितता आणि आर्थिक गैरव्यवहारांची माहिती देऊ लागले आहेत.

नाशिक महापालिका शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारीपद सांभाळतानाच काही काळ ते माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांचा कार्यभारही पाहत होते. त्याचवेळी शिक्षण उपसंचालकपदाची जबाबदारीही त्यांच्याकडे दिल्याने बॅक डेटेड मान्यता, बोगस शालार्थ आयडी आणि विविध नियमबाह्य मंजुरी देऊन त्यांनी आर्थिक लाभ घेतल्याचा आरोप शिक्षकांनी केला आहे. वरिष्ठांची मर्जी मिळवूनच त्यांना एकाच वेळी दोन-दोन जबाबदाऱ्या देण्यात आल्याची चर्चा सुरू आहे.

सन २०१२ ते २०२३ या अकरा वर्षांत उपासनी यांनी शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर नियमबाह्य कामे आणि आर्थिक गैरव्यवहार केल्याचे उघड होत आहे. निवृत्तीनंतरही त्यांनी काही शिक्षकांच्या मान्यतांवर बॅक डेटेड सह्या केल्याचेही समोर आले आहे. हा प्रकार केवळ काही अधिकाऱ्यांपुरता मर्यादित नसून, संपूर्ण शिक्षण विभागातील उच्चस्तरीय मंडळी यात गुंतलेली असल्याचा आरोपही होत आहे. या प्रकरणात आणखी काही मोठी नावे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

> एसआयटीने प्रामाणिकपणे चौकशी केली तर गेल्या १५ वर्षातील अनेक आजी-माजी शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी यात अडकतील.
> -एस. बी. देशमुख, सचिव, राज्य मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ

# तपोवनात सिमेंटचे जंगल कदापि होऊ देणार नाही

## पीठाधिश्वर जगद्गुरू महायोगी रामानंद आचार्य सिद्धबाबा यांचा इशारा

**पंचवटी : प्रतिनिधी**

**महाराष्ट्रात केवळ नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये कुंभमेळा होतो. प्रभू श्रीरामचंद्रांनी वास्तव केलेली ही तपोभूमी जगभरातील साधुसंत, महंत, ऋषी आणि भाविकांच्या आस्थेचे ठिकाण आहे. हा परिसर संतपरंपरा आणि निसर्गाची देणगी असलेले पवित्र क्षेत्र आहे. येथे कोणत्याही प्रकारचे व्यावसायिक कॉम्प्लेक्स अथवा बांधकाम होऊ नये, हे सर्वांचेच मत आहे. या भूमीत फक्त संत, महंत आणि हरित वनस्पतींचे अस्तित्व राहिले पाहिजे. प्रशासन झाडे तोडण्याच्या बाबत ठाम राहिल्यास मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारादेखील नेपाळ येथील अनंतश्रीविभूषित पीठाधिश्वर जगद्गुरू महायोगी रामानंद आचार्य सिद्धबाबा यांनी दिला आहे.**

तपोवन येथील श्री लक्ष्मीनारायण बडा मंदिर येथे महाराजांचे आगमन झाले असून, त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले की, श्री लक्ष्मीनारायण बडा मंदिराच्या अस्तित्वामुळेच ही जमीन शासनाच्या ताब्यात आली असून, आजवर तिचे संरक्षण मंदिर व्यवस्थापनाकडून सातत्याने करण्यात आले आहे. हे स्थान नव्याने निर्माण झालेले नसून, पाचशे वर्षांहून अधिक कालखंडापासून संतांच्या आध्यात्मिक परंपरेचे केंद्र राहिले आहे. तीनशे वर्षांपासूनचे सर्व कागदपत्र या संस्थानकडे उपलब्ध आहे. कुंभमेळ्यामुळे तपोवन हे संपूर्ण भारतात आणि विदेशातदेखील संत-महंतांच्या आस्थेचे महत्त्वपूर्ण केंद्र मानले जाते. अशा पवित्र भूमीचे विविध कारणे दाखवून अधिग्रहण करण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा असून, हा प्रकार भाविकांच्या मनाला धक्का देणारा आहे. संतांच्या उपस्थितीमुळेच ही जागा आज अस्तित्वात आहे; त्यामुळे कोणताही निर्णय घेताना मंदिर आणि मठ व्यवस्थापनाला विश्वासात घेणे अत्यावश्यक आहे.

दरम्यान, २०२५ मध्ये होणाऱ्या प्रयागराज कुंभमेळ्याचे आदर्श उदाहरण डोळ्यासमोर ठेवून, महाराष्ट्र शासनाने येणाऱ्या नाशिक कुंभमेळ्यासंदर्भात नियोजन करताना साधू-संतांच्या व्यवस्थेबाबत कोणतीही उणीव राहू नये, याची विशेष खबरदारी घ्यावी. येत्या कुंभमेळ्यात तब्बल चाळीस कोटी भक्त नाशिकला आगमन करतील आणि त्या अनुषंगाने सर्व सुविधा सुसज्ज करणे आवश्यक असून, प्रशासनाने सूक्ष्म नियोजन करण्याची मागणीदेखील महाराजांनी केली आहे.

**साधू समाजाला रस्त्यावर उतरायला लावू नका**

जर प्रशासनाने या भूमीत एक्झिबिशन सेंटर किंवा अशा स्वरूपाचे बांधकाम प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला तर तो कोणत्याही परिस्थितीत मान्य नसल्याचे महाराजांनी सांगितले. प्रशासन याबाबत आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्यास याविरोधात मोठे जनआंदोलन उभे राहील, असा इशारादेखील महाराजांनी भाविकांच्या वतीने दिला आहे. प्रशासनानेही सहकार्य भावनेने याचा विचार करणे अपेक्षित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**जगद्गुरू श्री पीठाधिश्वर जगद्गुरु महायोगी रामानंद आचार्य सिद्धबाबा यांच्याविषयी...**



हिमालयात तपश्चर्येने प्रकाशित झालेले महायोगी सिद्धबाबा हे दिव्य व्यक्तिमत्त्व आहेत. ज्यांनी लोकांच्या हितासाठी हिमालयीन सिद्धमहायोग ध्यान (सूरत शब्द योग) जगात पुन्हा आणले. वैदिक-सनातन-रामानंदीय श्री वैष्णव पंथाचे आहेत. श्रीधाम अयोध्येची सुरुवात, श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे अध्यक्ष, श्रीमणिरामदास छावणी पीठाचे पीठाधिश्वर, अनंत श्रीविभूषित श्री नृत्यगोपालदासजी महाराज आणि त्यांचे ज्येष्ठ शिष्य, श्री लक्ष्मीनारायण बडा मंदिर (तपोवन) चे पीठाधिश्वर यांनी केली आहे. जगद्गुरू रामानंद आचार्य, ज्यांना पंथ आणि जगद्गुरूंनी सर्वत्र मान्यता दिली आहे, ते एक प्रतिष्ठित श्रोत्रिय ब्राह्मणनिष्ठ त्रिदंडी जगद्गुरू आहेत. त्यांचे जीवन निःस्वार्थ प्रेमाची, प्राणप्रतिष्ठा तपस्याची आणि मानवतेच्या कल्याणासाठी व्यतित करतात.

## संक्षिप्त

### रियलमीने रियलमी पी ४ एक्स स्मार्टफोन आणि रियलमी वॉच ५ भारतात केले लॉन्च



**नाशिक :** स्मार्टफोन ब्रँड रियलमीने स्मार्टफोन आणि एआयओटी पोर्टफोलिओला रियलमी पी४एक्स आणि रियलमी वॉच ५, ऑप्टीमास इलेक्ट्रॉनिक लिमिटेड यांच्या सहकार्याने तयार केलेली नवीनतम मेक इन इंडिया स्मार्टवॉच यांच्या लॉन्चसह अधिक बळकटी दिली. ही दोन्ही उत्पादने एकत्रितपणे रियलमीच्या दैनंदिन वापरात शक्तिशाली परफॉर्मन्स, उपयुक्त एआय क्षमतांचा अनुभव आणि डिझाइन-फर्स्ट इनोव्हेशन यांचे दृष्टिकोन स्पष्ट करतात. रियलमी पी ४ एक्स, फास्टेस्ट ७०००एमएएच पायोनियर, डायमेन्सिटी ७४०० अल्ट्रा ५जी चिपसेटसह सेगमेंटमधील आघाडीचा परफॉर्मन्स देतो. यात ९० एफपीएस गेमिंग आणि जीटी बूस्ट आहे, ज्यामुळे गेमप्ले अधिक स्मूथ आणि स्थिर राहतो. त्याची ७०००एमएएच टायटन बॅटरी ४५डब्ल्यू फास्ट चार्जसह काही मिनिटांत तासन्तास वापराची शक्ती देते, तर बायपास चार्जिंग आणि स्टील व्हीसी असलेल्या फ्रोझन क्राऊन कुलिंग सिस्टिममुळे सीपीयू तापमानात २०ओसीपर्यंत घट होते. रियलमी पी ४ एक्सची पहिली विक्री १० डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता सुरू होईल, जी ऑप्टिमस इलेक्ट्रॉनिक लिमिटेडसह सहकार्याने विकसित केली गेली आहे. लाईट मोडमध्ये २० दिवसांची बॅटरी लाइफ, एचडी ब्लूटूथ कॉलिंग, एनएफसी सुविधा, आयपी ६८ रेसिस्टन्स आणि ३०० पेक्षा जास्त कस्टमायझेबल वॉच फेसेससह वॉच ५ दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, अचूक ट्रॅकिंग आणि परिष्कृत डिझाइन करून स्मार्टवॉचमध्ये उत्कृष्ट अनुभव देते. रियलमी वॉच ५ ची पहिली विक्री १० डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता सुरू होईल.

# उद्योग व कौशल्य शिक्षण समन्वयाने मिळणार विकासाला नवी दिशा

**नाशिक : प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'यश इन' सभागृहात शिक्षणकौशल्य शिक्षण समन्वय उपक्रमांतर्गत निमा व लघुउद्योग भारती यांच्यासोबत संयुक्त बैठक पार पडली. रोजगारक्षमतेत वाढ व उद्योग शिक्षण समन्वय मजबूत करण्यावर भर देण्याचा एकमताने निर्णय घेण्यात आला.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते. व्यासपीठावर निमा अध्यक्ष आशिष नहार, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, व्यवस्थापन मंडळ सदस्य प्रा. डॉ. डी. एम. गुजराथी तसेच वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे संचालक प्रा. सुरेंद्र पाटोळे उपस्थित होते.



निमा अध्यक्ष आशिष नहार यांनी नाशिकच्या औद्योगिक विकासावर माहिती देत महिंद्रा अँड महिंद्रा प्रकल्पाची गुंतवणूक, सीपीआरआय लॅब उद्घाटन, ड्रायपोर्ट प्रकल्पाची अंमलबजावणी आणि डिफेन्स इनोव्हेशन सेंटरसाठी नाशिकची निवड ही महत्त्वाची पावले असल्याचे सांगितले. नाशिकला औद्योगिक गुंतवणुकीचे प्रमुख केंद्र बनवण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

**शिक्षणक्रम अधिक रोजगाराभिमुख करण्यासाठी प्रत्यक्ष उद्योग कामकाजावर आधारित प्रात्यक्षिके, छोटे कॅप्सूल अभ्यासक्रम, हस्तपुस्तिका, लिंक-आधारित शिक्षण सामग्री व दृकश्राव्य व्हिडिओ तयार करण्यावर भर देण्याची गरज असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले. उद्योग क्षेत्रातील अद्ययावत गरजांनुसार संशोधन आणि विकासासाठी विद्यापीठ दोन वर्षांचे अल्पमुदतीचे प्रकल्प सुरू करण्यास सहयोग देण्यास तयार असल्याचे सांगण्यात आले.**

लघुउद्योग भारतीचे अध्यक्ष निखिल तपाडिया यांनी जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि गोदावरी स्वच्छता मोहिमेवर भर दिला. तसेच ईव्ही तंत्रज्ञान प्रसारासाठी सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

प्रा. सुरेंद्र पाटोळे यांनी कौशल्य विकासासाठी क्यूआर कोड आधारित प्रमाणपत्र, ई-गॅरेज, अल्पकालीन व कॅप्सूल कोर्सेस, तसेच सायबर सुरक्षा, हेल्थकेअर, इलेक्ट्रिकल अशा क्षेत्रांत नवे अभ्यासक्रम विकसित करण्याची गरज अधोरेखित केली. विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप व स्टायपेंड मॉडेल सुचविण्यात आले.

स्नेहल म्हापणकर यांनी मशरूम, नर्सरी, कृषी प्रोटोटाइप यांसारख्या स्वयंरोजगार संधी, तसेच स्टार्टअप व उष्मायन केंद्रांमुळे तरुणांना मिळणाऱ्या संधींवर प्रकाश टाकला.

बैठकीत रोजगाराभिमुख शिक्षणक्रम, उद्योगनिष्ठ प्रात्यक्षिके, कॅप्सूल अभ्यासक्रम, तसेच संशोधन व अल्पमुदतीचे प्रकल्प राबवण्यासाठी विद्यापीठाची तयारी असल्याचे मनोगत कुलगुरू संजीव सोनवणे यांनी व्यक्त केले.

नाशिकच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी उद्योग शैक्षणिक सहकार्याची ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली. यावेळी निमा अध्यक्ष आशिष नहार, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, लघुउद्योग भारतीचे अध्यक्ष निखिल तापडिया, स्नेहल म्हापणकर, सुरेंद्र पाटोळे, प्रा. डी. एम. गुजराथी, प्रा. प्रशांत टोपे, नामकर्ण आवारे, राजेंद्र अहिरे, राजेंद्र वडनेरे, मिलिंद राजपूत, कैलास पाटील, सचिन कांकरेज, नितीन आव्हाड, श्रीकांत पाटील, नानासाहेब देवरे, गोविंद बोरसे, प्रकाश गुंजाळ, अनिल मंत्री, संजय राठी, योगेश जोशी तसेच अन्य सदस्य उपस्थित होते.

# भूषण लोंढेसह साथीदाराला १२ डिसेंबरपर्यंत कोठडी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

सातपूर येथे लोंढे टोळीविरुद्ध दाखल झालेल्या गंभीर गुन्ह्यातील मुख्य आरोपी भूषण लोंढे आणि त्याचा साथीदार प्रिन्स सिंग यांना नाशिक गुन्हे शाखा युनिट-२ ने नेपाळ सीमेजवळून अटक करण्यात यश मिळवले आहे. दोघांवर खुनाचा प्रयत्न, मारहाण, शस्त्र बाळगणे तसेच मकोका अशा गंभीर कलमांखाली गुन्हा नोंदवण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून हे दोघेही फरार होते आणि त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विशेष प्रयत्न सुरू होते. दरम्यान, दोघाही आरोपींना न्यायालयासमोर उभे केले असता त्यांना १२ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

सातपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ऑरा बिअर बारमध्ये झालेल्या गोळीबारात प्रकरणातील मुख्य आरोपी आणि पीएल लोंढे गँगचा म्होरक्या भूषण प्रकाश लोंढे हा गेल्या काही दिवसांपासून फरार झाला होता. तेव्हापासून पोलिस त्याच्या मागावर होते. गुन्हे शाखेचे पथक आरोपींचा सुराग मिळवण्यासाठी उत्तर प्रदेशातील बडौत येथे पोहोचले. पोलिसांच्या हालचालींची माहिती मिळाल्यानंतर आरोपींनी राहत्या



**प्रकाश लोंढेसह दीपक लोंढे आणि भूषण लोंढे या गुन्हेगारांना काहींनी बॉस म्हणून प्रसिद्ध केले. अशा प्रवृत्तीचा निषेध करत आहे. शहरातील गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी नाशिक पोलिसांनी 'नाशिक जिल्हा कायद्याच्या बालेकिल्ला' सुरू केला, त्याबद्दल नाशिक पोलिसांना सलाम. मंत्रभूमी, यंत्रभूमी, संत-महंतांची भूमी अशी नाशिकची ओळख असतानाही लोंढेसारख्या गुन्हेगारांमुळे नाशिकला कीड लागली आहे. ही कीड जोपर्यंत संपत नाही तोपर्यंत माझी लढाई ही सुरूच राहील. आयटीआय पुलाजवळील लोंढेची धर्मतीर्थ ही इमारत जमीनदोस्त करण्यासाठी मी स्वतः सोमवारी मनपासह पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांना पत्र देणार असून, धर्मतीर्थसुद्धा लवकरच जमीनदोस्त होईल यात तीळमात्र शंका नाही.** - रतन लथ

ठिकाणावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला. पळताना भूषण लोंढे याच्या पायाला गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाल्याचेही निष्पन्न झाले. त्यानंतर गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेत दोघांच्या हालचाली राजस्थान आणि उत्तर प्रदेशच्या सीमेलगत होत असल्याचे शोधून काढले.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पथक प्रथम राजस्थानमधील कोटपुतली येथे गेले. मिळालेल्या गुप्त माहितीनुसार हे दोघे नेपाळ सीमेजवळील महाराजगंज परिसरात लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पथकाने तातडीने तेथे धाड टाकून कोल्हुई, महाराजगंज येथून दोघांना जेरबंद केले. स्थानिक न्यायालयातून ट्रान्झिट वॉरंट मिळवून आरोपींना नाशिककडे आणण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कारवाई पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, गुन्हे विभागाचे उपआयुक्त किरणकुमार चव्हाण, परिमंडळ-२ चे उपआयुक्त किशोर काळे, तसेच सहायक पोलिस आयुक्त संदीप मिटके आणि सचिन बारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी सपोनि हेमंत तोडकर, सपोनि डॉ. समाधान हिरे, पोउनि यशवंत बेंडकोळी आणि त्यांच्या पथकातील अधिकारी व अंमलदारांनी सलग अनेक दिवस मेहनत घेऊन ही कामगिरी पार पाडली. तांत्रिक विश्लेषणासाठी मसपोनिरी जया तारडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचेही महत्त्वाचे योगदान राहिले. या अटक कारवाईमुळे सातपूर परिसरातील या गँगविरुद्धची मोठी कारवाई पूर्ण झाली असून, पुढील तपास नाशिक पोलिसांकडे सुरू आहे. ऑरा बिअर बार गोळीबार प्रकरणातील फरार आरोपी भूषण लोंढे हा घटना घडल्यापासून नाशिकमधून फरार होता. मात्र, नाशिक पोलिसांनी जीवाची पर्वा न करता या दोघा आरोपींना जेरबंद केले.

## 'इसुझू मोटर्स इंडिया'च्या वतीने राष्ट्रीय स्तरावर 'इसुझू आय-केअर विंटर कॅम्प'

**नाशिक :** सर्वोत्तम सेवा आणि मालकीचा अनुभव देण्याच्या 'इसुझू'च्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करण्याच्या निरंतर प्रयत्नात, इसुझू मोटर्स इंडिया आपल्या इसुझू डी-मॅक्स पिक-अप्स आणि एसयूव्हीच्या श्रेणीसाठी देशव्यापी इसुझू आय-केअर विंटर कॅम्प आयोजित करणार आहे. या सेवा शिबिराचा उद्देश ग्राहकांना देशभरातील हंगामात त्रासमुक्त वाहन चालविण्याच्या अनुभवासाठी रोमांचक लाभ आणि प्रतिबंधात्मक देखभाल तपासणी उपलब्ध करून देणे हा आहे. इसुझू केअरच्या पुढाकाराने, दि. ८ ते १३ डिसेंबरदरम्यान सर्व इसुझू अधिकृत विक्रेता सेवा केंद्रांवर विंटर कॅम्पचे आयोजन केले जाईल. आग्रा, अहिल्यानगर, अहमदाबाद, अंबिकापूर, बारामुल्ला, बरेली, बारमेर, भरूच, भटिंडा, बेंगळुरू, भोपाळ, भुवनेश्वर, बिकानेर, बिलासपूर, कालिकत, छत्रपती संभाजीनगर, चेन्नई, चिक्कमंगळूरू, कोईम्बतूर, दिल्ली, दिब्रुगड, दिमापूर, दुर्गापूर, एर्नाकुलम, गांधीधाम, गुरुग्राम, गुवाहाटी, हावडा, हुबळ्ळी, हैदराबाद, इंदूर, जयगाव, जयपूर, जालंधर, जम्मू, जोधपूर, कडप्पा, कलबुर्गी, करनाल, खम्मम, कोल्हापूर, कोलकाता, कोट्टायम, कुरनूल, लातूर, एलबीनगर, लेह, लखनऊ, लुधियाना, मदुराई, मंडी, मेहसाणा, मोहाली, मुंबई, मुंद्रा, म्हैसूर, नागपूर, नाशिक, नेल्लोर, निजामाबाद, नोएडा, पाटणा, पुणे, रायपूर, राजमुंद्री, राजकोट, रत्नागिरी, सातारा, शिवमोग्गा, सीकर, सिलिगुडी, सोलापूर, सुरत, थेनी, त्रिसुर, तिरुनेलवेली, तिरुपती, त्रिची, तिरुवनंतपुरम, वडोदरा, विजयवाडा आणि विशाखापट्टणम येथे इसुझू'च्या सर्व अधिकृत सेवा सुविधांवर विंटर कॅम्प आयोजित करण्यात येईल. नजीकच्या इसुझू विक्रेता दालनासोबत संपर्क साधून किंवा https://www.isuzu.in/servicebooking.html ला भेट देऊन सर्व्हिस बुकिंग करता येईल.





## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीतर्फे महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**नाशिकरोड : विशेष प्रतिनिधी** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती आणि भिमाई महिला मंडळातर्फे रेल्वे स्टेशन येथील पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी सामुदायिक पंचशील त्रिशरण बुद्धवंदना, भीमस्तुती, भीमस्मरण या गाथांचे सामुदायिक पठण केले. यावेळी जयंती समितीचे मुख्य संयोजक व रिपाइं उत्तर महाराष्ट्राचे नेते सुनील संपत कांबळे, अतुल भावसार, प्रा. रवींद्र पाटील, बलभीम वीर, अरुण जाधव, अक्षय बर्वे, परमेश्वर डबाळे, जयश्री बस्ते, राजश्री पालवे आदी उपस्थित होते.

## अत्याचारग्रस्त दिवंगत व्यक्तीच्या वारसांना शासकीय नोकरीची संधी

**नाशिक : प्रतिनिधी** अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ अंतर्गत दाखल खून प्रकरणातील दिवंगत व्यक्तीच्या कुटुंबातील एका पात्र वारसाला शासकीय/ निमशासकीय नोकरी देण्याबाबतचा निर्णय २० नोव्हेंबर २०२५ रोजी शासनाने घेतला आहे. जिल्ह्यातील सन २०१२ ते २०२५ या काळातील एकूण ३४ प्रकरणांचा समावेश यात होत आहे. अत्याचारग्रस्त कुटुंबातल व्यक्ती/वारसाने सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नाशिक-पुणे रोड, नाशिक येथे शासननिर्णयात नमूद केल्यानुसार परिशिष्ट १ ते ६ नुसार आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करावा.



# हैदराबादमधून एक हजार रोपे आणणार

## ना. गिरीश महाजन यांनी दिली माहिती

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**देशातील सर्वांत मोठी नर्सरी हैदराबाद येथे आहे आणि याच नर्सरीमधील एक वर्षाचे आणि उंच असे सुमारे एक हजार झाडे येणार असून, या झाडांचे नाशिकला रोपण करण्यात येणार असल्याची माहिती ना. गिरीश महाजन यांनी दिली. मंत्री गिरीश महाजन यांनी या पार्कच्या पाहणीदरम्यान माध्यमांशी बोलताना सांगितले.**

तपोवन परिसरात १५ फुटांच्या देशी झाडांची लागवड करून त्यांचे योग्य संगोपन करण्याचे नियोजन अंतिम करण्यात आले आहे. हैदराबादमधील राजमुंद्री येथील देशातील सर्वांत मोठ्या नर्सरीतून दोन दिवसांत सुमारे एक हजार उंच प्रौढ झाडे नाशिकमध्ये येणार असून, ती झाडे आल्यानंतर त्वरित रोपण प्रक्रिया सुरू होणार आहे. या रोपणावेळी मी स्वतः उपस्थित राहणार असल्याचे महाजन यांनी सांगितले.

पाहणीदरम्यान उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी फटकारले. सेंट्रल पार्कमध्ये विविध प्रजातींची झाडे लावण्यासाठी चार फुटांवर खड्डे खोदण्यात आले होते. यामध्ये वड, चिंच, निलगिरी, पिंपळ आदी झाडांचा समावेश होता. मात्र, चार फुटांच्या खड्ड्यांची पाहणी करताना महाजन यांनी उद्यान अधीक्षक भदाणे यांना सूचना देत १४ फुटांच्या अंतरावर झाडे लावल्यास भविष्यातील अडचणी टाळता येतील, असे स्पष्ट केले.

संपूर्ण महाराष्ट्रासह विविध राज्यांत सध्या नाशिकच्या तपोवनातील वृक्षतोडीच्या विरोधात सुरू असलेल्या आंदोलनाची चर्चा सुरू आहे. तपोवनातील वृक्षतोड थांबविण्यासाठी नाशिककरांसह वृक्षप्रेमी तसेच पर्यावरणप्रेमी एकवटले असून, हे आंदोलन दिवसेंदिवस तीव्र होत असताना, दुसरीकडे मात्र ना. महाजन यांनी अचानक सिडकोतील छत्रपती शिवाजी महाराज सेन्ट्रल पार्कची पाहणी करत पार्कमध्ये वृक्षारोपण करण्याबाबत सूचना करून तपोवनातील १८००हून वृक्षतोडीच्या मुद्द्यावरून लक्ष विचलित करत तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

ठेकेदाराचे बिल अडविल्याने कामाला संथ गती येत असल्याची तक्रारही मंत्री महाजन यांच्यासमोर मांडण्यात आली. यावर त्यांनी महापालिका अधिकाऱ्यांना एक दिवसात थकलेले बिल अदा करण्याचे आणि कामाला योग्य वेग देण्याचे निर्देश दिले. सेंट्रल पार्कच्या कामात कोणताही विलंब होऊ नये, विशेषतः आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर यासाठी सहा महिन्यांत काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या प्रकल्पासाठी निधीची कमतरता पडणार नाही, असेही महाजन यांनी स्पष्ट केले.


**MAG FINSERV** Loans for Better Living

**मॅग फिन्सर्व्ह कंपनी लि.**
"मॅग हाऊस", ललित मोहन बझार मागे लक्ष्मीनगर, फलटण.

**लिलाव नोटिस**

सर्व संबंधित कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला सूचित केले जाते की, आम्ही, मॅग फिन्सर्व्ह कंपनी लिमिटेड ('मॅग') अशा थकीत सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करत आहोत ज्यांनी नोंदणीकृत लिलाव सूचना आणि वारंवार स्मरणपत्रांद्वारे कळवूनही त्यांचे कर्ज नियमित केले नाही किंवा थकबाकी भरली नाही. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव 10.12.2025 रोजी दुपारी 2 वाजता ठिकाणी 'मॅग हाऊस', ललित मोहन बाजार, लक्ष्मी नगर, फलटण – 415523 येथे आयोजित केला आहे . बोलीदारांना 10 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 09.00 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत सोन्याच्या दागिन्यांची तपासणी करण्यासाठी आणि त्यांची बोली सादर करण्यासाठी आमंत्रित केले आहे. ठिकाण किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असेल तर) लिलाव केंद्रावर प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे नमूद केलेल्या तारखेला लिलाव आयोजित करता आला नाही किंवा त्याच दिवशी लिलाव पूर्ण झाला नाही, तर 'मॅग' पुढील कोणत्याही तारखेला त्याच अटी आणि शर्तीसह लिलाव आयोजित करण्याचा किंवा नंतर लिलाव आयोजित करण्याचा अधिकार राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला असेल, तर लिलावाशी संबंधित सर्व अटी नामनिर्देशित व्यक्ती / कायदेशीर वारसांना लागू असतील.

**नाशिक** विलास रामनाथ सूर्यवंशी (01062617622101), नितिन दत्तात्रेय सोनवणे (01062616950601), राहुल महेंद्र जायसवाल (01062607451305), संदीप वाल्मीक बर्वे (01062609145503), हिरेन मनसुखभाई देवलुक (01062613560203), बाळासाहेब रुंजाजी पगारे (01062612209603), शिवम जगदीश देशमुख (01062617218202), (01062616382604), मनोज चुन्नीलाल वर्मा (01062612615803), साहिल बिलाल पठान (01062614309502), निलेश विलास थेटे (01062614102604), निखिल उत्तम गरुड (01062614639503), कैलास शांताराम हांडगे (01062615508503), राजेंद्र विठ्ठल कपोते (01062615560201), कांचन राजेंद्र लाठे (01062615774701), वामन मंगला पाडवी (010626 17124001), प्रकाश मधुकरराव देशमुख (01062616212601), संगीता अनिल पवार (01062616687702), मीराबाई तुकाराम खोटरे (01062617278701), योगेश नगिनदास जेठवा (01062617469001), श्रुतेश जितेंद्र गोठी (01062617481101), महेश रोहिदास नागराळे (01062617643001), **कोपर खैरणे** सचिन मनोहर गवारे (01402615900001), मयूर सरजेराव गोळे (001402614857603), प्रियंका वैभव वाघमारे (01402615571903), अक्षय वसंत हिरगुडे (01402617541101), संकेत काशिनाथ धनराव (01402616475701), गणेश शांताराम यादव (01402617320701), सचिन भिकाजी पवार (01402617320801), (01402617416201).

लिलाव 'जसे आहे तिथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे आहे तसे' या तत्त्वांवर केला जाईल आणि 'मॅग' सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कार्टेज, वजन किंवा मूल्यांकन याबाबत कोणतेही प्रतिनिधित्व किंवा हमी देत नाही. 'मॅग' त्यांच्या पूर्ण विवेकबुद्धीनुसार, कोणतीही पूर्वसूचना न देता आणि कोणतेही कारण न देता लिलाव यादीतील कोणतेही खाते आणि कोणतीही कार्यवाही पुढे ढकलू शकते किंवा काढून टाकू शकते आणि कोणतेही कारण न देता कोणत्याही किंवा सर्व बोली किंवा ऑफर नाकारू शकते. कर्जदारांच्या तारण ठेवलेल्या दागिन्यांची माहिती आणि इतर तपशील संबंधित शाखेत प्रदर्शित केले आहेत. थकीत कर्जदारांना ही सूचना प्रकाशित झाल्यानंतरही लिलावाच्या तारखेपर्यंत व्याजासह आणि सर्व लागू शुल्कासह संपूर्ण देयके परत करण्याचा आणि त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय आहे, अन्यथा तारण ठेवलेले सोन्याचे दागिने लिलाव केले जातील आणि उर्वरित देयके (जर असतील तर) संपूर्ण व्याज आणि खर्चासह वसूल केली जातील. लिलाव प्रक्रियेनंतर सदर रक्कम समायोजित केली जाईल. या प्रकाशनाच्या दिवशी किंवा त्यानंतर बंद झालेल्या किंवा नियमित केलेल्या कर्जदारांना प्रमाणित प्रकाशन शुल्क भरावे लागेल. कर्जदारांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या नवीनतम बँक खात्याची माहिती सादर करावी / अपडेट करावी जेणेकरून जास्त लिलाव रक्कम, (जर असेल तर), वेळेवर परत करता येईल. सविस्तर माहिती, अटी आणि शर्तींसाठी, मॅग फिन्सर्व्ह कंपनी लिमिटेडच्या संबंधित शाखा कार्यालयाशी संपर्क साधा.

तारीख : ०५/१२/२०२५ — अधिकृत अधिकारी
स्थळ : फलटण — मॅग फिन्सर्व्ह कंपनी लि.



**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**वृक्षप्राधिकरण**
**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये**

**जाहीर नोटीस**

नाशिक महानगरपालिकेच्या हद्दितील नाशिक पंचवटी मनपा मालकीच्या रस्त्याच्या कडेची धोकादायक, मनपा उद्यानातील धोकादायक, रहदारीस अडथळा ठरणारी, महावितरण चे उच्चदाब व लघुदाब विद्युत वाहिनीवरील तारांना लागणाऱ्या तसेच पथदिव्यांना व सिग्नलला अडथळा ठरणारी धोकादायक वृक्षांची छाटणी बाबत वर नमुद अधिनियमातील ८ (२) अन्वये वृक्ष प्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर करण्यात आले आहेत.

ज्याअर्थी, वृक्ष प्राधिकरणाकडे व वृक्ष अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेल्या वृक्ष छाटणी करणे वा नाकारणे या अर्जांबाबत अधिनियमातील कलम ८ (३) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन कमाल ०७ (सात) दिवस कालावधी मध्ये हरकती तथा सुचना मागविणेचे सुचित केले आहे. त्याअनुषंगाने अधिनियमातील अटी व शर्ती अधिन राहून प्राप्त अर्जाची छाननी झाल्यानंतर वृक्ष छाटणी करणे वा नाकारणे यापैकी जे शक्य असेल त्याबाबतचा प्रस्ताव वृक्ष अधिकारी पंचवटी यांचेमार्फत तयार करणेत येतील. तरी सदरचे अर्ज हे पंचवटी विभागीय कार्यालय उद्यान विभागात उपलब्ध असून प्राप्त अर्जापैकी वृक्ष छाटणी करणे वा नाकारणे प्रकरणी हरकती तथा सुचना असल्यास लेखी स्वरुपात पंचवटी विभागीय कार्यालय येथे जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांचे मुदतीत दयाव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

सही/-
विभागीय अधिकारी तथा वृक्ष अधिकारी (पंचवटी)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

जनसंपर्क/जा.क्र./३८२/२०२५
दि.०५/१२/२०२५
गोदा प्रदुषण टाळा, भविष्य संभाळा.



**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**वृक्ष प्राधिकरण**
**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८(३) अन्वये**

**जाहिर नोटीस**

नाशिक महानगरपालिका हद्दितील नवीन नाशिक विभागाअंतर्गत धोकादायक, वाळलेले व बांधकाम बाधित वृक्ष तोडणे/पुर्णरोपण/छाटणी बाबत वर नमुद अधिनियमातील कलम ८(२) अन्वये वृक्षप्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर करणेत आले आहेत.

त्याचप्रमाणे नाशिक महानगरपालिकेच्या हद्दितील नवीन नाशिक मनपा मालकीच्या रस्त्याच्या कडेची धोकेदायक रहदारीस अडथळा ठरणारी, विद्युत पथदिव्यांना व सिग्नलला अडथळा ठरणारी वृक्षांची छाटणी बाबत वर नमुद अधिनियमातील ८(२) अन्वये वृक्ष प्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर करण्यात आले आहेत.

ज्या अर्थी, वृक्ष प्राधिकरणाकडे व वृक्ष अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत अधिनियमातील कलम ८(३) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन कमाल ०७ (सात) दिवस कालावधी मध्ये हरकती तथा सुचना मागविणेचे सुचित केले आहे. त्याअनुषंगाने अधिनियमातील अटी व शर्ती अधिन राहून प्राप्त अर्जाची छाननी झाल्यानंतरच त्याबाबतचा **प्रस्ताव मा. वृक्ष प्राधिकरण सभा ठराव ३९ दिनांक २४/१२/२०१९ अन्वये** त्याबाबतचा अहवालासह वृक्ष अधिकारी नवीन नाशिक यांनी प्रस्ताव तयार केले आहे. सदरचे प्रस्ताव नवीन नाशिक विभागीय कार्यालय उद्यान विभागात उपलब्ध असून प्रस्तुत प्रकरणी हरकती तथा सुचना असल्यास लेखी स्वरुपात नवीन नाशिक विभागीय कार्यालय येथे जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांचे मुदतीत दयाव्यात, मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

जनसंपर्क/जा.क्र./३८१/२०२५
दि.०५/१२/२०२५

सही /-
वृक्ष अधिकारी तथा विभागीय अधिकारी,
न.ना विभागीय कार्यालय
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

गोदा प्रदुषण टाळा, भविष्य संभाळा.



**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ अन्वये अधिकार प्राप्त विशेष वसुली अधिकारी**
**नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन नाशिक**
व्दारा :- **फैज अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. नाशिक ता. जि. नाशिक**

**स्थावर मिळकत ताबा नोटीस जाहिरनामा - (नमुना झेड)**

(M. C.S. Act 1960 Sec.156M. C. S Rules 107 (11) (d)

विषय :-स्थावर मालमत्ता मिळकतीचा ताबा नोटीस जाहिरनामा (नमुना - झेड) (M. C.S. Act 1960 Sec.156M. C. S Rules 107 (11) (d)

**संदर्भ:-१)** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१, वसुली प्रमाणपत्र धारक कर्जथकबाकीदार/जामीनदार / संमतीदार/व इतर संबंधीत,
२) मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक ता. जि.नाशिकयांचे कार्यालयीन जा.क्र.३४८८/२०२५ दि.२५/०४/२०२५,नुसार प्राप्त कलम १५६ अधिकार पत्र.
३) सर्व संबंधीत कलम १०१ वसुली प्रमाणपत्र धारक कर्जथकबाकीदार/जामीनदार/संमतीदार व इतर यांना कलम १५६ अधिकारातील तरतुदी प्रमाणे कायदेशिरपणे वेळोवेळी कर्ज थकबाकी भरणा करणेबाबत पोस्ट रजि.एडी नुसार दिलेल्या झेड नमुना नोटीस
४)मा.तहसिलदार साहेब नाशिक/संबंधीत गाव सजा तलाठी/ग्राम पंचायत कार्यालय यांचेकडेस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०७ (१०) दिलेले स्थावर मिळकत जप्ती आदेश आणी सदर जप्ती बोजा आदेशा प्रमाणे संबंधीत शेत/प्लॉट/ घरे /यांचे मिळकती वर नमुद ७/१२ उतारा व इतर ठिकाणी मंजुर झालेल्या जप्ती बाबतच्या नोंदी.
५)दिनांक ०५/१२/२०२५, रोजी सर्व संबधीतांना दिलेल्या प्रतिकात्मक ताबा घेणे बाबत पोस्ट रजि.एडी.नुसार दिलेल्या झेड नमुना नोटीस.
६) संबंधीत कर्जदार/जामीनदार यांनी वेळोवेळी दिलेले अर्ज/पत्र व्यवहार.
७) मे.संचालक मंडळ यांनी मासिक सभेत वेळोवेळीकर्जथकबाकी वसुली कार्यवाहीबाबत केलेले ठराव.

वरील विषयांस व संदर्भास अनुसरून **फैज अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. नाशिक ता. जि.नाशिक** यांचे खालील प्रमाणे नमुद केलेले कर्ज थकबाकीदार/जामीनदार व इतर यांचे विरोधात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये उप निबंधक सहकारी संस्था नाशिक ता. नाशिक यांचे न्यायालया कडुन वसुली प्रमाणपत्र मिळालेले असुन सदर प्रमाणपत्रातील नमुद कर्ज थकबाकी रक्कम वसुली साठी संदर्भाप्रमाणे कलम १५६ अधिकारप्राप्त विषेष वसुली अधिकारी यांनी सर्व संबंधीतांना नोटीस बजावलेल्या आहेत आणी त्यानंतर संबंधीत सर्व मिळकतधारक व इतर यांना नमुद संदर्भा प्रमाणे प्रतिकात्मक ताबा दि.०६/१२/२०२५, पासून घेतलेला आहे.

सदरील मिळकत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ नियम १०७ (११-ड) या जाहिर नोटीसीव्दारे प्रतिकात्मक ताबा घेतलेला आहे. (सदर प्रतिकात्मक ताबा घेतलेबाबत झेड नोटीस वृत्तपत्रात जाहिर करतांना कर्जदार/ मिळकतदार/व इतर संबंधीत यांचे बद्यल संस्थेचे अथवा संबंधीतांचा कोणताही भेदभाव अथवा आकस/ वाईट हेतु नसुन फक्त सदर मिहकतीबाबत कोणीही देवान/घेवाण/तारण /वर्गवारी/ त्यासारखे व्यवहार न करता कर्जथकबाकी वसुली कार्यवाहीस अडचन येवु नये हाच एकमेव हेतू आहे.) ज्या मिळकतीचा झेड नोटिसव्दारे प्रतीकात्मक ताबा घेण्यात आला आहे त्या स्थावर मिळकतीची तपशीलवार माहिती खालील प्रमाणे.

| अ क्र | कलम १०१ वसुली प्रमाणपत्रधारक कर्जदार/जामिनदार व इतर संबंधितांचे नाव गाव | कलम १०१ वसुली दाखला क्र.दि. व रक्कम | प्रतिकात्मक ताबा घेतलेल्या स्थावर मिळकतीचे वर्णन व जप्ती बोजा नोंद क्र. व दि. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | कर्जदार पटेल मोहंमद सलीम हैदरअली जामीनदार- पटेल दुर्रेशावर मोहमंद सलीम जामीनदार - मिर्झा इम्राण बेग निसार बेग सर्व रा. नाशिक ता. जि. नाशिक | ८२७३/२०२२, दि. २२/०९/२०२३ रक्कम रु.१,२५,९१४/- | तुकडी जिल्हा नाशिक ता. नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे नाशिक शहर येथील भूमापन क्र.सि.स.क्र.३९९०/ब यांसी एकूण क्षेत्रफळ ४०.१० चौ.मी.पैकी त्यांचे हिस्सांचे क्षेत्र | कर्जदार पटेल मोहंमद सलीम हैदरअली यांचे कर्जाकरिता कर्जदार **पटेल मोहंमद सलीम हैदरअली** यांची स्वमालकीतील हिस्साची मिळकत जप्त |

तरी वरील प्रमाणे कर्जथकबाकीदार/जामीनदार/मिळकतदार इतर संबंधीत यांना सुचित करण्यात येते की, १० वसाच्या आत कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्रनुसार कर्ज थकबाकी रक्मेचा वर नमुद संस्था कार्यालयात समक्ष येवुन संपुर्ण भरणा करून तशी जमा पावती घेवुन आपल्याकडील कर्जथकबाकी **(NIL)** निरंक करूण सदर कर्ज वसुलीची कार्यवाही थांबवुन संस्थेला सहकार्य करावे.

अन्यथा सदर मिथ्कतीचा जाहिर लिलाव करणेसाठी मे. उप निबंधक सहकारी संस्था नाशिक ता. जि. नाशिक, यांचे न्यायालयात कलम १०७ (१०) अन्वये जप्ती आदेश नोंद असलेल्या वरील स्थावर मिळकती बाबतचे अपसेट प्राईज /वाजवी मुल्यांकन प्रस्ताव मंजुरी साठी दाखल करण्यात येतील आणी त्यापोटी होणारा खर्च देखील आपणाकडून वसुल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**दिनांक :-०६/१२/२०२५, स्थळ :- नाशिक**

**पठाण आर.अ.**
**विशेष वसुली अधिकारी**
**( सहकार कायदा १९६० चे कलम १५६ अन्वये अधिकार प्राप्त)**
**नाशिक जि. ना. सह. पत. सह. फेडरेशन मर्यादित नाशिक**
**व्दारा :- फैज अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. नाशिक ता. जि. नाशिक.**

# मदतीसाठी प्रस्तावच नाही!

केंद्रात व राज्यात एकाच विचाराच्या, एकाच पक्षाच्या, एकाच आघाडीच्या सरकारला डबल इंजिन सरकार म्हणण्याची एक प्रथा भाजपाने पाडली आहे. तसे म्हटले, तर स्वातंत्र्यानंतर देशात व अनेक राज्यांत काँग्रेसचीच सरकारे होती. तेव्हा डबल इंजिन सरकार म्हटले जात नव्हते. आजच्या संदर्भात त्या सरकारांना डबल इंजिन सरकार म्हटले पाहिजे. पण तसे म्हणण्याला काही अर्थ नाही. भाजपाची डबल इंजिन सरकारची संकल्पना वेगळी आहे. केंद्रात व राज्यांत एकाच पक्षाचे किंवा आघाडीचे सरकार असेल, तर विकास वेगाने होईल, हीच भाजपाची धारणा. मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी डबल इंजिन, ट्रिपल इंजिन सरकार, असा उल्लेख भाजपा व मित्रपक्षांकडून केला जातो. राज्यातील प्रश्न व समस्या दूर करण्यासाठी केंद्राकडून सहाय्य मिळेल, असे आश्वासन मतदारांना दिले जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबतीत ट्रिपल इंजिनचा उल्लेख करण्यात आला. महाराष्ट्रात आजमितीला डबल इंजिन सरकार आहे. यंदा राज्यात अतिवृष्टीने थैमान घातले, पुराने कहर केला, शेतमालाचे नुकसान झाले. शेतजमिनी खरडून वाहून गेल्या, जीवितहानी झाली, पशुधनाचे नुकसान झाले. घरांचे-दुकानांचे नुकसान झाले. राज्य सरकारने निकष लावून हजारो कोटींचे मदत पॅकेज जाहीर केले; परंतु डबल इंजिन सरकार असल्याने केंद्र सरकारकडून मोठ्या मदतीची अपेक्षा होती. केंद्राकडून मदत मिळेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणत होते. शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सांगत होते. दिवाळी गेली, पण केंद्र सरकारकडून मदत मिळाली नाही. राज्य सरकारने नुकसानीचा अहवालच पाठविला नसल्याने मदत देता आली नाही, असे केंद्र सरकारकडून २ डिसेंबर रोजी लोकसभेत सांगण्यात आले. अहवाल आल्याशिवाय मदत देता येत नाही, असेही केंद्राकडून सांगण्यात आले. याचा सरळ अर्थ डबल इंजिन सरकारमध्ये ताळमेळ नाही. डबल इंजिन सरकारचा महाराष्ट्रातील अतिवृष्टीग्रस्त व पूरग्रस्तांना फायदा झाला नाही. राज्य सरकारने ३१ हजार ६२८ कोटींचे मदत पॅकेज ८ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर केले होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील लोणी येथे कार्यक्रमास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दि. ५ ऑक्टोबर २०२५ रोजी आले होते. यावेळी आयोजित शेतकरी मेळाव्यात त्यांनी मदतीचे आश्वासन दिले होते. राज्य सरकारने नुकसानीचा अहवाल पाठवावा, अहवाल मिळाल्यानंतर लगेच मदत पाठवतो, असे त्यांनी सांगितले होते. शहा यांनी आश्वासन दिल्यानंतर केंद्राकडून मदत मिळविण्यासाठी राज्य सरकारमधील तिन्ही प्रमुख पक्षांच्या नेत्यांनी जोर लावला पाहिजे, असे आम्ही याच सदरात 'आता जोर लावा' या मथळ्याखाली ७ ऑक्टोबर २०२५ च्या अंकात म्हटले होते. राज्य सरकारने केंद्राला अहवाल पाठविला नाही आणि केंद्राने मदत केली नाही, असे आता लोकसभेत स्पष्ट झाले आहे. सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले. यानंतर राज्य सरकारकडून शेतकऱ्यांसाठी कोट्यवधींचे पॅकेज जाहीर करण्यात आले. मात्र, याची मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसल्याच्या तक्रारी होत्या. राज्य सरकारने अद्याप केंद्राकडे मदतीसाठीचा औपचारिक प्रस्ताव पाठवला नाही, अशी माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी लोकसभेत २ डिसेंबरला ओमराजे निंबाळकर व संजय देशमुख या खासदारांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाच्या उत्तरात दिली. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीसाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीतून मदत मिळवण्यासाठी राज्य सरकारकडून औपचारिक निवेदन मिळणे आवश्यक आहे, असे कृषिमंत्री चौहान यांनी स्पष्ट केले. केंद्रीय पथकाने ३ ते ५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान महाराष्ट्रातील पूरग्रस्त भागाचा दौरा केला. मात्र, पाहणी होऊनही राज्य सरकारकडून अंतिम प्रस्ताव अद्याप केंद्राला प्राप्त झालेला नाही. दि. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी केंद्र सरकारने आंतरमंत्रीय केंद्रीय पथक नियुक्त केले. या पथकाने ३ ते ५ नोव्हेंबरदरम्यान महाराष्ट्रातील पूरग्रस्त भागाची पाहणी केली. राज्य सरकारकडून औपचारिक निवेदन अद्याप केंद्राला प्राप्त झाले नाही. हे निवेदन मिळाल्यानंतरच एनडीआरएफमधून (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल) अतिरिक्त मदत देण्याचा निर्णय घेतला जाईल, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले. प्रश्न हाच आहे की, डबल इंजिन सरकारच्या एका इंजिनने (राज्य सरकार) दुसऱ्या इंजिनकडे (केंद्र सरकार) प्रस्ताव का पाठविला नाही? आपल्या राज्य सरकारची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक आहे. लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपये देण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. वेळीच प्रस्ताव पाठविला असता, तर केंद्र सरकारकडून थोडीफार मदत मिळाली असती, तर ३१ हजार ६२८ कोटींच्या पॅकेजचा राज्य सरकारच्या तिजोरीवर जो भार पडला, तो काही प्रमाणात कमी झाला असता. एका इंजिनने (राज्य) प्रस्ताव पाठविला नाही, असे दुसरं इंजिन (केंद्र) म्हणत असेल, तर डबल इंजिन सरकारचा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना लाभ झाला नाही. यावरून विरोधक डबल इंजिन सरकारवर टीका करणारच. तशी टीकाही करण्यात आली आहे. राज्य सरकारने प्रस्ताव का पाठविला नाही? हाच मूलभूत प्रश्न आहे. केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या माहितीनंतर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी राज्य सरकारवर कडक शब्दांत टीका केली. त्यांनी राज्य सरकारचा हा भामटेपणा असल्याचा आरोप केला. हा पैसा बिहारसाठी वापरण्यात आला काय? असा सवालही त्यांनी केला. केंद्रीय गृहमंत्री शहा यांनी ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात अहिल्यानगरचा दौरा केला होता. त्यावेळी राज्य सरकारने सविस्तर अहवाल पाठवल्यानंतर तत्काळ मदत देण्याचे जाहीर आश्वासन दिले होते. पण दोन महिने उलटून गेल्यानंतरही फडणवीस यांच्या सरकारने केंद्राकडे मदतीसाठी सविस्तर अहवाल पाठवला नाही, अशी माहिती गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी दिली. प्रस्ताव जर केंद्राकडे पाठवला नसेल तर याचे उत्तर राज्य सरकारने दिले पाहिजे. प्रस्ताव पाठवू नये म्हणून राज्य सरकारवर कोणाचा दबाव आहे काय? अशी शंका शेट्टी यांनी उपस्थित केली. जर मुख्यमंत्री याचे उत्तर देत नसतील, तर महाराष्ट्रात फिरत असताना शेतकरी त्यांना जाब विचारणार असल्याचा इशाराही शेट्टी यांनी दिला. पंतप्रधानांनी सांगूनही मुख्यमंत्र्यांनी प्रस्ताव पाठवला नाही, हे दुर्दैवी आहे, अशी टीका विधान परिषदेतील माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली. मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना भूलथापा मारल्या. केंद्र व राज्य सरकारला शेतकऱ्यांच्या सुख-दु:खाशी काहीही देणेघेणे नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांनी राणा भीमदेवी थाटात ३१ हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले होते. यातील किती पैसे शेतकऱ्यांना मिळाले, याची माहिती मिळाली पाहिजे. केंद्र व राज्यातील डबल इंजिन सरकार राज्यातील शेतकऱ्यांना देशोधडीला लावत आहे, असा आरोप दानवे यांनी केला. प्रस्तावच पाठवला नाही याबद्दल मुख्यमंत्र्यांनी जनतेची व शेतकऱ्यांची माफी मागायला हवी, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. अजित नवले यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी याप्रकरणी फडणवीस सरकारवर निशाणा साधला. राज्यातील संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी संपूर्ण कर्जमाफी करा, अशी आम्ही सर्वांनी मागणी केली आहे; परंतु हे सरकार कर्जमाफीबाबत गंभीर नाही, असे सुळे म्हणाल्या. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही याप्रकरणी सरकारवर टीका केली. सरकारने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल्याचे स्पष्ट होते. हे सरकार कुंभकर्णासारखे झोपल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे आमदार एकनाथ खडसे यांनीही याप्रकरणी फडणवीस सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले, ''केंद्राला प्रस्ताव पोहोचला नाही याचा अर्थ सरकार शेतकऱ्यांची टिंगलटवाळी करत आहे.'' राष्ट्रवादीचेच आमदार रोहित पवार यांनीही याप्रकरणी सरकारवर निशाणा साधला. राज्यातल्या शेतकऱ्यांची शेती, घरदारे अतिवृष्टीने उद्ध्वस्त झाली असताना नुकसान भरपाईसाठी केंद्र सरकारला मदतीचा प्रस्ताव पाठवण्याऐवजी हे सरकार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून आपले राजकीय घर मजबूत करण्यात व्यस्त आहे. आधी पॅकेजच्या नावाखाली शेतकऱ्यांना टोपी घालण्याचे काम केले आणि आता दोन महिने उलटून गेले तरी हे सरकार मदतीसाठी प्रस्तावही पाठवू शकत नसेल तर हे सरकार आहे की रयतेच्या जीवावर उठलेले रझाकार? असा सवाल आ. पवार यांनी उपस्थित केला. राज्याकडून प्रस्ताव आला नाही, असे केंद्र सरकार म्हणत आहे. याचा सरळ अर्थ प्रस्ताव पाठविला गेला नाही. त्यावरून विरोधक करत असलेली टीका काही वावगी ठरत नाही. पण डबल इंजिन सरकार शेतकऱ्यांना केंद्राची मदत देण्यात अपयशी ठरले आहे. महाराष्ट्र विधिमंडळात विरोधकांची ताकद तशी कमीच आहेत; परंतु विरोधक अभ्यासात कमी नाहीत. नागपूर येथे सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित होणार आहे. त्यावर सरकारला स्पष्टीकरण द्यावे लागेल.

# जग बदलणाऱ्या महामानवाचे महापरिनिर्वाण

देशातील गोरगरीब, वंचित, पीडित, शोषित व दलित समाजातील शूद्र व अतिशूद्र प्रवर्गातील लोकांना न्याय, समता, बंधुता आणि मानवता मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले पूर्ण आयुष्य बहुजन जनतेच्या कल्याणासाठी व भल्यासाठी अर्पण केले. केवळ बुद्धिमत्तेच्या जोरावर या देशात रक्तविरहित सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजनैतिक क्रांती करून दाखवली आहे.



बाबासाहेबांना वर्गात बसून शिकायला बंदी होती. त्यांना वर्गाच्या बाहेर बसून शिकावे लागले होते. तरीसुद्धा ते वर्गात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होत होते. घरी लाइट नसल्यामुळे संध्याकाळी रोडच्या दिव्याखाली अभ्यास करून बाबासाहेबांनी उच्च शिक्षणाचा पर्वत लीलया सर केला. त्यांच्या पत्नी रमाई आंबेडकर व सयाजीराव गायकवाड यांनी बाबासाहेब खूप शिकावेत म्हणून आर्थिक मदत केली. बालपणी बाबासाहेबांना जातीयतेचे विखारी चटके सहन करावे लागले होते. कुठे गाडीने जायचे म्हटले तर गाडीवान त्यांना गाडीत बसू देत नव्हता. शिक्षक बाबासाहेबांना जवळ येऊ देत नव्हते. त्यांचा गृहपाठ लांबूनच पाहायचे. वर्गातील मुले त्यांच्यापासून चार हात लांब राहायचे. तरीही बाबासाहेब त्यांच्याकडे दुर्लक्ष करून अभ्यासावर लक्ष केंद्रित करायचे आणि खूप अभ्यास करायचे.

अठरा तास अभ्यास व चिंतन करून बाबासाहेबांनी या जगात कोणीही शिक्षण घेतले नाही तेवढे शिक्षण घेऊन आणि अमाप पदव्या संपादन करून या देशातील तळागाळातील रंजल्या गांजलेल्या बहुजन समाजाला व गरिबीत खितपत पडलेल्या दु:खी, पीडित, शोषित, वंचित व मागासवर्गीय समाजाला भारतीय संविधान लिहून त्यांच्या न्याय्य हक्काची एकेक कलम घटनेच्या पानापानांत लिहून ठेवले. बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून बहुजन समाजाला समता, बंधुता व मानवता

**बुद्धभूषण कांबळे**
**७४९८७१५६६१**

प्राप्त करून दिली. त्यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून समतेचे बीज पेरले आणि देशात समता व मानवता चांगल्या प्रकारे रुजली. त्यांनी मनुस्मृती जाळून जगात सर्वोत्तम अशा भारतीय संविधानाची निर्मिती करून सर्व जातीधर्मांच्या लोकांना समान अधिकार देऊन देशात समता, मानवता व बंधुता रुजवण्याचे काम केले आहे.

हिंदू स्त्रियांच्या भल्यासाठी व कल्याणासाठी लिहिलेले हिंदू कोड बिल संसदेत नामंजूर होताच कायदेमंत्रिपदाला लाथ मारणारे डॉ. आंबेडकर हे जगातील एकमेव व्यक्ती होते. दिवाळी बोनस, गरोदरपणात स्त्रियांना घरी बसून पगार, कामगारांना कामाचे बारा तासांवरून आठ तास करणारे एकमेव कामगारांचे नेते डॉ. आंबेडकर आहेत. गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल, असे ते नेहमी म्हणायचे. बाबासाहेबांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा लाखमोलाचा संदेश बहुजन समाजाला देऊन जागृत करण्याचे काम केले आहे. बाबासाहेब म्हणायचे, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे.

जो कोणी प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. मागासवर्गीयांचे हक्क व अधिकार नाकारलेल्या मनुस्मृतीला डॉ. आंबेडकरांनी जाळले. बाबासाहेबांनी जी व्यक्ती १८ वर्षांची झाली आहे, त्या व्यक्तीला मतदानाचा अधिकार देऊन त्यांचा सन्मान वाढवला. मग तो गरीब असो की श्रीमंत, झोपडीत राहणार असो की महालात, प्रत्येकाला मताचा अधिकार देऊन या देशातील मनुवादी व्यवस्था नाकारून लोकशाही व्यवस्था प्रस्थापित केली.

आधुनिक भारताचे राष्ट्रनिर्माते असेसुद्धा बाबासाहेबांना म्हटले जाते. त्यांच्या अलौकिक कार्याला कोटी कोटी वंदन. या जग बदलणाऱ्या महामानवाचे महापरिनिर्वाण ६ डिसेंबर १९५६ ला झाले. शेवटपर्यंत तळागाळातील गोरगरीब जनतेच्या भल्यासाठी दिव्यासम जळणारा दिवा कायमचा शांत झाला. दलितांना आधार देणारा आधारस्तंभ कायमचा काळाच्या पडद्याआड गेला. गोरगरीब जनतेला सावली देणारा वटवृक्ष कायमचा उन्मळून पडला. बाबासाहेब केवळ दलितांपुरतेच मर्यादित नव्हते, तर त्यांनी समस्त भारतीयांसाठी भारतीय संविधान लिहून प्रत्येक जातीधर्मांच्या लोकांना मूलभूत हक्क व अधिकार देऊन त्यांना सक्षम बनवण्याचे काम केले आहे. अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात शिकून गेलेल्या हजारो विद्यार्थ्यांपैकी सर्वांत ज्ञानी व बुद्धिवान विद्यार्थी कोण? असा अहवाल प्रसिद्ध केला होता. त्यात जगातील सर्वांत बुद्धिवान व हुशार विद्यार्थी म्हणून डॉ. आंबेडकरांचे नाव आघाडीवर आहे. संपूर्ण जग बाबासाहेबांना सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून ओळखते. बाबासाहेबांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना कोटी कोटी वंदन! शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, उजाड रानी किमया केलीस मोठी, भीमा तुझं प्रणाम कोटी कोटी!!

# जो कधी चुकला नाही, त्याला माणूस म्हणावे तरी कसे?

मनुष्य हा चुकीचा पुतळा आहे. जो कधी चुकतच नाही तो माणूसच नाही, असे म्हटले तर ते अनुचित ठरणार नाही. कारण पृथ्वीतलावर प्रत्येक माणूस जीवनात कधी ना कधी तरी चुकतोच. चुका स्वीकारून आणि चुका सुधारून जीवनात योग्य असा बदल करणे आणि योग्य दिशेने वाटचाल करणे प्रत्येक माणसाचे परमकर्तव्य असते.

मानवी जीवनात चुका होणे स्वाभाविक असते. जीवनात झालेल्या चुका सुधारून योग्य दिशेने मार्गक्रमण केल्यास यश नक्की पदरात पडतेच. फक्त त्यासाठी माणसाने थोडा धीर धरायला हवा व संयम ठेवायला हवा. बालपणापासून ते म्हातारपणापर्यंत माणूस जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर कळत नकळतपणे चुका करतच असतो. एखादा मनुष्य खूप ज्ञानी व बुद्धिवान प्राणी आहे. त्याने उच्च शिक्षणाचा पर्वत लीलया सर केला आहे. तो मोठ्या पदावर मोठा अधिकारी आहे. त्याने खूप पुस्तकांचे वाचन करून ज्ञान ग्रहण केले आहे. त्याच्याकडे प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान आहे. तो ज्ञानसम्राट व बुद्धिसम्राट म्हणून ओळखला जातो. म्हणून अशा ज्ञानी व गुणी माणसांकडून चुका होणार नाहीत असे म्हणणे चुकीचे ठरणार आहे. मानवी जीवनात आलेले अपयश हे माणसाच्या चुकीमुळेच येत असते. माणसाने अभ्यास कमी केल्यामुळे व पुस्तकांचे वाचन कमी केल्यामुळे माणूस परीक्षेत नापास होतो. माणसाच्या जीवनात अपयश येते म्हणजेच माणूस कुठेतरी चुकतो आणि त्यामुळेच यशाला मुकतो.

जीवनात एखादी चूक झाल्यामुळे व त्या चुकीतून अपयश आल्यामुळे माणसाने खचून न जाता व हिंमत न हारता खूप खूप अभ्यास करून व जीवनाची वाटचाल योग्य दिशेने करून यशाला काबीज करणे माणसाचे परमकर्तव्य असते. जीवनात एक-दोन चुका झाल्यामुळे माणूस संपतो असे नाही, जो माणूस झालेल्या चुका स्वीकारून व आलेल्या अपयशाला पचवून जिद्दीने पेटून उठतो आणि यशाला पादाक्रांत करतो तो माणूस खरा माणूस म्हणून ओळखला जातो. या जगात ज्या माणसाच्या हातून एकही चूक झाली नाही



असा माणूस दुर्मिळ असेल किंवा कदाचित नसेलही. पृथ्वीतलावर मनुष्यप्राणी सोडून इतर जेवढे काही प्राणी आहेत, त्या प्रत्येक प्राण्याने त्याच्या जीवनात कधी ना कधीतरी कळत नकळतपणे चुका केलेल्याच असतात. लहानपणी माणसाचे मन एक खुली किताब असते.

आपल्या सभोवताली जे काही घडत आहे, मग ते चांगले असो वा वाईट ते मन लावून वेचण्याचे काम माणसाचे बालमन करत असते. एखादा मनुष्य जीवनात चुकला म्हणून त्याला कठोर शिक्षा देणे मला तर चुकीचे वाटते. जीवनात चुका तर होतच असतात. फक्त झालेल्या चुकीचे अपयशातून यशात रूपांतर करून जीवनात यशस्वी व्हायचे असते. माणसाला एखादे ठराविक ईप्सित साध्य करायचे असेल तर अगोदर हजारो चुका सहन कराव्या लागतात, तेव्हा कुठे माणसाला इच्छित फळ मिळते. जीवनात शंभर चुका झाल्या म्हणजे सर्व काही संपले असे होत नाही. तर त्या शंभर चुकांचा अनुभव घेऊन १०१ वेळा यशाला पायाशी लोळण घ्यायला लावणे, हा माणसाचा खरा पुरुषार्थ असतो. या जगात जेवढे काही महापुरुष, संत, महात्मे, राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री, खासदार असो वा आमदार या प्रत्येकाने त्या पदावर जाण्याआधी खूप वेळा चुका केलेल्या असतात. म्हणजेच त्यांना खूप वेळा अपयशाला सामोरे जाऊन यशाला गवसणी घातलेली असते. म्हणून मित्रांनो, जीवनात स्वतःच्या चुकीमुळे आलेल्या अपयशाला न घाबरता व न डगमगता मोठ्या हिमतीने त्या अपयशावर मात करावी आणि आपली चूक सुधारावी. चुकीतून अपयश आणि अपयशातून यश असे एकानंतर एक येतच असते.

राजकारणी, उद्योजक, खेळाडू, डॉक्टर, अभियंता व चित्रपटातील अभिनेता व अभिनेत्री बनण्यासाठी माणसाला जीवनात खूप वेळा चुकावे लागते. खूप खूप संघर्ष करून, जीवनात झालेल्या चुका सुधारून यशाला आपल्याकडे खेचून आणलेले असते. दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत एखाद्याच्या वाट्याला अपयश आले म्हणून त्याने खचून न जाता आपल्याला जीवनात अपयश कशामुळे आले? आपण जीवनात कोणत्या कोणत्या चुका केल्या? याची पडताळणी करून व झालेल्या चुका सुधारून परत जोमाने अभ्यासाला लागावे आणि यशाला आपल्या पदरात पाडावे.

एखादा राजकीय उमेदवार निवडणुकीत पराभूत झाला म्हणून त्याने आपले सगळे संपले, असा विचार करणे साफ चुकीचे आहे. आपण निवडणुकीत पराभूत झालो हे मान्य करून, आपण निवडणुकीत कशामुळे पराभूत झालो? आपण काय काय चुका केल्या? या सर्व गोष्टींचा विचार करून आणि त्या चुकांना सुधारून पुढील वाटचाल केली पाहिजे. नक्कीच यश तुमच्या पायाशी लोळण घेतल्याशिवाय राहणार नाही. काही महाभाग एखाद्या क्षेत्रात अपयश आले म्हणून प्रयत्न करायचे सोडून देतात किंवा जीवाचे बरे-वाईट करून घेतात. त्यांना हे कळत नाही की जीवनात तोच चुकतो जो काहीतरी बनण्याचे प्रयत्न करतो. फक्त आपल्याला गरज आहे,

ती आपल्या वाट्याला आलेल्या चुका सुधारून त्या अपयशाचे यशात रूपांतर करून जीवन ध्येय काबीज करण्याची. परीक्षेत कित्येक वेळा अपयश आलेली मुले अपयश कशामुळे व का आले? म्हणून त्या चुका शोधतात आणि त्या चुकांची दुरुस्ती करून पुन्हा मैदानात उतरतात आणि आपले ठराविक ध्येय साध्य करतात. चूक, अपयश आणि यश या तिघांचा संबंध फार जवळचा आहे. एखादी चूक झाली म्हणून घाबरून आपली दिशा बदलायची नसते, तर ती चूक सुधारून पुन्हा नव्याने जीवनाच्या ध्येयाकडे वाटचाल करायची असते. जो कधी चुकला नाही त्याला माणूस म्हणावे तरी कसे?

# बाबासाहेब, केवळ तुमच्यामुळे...

सहा डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेब तुमचे महापरिनिर्वाण झाले आणि सारे जग दु:खाच्या महासागरात बुडाले. तुमच्या निधनाची वार्ता सगळीकडे वेगाने पसरली आणि भारतातील दीनदलित, शोषित, पीडित आणि वंचित असलेली बहुजन जनता दु:खावेगाने ढसाढसा रडली. बाबासाहेब, तुम्ही बहुजनांना माणसांत आणून बसविले, मानसन्मान मिळवून दिला.

जातीधर्माचे ठेकेदार दीनदलितांना, शोषितांना गुलामासारखे वागवत होते. अतोनात छळ करत होते. त्यांना शिक्षणापासून दूर ठेवले जायचे. गावकीच्या कामासाठी मुक्या जनावरांसारखा त्यांचा पुरेपूर वापर केला जायचा. स्त्रियांची अवस्था तर शब्दांत वर्णन न करता येणारी होती. बाबासाहेब तुम्ही परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेतले, बॅरिस्टर झालात. समाजाचे, मानवतेचे, सर्व विषयांचे व अर्थशास्त्राचे डॉक्टर झालात. भारतात येऊन तुम्ही चवदार तळ्याचा सत्याग्रह केला आणि सार्वजनिक ठिकाणी आम्हाला पाणी पिण्याचा अधिकार मिळवून दिला. तुम्ही नाशिकचा श्री काळाराम मंदिर सत्याग्रह केला आणि आम्हाला समतेचा अधिकार मिळाला. मनुस्मृतीचे जाहीर दहन करून भारतातील अनेक दुष्ट रूढी-परंपरा मोडीत काढल्या आणि दीनदलित व स्त्रिया मानव म्हणून ओळखले जाऊ लागले.

मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, समता आणि प्रबुद्ध भारत अशा वर्तमानपत्रांतून आपण क्रांतिकारी विचारांची पेरणी केली. वंचित, शोषित आणि पीडित लोकांच्या हक्कांसाठी जनजागृती केली. ब्रिटिशांच्या देशात जाऊन तेथील गोलमेज परिषदेत दीनदलितांच्या उद्धारासाठी, हक्कांसाठी मानवतावादी विचार व ध्येय-धोरणांची परखडपणे मांडणी केली. द प्रॉब्लेम ऑफ रुपी या तुम्ही लिहिलेल्या शोधप्रबंधावर आधारित भारतात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली. भारतीय राज्यघटनेच्या मसुदा

**बबन गुळवे**
**९७३०९३९७३२**

समितीचे अध्यक्ष झालात आणि भारताचे संविधान लिहून भारतात सामाजिक, शैक्षणिक, कृषी, औद्योगिक, आर्थिक क्रांती केली. भारतात संविधानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता व न्याय ही मूल्ये रुजवलात. तुमच्या सामाजिक क्रांतीमुळे जातीयतेची तीव्रता व रूढी मोडीत निघाली. तळागाळातील माणसांना माणूस म्हणून ओळखले जाऊ लागले. मागासवर्गीयांच्या सावलीचा, थुंकीचा, पायाच्या ठशांचा व स्पर्शाचा विटाळ बंद झाला. बाबासाहेब हे सगळं शक्य झाले ते केवळ तुमच्या सामाजिक लढ्यामुळेच. सर्व भारतीयांना मग तो पुरुष असो वा स्त्री सर्वांना एका मताचा अधिकार देऊन लोकशाही प्रस्थापित केलात. आरक्षणाची कवचकुंडले देऊन तळागाळातील लोकांना प्रगतीची संधी उपलब्ध करून दिली. बहुजन जनता व स्त्रियांच्या जीवनाचे सोने झाले.तुम्ही हिंदू कोड बिल आणले आणि स्त्रियांना पुरुषांइतके अधिकार मिळाले. शेतकरी, कामगार, मजूर आणि नोकरदार यांच्यासाठी व त्यांच्या हक्कांसाठी कणखरपणे लढलात. म्हणून ६ डिसेंबरला तुमच्या महापरिनिर्वाणदिनी चैत्यभूमीवर तुमच्या पुढे नतमस्तक होण्यासाठी आंबेडकर अनुयायांचा जनसागर उसळतो. बाबासाहेब तुमचे सामाजिक व वैचारिक कार्य इतके उत्तुंग आहे की, तुम्ही जगाच्या व्यासपीठावर सामाजिक कार्याचे धगधगता ज्वालामुखी म्हणून ओळखले जात आहात.

समतेचे, मानवतेचे, लोकशाहीचे, बंधुतेचे,न्यायाचे व मानवतावादी विचारांचे तुम्ही महानायक आहात. काही धर्मांध लोक लोकशाहीला धोक्यात आणू पाहत आहेत. त्यांना समता, बंधुता, न्याय, मानवता, सर्वधर्मसमभाव या संकल्पना खटकत आहेत. म्हणून आज विषमतेचे विखारी वारे वाहू लागले आहेत की काय, अशी भीती वाटत आहे. धर्मांध लोकांच्या बहकाव्यात येऊन काही मूर्ख व निर्बुद्ध लोक अमानुषता पेरू पाहत आहेत. परंतु बाबासाहेब तुमचे विचार, तुमचे समाजकार्य आणि लढण्याची वृत्ती आजही आम्हाला प्रेरणादायी आहेत.

तुमचे समतावादी व मानवतावादी विचार सर्वांचे कल्याण करणारे आहेत. जोपर्यंत पृथ्वीवर मनुष्य जमात जिवंत असेल तोपर्यंत तुमचे विचार, समाजकार्य व सामाजिक लढा सगळ्या पिढ्यांना प्रेरणा देत राहील. छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम, संत कबीर, महात्मा जोतिराव फुले आणि तथागत गौतम बुद्ध यांच्यापासून प्रेरणा घेऊन व त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून तुम्ही जी सामाजिक, शैक्षणिक, न्यायिक क्रांती घडवून आणली ती क्रांती अलौकिक, अद्वितीय आणि अविस्मरणीय आहे. महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने आपणास कोटी कोटी वंदन!

# शौर्यजागृती शिबिरे राज्यभरात व्हावीत!

स्त्रीला शक्तिस्वरूप मानून तिचे पूजन करणारी आपली भारतीय संस्कृती आहे, ज्यामुळे तिची भुरळ साऱ्या जगाला आहे. गेल्या काही वर्षांत मात्र राज्यासह देशात स्त्री अत्याचाराचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. सहा महिन्यांच्या बालिकेपासून ८५ वर्षांची वृद्धाही नराधमांच्या वासनेला बळी पडू लागली आहे. एका अहवालानुसार, मागील तीन वर्षांत देशभरात दहा लाखांहून अधिक मुली बेपत्ता झाल्या आहेत. त्यांपैकी सर्वाधिक मुली महाराष्ट्रातील आहेत.

अर्थात, ही केवळ अधिकृत आकडेवारी असून, प्रत्यक्ष आकडा याहून कितीतरी अधिक असू शकतो. आज कोणतेही क्षेत्र महिलांसाठी सुरक्षित नाही. ज्यांच्यावर डोळे झाकून विश्वास ठेवावा अशा पोलीस, शिक्षण, न्याय आणि वैद्यकीय क्षेत्रातही स्त्रियांवर अत्याचार झाल्याच्या घटना वाचनात येतात. जीवनात प्रतिकूल वेळ कधी सांगून येत नाही, यासाठी स्त्रियांनी सतत सावध आणि प्रतिकारक्षम असायला हवे आणि त्यासाठी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षमही असायला हवे. राज्यावर चाल करून आलेल्या शत्रूवर प्रसंगी स्त्रियाही

**मोक्षदा घाणेकर**
**मुंबई**

तुटून पडल्याच्या घटना आपण इतिहासात अभ्यासल्या आहेत.

सध्याचा प्रतिकूल पाहता स्त्रियांनीही केवळ व्यावहारिकदृष्ट्या सक्षम असून चालणार नाही, तर आपल्यातील शारीरिक आणि मानसिक बळही त्यांना वाढवावे लागेल. हाच विचार समोर ठेवून भागीरथी महिला संस्था आणि सव्यसाची गुरुकुलम यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापुरात हिंदू जनजागृती समितीने ७ डिसेंबरला शौर्य जागृती प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केल्याचे वृत्त वाचनात आले. कोल्हापुरातील पद्माराजे गर्ल्स हायस्कूल येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात एक हजाराहून अधिक युवतींना विनामूल्य स्वरक्षण प्रशिक्षण दिले जाणार आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावर खेळ आणि शौर्य यात नावलौकिक मिळविलेल्या नामवंत तज्ज्ञ महिला मान्यवरांचे मार्गदर्शन शिबिरार्थींना मिळणार आहे. शौर्य प्रशिक्षण देण्यासाठी शंभरहून अधिक पारंगत प्रशिक्षक या शिबिरात सहभागी होणार आहेत. राज्यात प्रथमच अशाप्रशिक्षण शिबिराचे आयोजन होत असून, अशा स्वरूपाची शिबिरे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यांत घेण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता राज्य शासनाने सहकार्य करण्याची गरज आहे.

## व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा नको

धार्मिक पेहराव बंदीवरून विद्यार्थिनींचे गोरेगावात आंदोलन हे वृत्त वाचले. विवेक विद्यालय कनिष्ठ महाविद्यालयाने कपड्यांबाबत आचारसंहिता लागू करणे मुळातच चुकीचे आहे. इतरत्र कुठेही आचारसंहिता लागू नसताना या महाविद्यालयात मुलींनी बुरखा, अथवा नकाब घातल्यास विद्यार्थिनींना प्रवेश नाकारणे, हा मूर्खपणा आहे. कोणीही आपल्या धर्म, संस्कृती व परंपरेनुसार जर त्या प्रकारचा पेहराव घालून येत असेल, तर त्यात आक्षेप घेण्याचे काहीच कारण नाही. लोकशाहीत व्यक्तिस्वातंत्र्य आहे. त्यानुसार त्यांनी कोणते कपडे घालावेत अथवा घालू नयेत, हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. नको त्या बंधनात अडकवून त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणू नये. **- गुरुनाथ मराठे**

**जनमनाचे प्रतिध्वनी**

## डिजिटल सातबारा, ८-अ, फेरफार उतारे स्वागतार्ह निर्णय

राज्य शासनाच्या महाभूमी संकेतस्थळावरून काढलेले डिजिटल स्वाक्षरीसह क्यूआर (क्विक रिस्पॉन्स) कोड आणि १६ अंकी पडताळणी क्रमांक असलेले सातबारा, ८-अ व फेरफार उतारे आता अधिकृत आणि वैध ठरणार आहेत. यासाठी फक्त १५ रुपयांचे शुल्क भरायचे असून, आता त्यावर तलाठ्याच्या सही आणि शिक्क्याची गरज नाही.

हे सर्व डिजिटल उतारे अधिकृत आणि कायदेशीर असतील आणि सर्व प्रकारच्या शासकीय, निमशासकीय, बँकिंग आणि न्यायालयीन कामांसाठी पूर्णपणे वैध मानले जातील. या अनुषंगाने शासनाकडून नुकतेच पत्रक जारी करण्यात आले आहे. वास्तविक शासनाच्या सर्वाधिक लोककल्याणकारी योजना महसूल व कृषी खात्यामार्फत राबवल्या जातात. यात तलाठ्यांची भूमिका महत्त्वाची असते; परंतु तलाठ्यावर कोणाचाही वचक नसल्यामुळे व ते हवे तेव्हा जागेवर भेटत नसल्याने नागरिकांना सातबारा, ८-अ व फेरफार उतारे मिळविण्यासाठी मोठी कसरत करावी लागते.

शासनाच्या या स्वागतार्ह निर्णयामुळे आता नागरिकांचा तलाठी कार्यालयात उतारे मिळविण्यासाठी वारंवार गेल्यामुळे वेळ वाया जाणे, पैसा खर्च होणे आणि मनस्ताप होणे टळेल. नागरिकांच्या वेळेचा अपव्यय, मानसिक त्रास व आर्थिक नुकसान टाळणारे डिजिटल सातबारा, ८-अ व फेरफार उतारे हे अधिकृत आणि शासनमान्य केल्याबद्दल शासनाचे आभार!

**- प्रदीप मोरे, मुंबई**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन

संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस

संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस

मुख्य कार्यालय :'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६

विभागीय कार्यालये :

सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.

मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००

दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.

'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.

e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com

RNI REG. No.1934/57

# सावळ, कोटंबी घाट लवकरच वाहतुकीसाठी बंद

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक-पेठ-धरमपूर राष्ट्रीय महामार्गावरील सावळ व कोटंबी घाट लवकरच वाहतुकीसाठी बंद केला जाणार आहे. घाटातील जवळपास सहा किलोमीटरच्या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येणार आहे. साधारणत: १५ डिसेंबरनंतर या कामाला प्रारंभ होण्याची शक्यता आहे. घाटातील काम तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वाहतूक वळवण्यासाठी योग्य ठिकाणी सूचनाफलक लावावेत व सावळ्यापोवळ्या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, असे आदेश जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिले.

नाशिक-पेठ-धरमपूर या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८४८ वर सतत वाहतूक कोंडी होते. या मार्गावर रस्ते अपघात आणि होणारे मृत्यू टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी प्रसाद यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत दिले.

बैठकीला राष्ट्रीय महामार्ग विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महामार्ग पोलीस, वाहतूक शाखा, प्रादेशिक परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८४८ गोळशी फाट्याजवळील सावळ्या- पोवळ्या हा ब्रिटिशकालीन रस्ता असून, तो करंजाळीच्या अगोदर ३.८ कि.मी मुख्य रस्त्याला जोडतो. या रस्त्याच्या खडीकरणाचे काम झाले आहे. सेकंड लेअरचे काम सुरू असून, ते दोन महिन्यांत पूर्ण होणार आहे, अशी माहिती बैठकीत देण्यात आली. सावळ व कोटंबी घाटातील रस्त्याच्या कामासाठी जवळपास तीन ते चार महिने लागण्याची शक्यता बैठकीत व्यक्त करण्यात आली. त्यामुळे या मार्गावरील रत्याचे काम होत नाही तोपर्यंत नाशिकहून गुजरातला भाजीपाला घेऊन जाणाऱ्या वाहनांनी सापुतारामार्गे जाण्याबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीने कार्यवाही करावी, असे निर्देशही यावेळी देण्यात आले.

जिल्हाधिकारी प्रसाद यांनी पेठ-धरमपूर महामार्गावरील सावळ व कोटंबी घाटाबाबत यापूर्वी झालेल्या बैठकांची माहिती जाणून घेत कामाबाबत काही विशेष सूचनाही केल्या. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सावळ व कोटंबी घाटामधील काम पुढील १५ दिवसांत सुरू करावे. राष्ट्रीय महामार्गावरील घाटातील काम पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत पूर्ण होणार असल्याने या महामार्गावरून सुरू असलेली वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यासाठी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी आठवडाभरात कार्यवाही करावी, असे निर्देश प्रसाद यांनी दिले. या मार्गावरील वाहतूक वळविण्यासाठी आवश्यक त्याठिकाणी फलक लावण्याची जबाबदारी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व परिवहन विभागाने समन्वयाने पार पाडावी. असे निर्देशही यावेळी देण्यात आले.

### वाहतूक कोंडीची प्रमुख कारणे

अरुंद रस्ते : घाटातील रस्ते अरुंद (५.५ ते ७ मीटर) असल्याने मोठ्या वाहनांना अडचण होते. वाहनांचा बिघाड : घाटात एखादा ट्रक किंवा अवजड वाहन नादुरुस्त झाल्यास रस्ता अरुंद असल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. रस्ता रुंदीकरणाचे काम : सध्या सुरु असलेल्या कामामुळे अनेक ठिकाणी वाहतूक वळवण्यात आली आहे किंवा एकेरी करण्यात आली आहे. खराब हवामान : पावसाळ्यात रस्त्यांवर खड्डे पडल्यामुळे किंवा भूस्खलनामुळे वाहतुकीत अडथळे येतात.

(पान १ वरून)....

## मेक इन इंडिया मिशनला बळ मिळणार :मोदी

पंतप्रधानमोदी म्हणाले की, 'ऊर्जा सुरक्षा हा भारत-रशियातील व्यापाराचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. नागरी अणुऊर्जेतील दशकांपूर्वीचे सहकार्य आमच्या स्वच्छ ऊर्जा गरजांना पूर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण राहिले आहे. आम्ही पुढेही हे सहकार्य चालू ठेवू. जगभरातील सप्लाय चैन सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वाच्या खनिजांमधील आमचे सहकार्य महत्त्वाचे आहे.

## राज्यातील सर्व निवडणुका ३१ जानेवारीपूर्वी घ्या

नकार दिला आहे.२ तारखेला झालेल्या मतदानाची मतमोजणी कोणत्याही परिस्थितीत २१ च्या पुढे ढकलली जाणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने २१ तारखेला होणारी मतमोजणी लवकर घ्यावी अशा स्वरूपाचे आदेश दिलेले नाहीत.गेल्या काही वर्षांपासून अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका विविध कारणांमुळे पुढे ढकलल्या जात होत्या. यामुळे नागरिकांमध्ये तसेच जनप्रतिनिधींमध्येही प्रचंड अस्वस्थता आणि संभ्रम निर्माण झाला होता. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या या ताज्या आदेशामुळे आता ही भीती संपुष्टात आली आहे. या आदेशामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला स्पष्ट दिशा मिळाली असून, निवडणुका पुन्हा अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडणार नाहीत, याचा भरोसा मिळाला आहे. निवडणूक आयोगाने दिलेली वेळमर्यादा काटेकोरपणे पाळावी.

## राज्यातील ६० हजार शाळा बंद

पुनर्विचार याचिका दाखल करावी व आपली भूमिका मांडावी अशी मागणी शिक्षक संघटनांची आहे. त्यासोबतच शैक्षणिक वर्षाच्या मध्यावधीत संचमान्यतेचे अन्यायकारक निकष लावून हजारो शिक्षकांना अतिरिक्त ठरवले जात आहे. विषयाला शिक्षक उरणार नाही. अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन झाल्याने शाळांचे संपूर्ण नियोजन कोलमडणार आहे. **१० डिसेंबरला धरणे आंदोलन:** शिक्षक संघटनासोबत नागपूर येथे पार पडलेल्या बैठकीत शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा करून राज्य शासनाची भूमिका स्पष्ट करण्याचे आश्वासन दिले होते परंतु त्याबाबत कोणतेही परिपत्रक शिक्षण विभागाने काढलेले नाही. शैक्षणिक वर्षाच्या मध्यावधीत संचमान्यतेचे अन्यायकारक निकष लावून हजारो शिक्षकांना अतिरिक्त ठरवले जात आहे. विषयाला शिक्षक उरणार नाही. अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाच्या प्रक्रियेला स्थगिती देण्याची मागणी सर्व संघटनांनी केलेली आहे. शिक्षण विभागाने टीईटी सक्ती व अन्यायकारक संच मान्यतेचा जीआर रद्द करण्याबाबत ठोस निर्णय घेऊन संघटनांना चर्चेसाठी न बोलावल्यास नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात १० डिसेंबरला शिक्षक भारती संघटनेच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात येईल अशी भूमिका घेतली आहे.

## सौरपंपासाठी १० हजार कोटी मंजूर

सोयही होणार असून, ग्रामीण भागात १ लाख रोजगार निर्मिती होणार असल्याचा दावाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. महाराष्ट्रामध्ये एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषीपंप बसवण्याच्या उच्चांकाचा जागतिक विक्रम झाला असून, त्याची नोंद गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये घेण्यात आली.

## पान मसाला, सिगारेटवर अतिरिक्त कर;

लष्कराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला सांगितलं होतं. तशी परिस्थिती पुन्हा निर्माण व्हावी, असं आम्हाला वाटत नाही,' असं सीतारामन म्हणाल्या.या विधेयकामुळे नागरी आरोग्याच्या सुविधा मजबूत करण्याचा मार्ग अधिक प्रशस्त झाल्याचं अर्थमंत्री सीतारामन यांनी म्हटलं. 'लोकांच्या आरोग्याशी संबंधित धोके कमी करण्याचा आमचा हेतू आहे. हा उपकर राष्ट्रीय सुरक्षेच्या आघाडीवर सहाय्यक ठरेल,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी अनेक विषयांवरील सरकारची भूमिका स्पष्ट केली.

## ॲड. पंडित यांची उच्च न्यायालयात याचिका

अतिक्रमण होऊ नये यासाठी हा प्रस्ताव आहे. माईस म्हणजेच मीटिंग इन्सेटिव्ह कॉन्फरस अँड एक्झिबिशन्ससाठी निविदा मागवण्यात आल्या आहेत. दोनशे कोटींच्या कामाच्या या निविदा आहेत. महापालिकेचा प्रस्ताव नियमबाह्य आहे. यात सर्वाधिक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, २०१७ पर्यंत तपोवनात नो डेव्हलपमेंट झोनचे आरक्षण होते. त्यानंतर महापालिकेने २०१७ मध्ये शहर विकास आराखड्यात हे क्षेत्र साधुग्राम म्हणून दाखवले आहे. त्याच ठिकाणी आता भारत मंडपम् म्हणजेच प्रदर्शन केंद्र साकारण्यात येणार आहे. नगररचना कायद्यानुसार आरक्षित जागेवर काहीच करता येत नाही. महापालिकेला आरक्षणाचा उद्देश बदलायचा असेल तर त्यासाठी नगररचना अधिनियमांतर्गत फेरबदल करावा लागतो. त्यासाठी नागरिकांच्या हरकती आणि सूचना मागवाव्या लागतील. त्यावर सुनावणी घ्यावी लागते आणि त्यासंदर्भातील प्रस्ताव राज्य शासनाच्या नगररचना विभागाकडे पाठवला जातो. साधुग्राम म्हणजे एकप्रकारचे निवासी क्षेत्र आहे. त्याठिकाणी साधू वास्तव्यास असताना हॉटेल, हॉस्पिटल तात्पुरत्या स्वरूपात उभारता येऊ शकेल; कुंभमेळ्यानंतर दहा वर्षे ही जागा साधुग्राम म्हणूनच आरक्षित राहणार असताना त्यावर प्रदर्शनासारखे व्यावसायिक उपक्रम राबवता येणार नाहीत. कारण तसे अनुज्ञेयच नाही. महापालिकेने आणि शासनाने विकास आराखड्यातील आरक्षण न बदलताच ही निविदा मागवल्याने आचर्य व्यक्त केले जात आहे. याच अनुषंगाने तपोवनातील वृक्षतोडीविरोधात मुंबई उच्च न्यायालयात मनसे शहर उपाध्यक्ष ॲड. नितीन पंडित यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. त्यावर लवकरच सुनावणी आहे.



## प्रभाग ३१ मध्ये भक्तिमय वातावरणात श्रीदत्त जयंती उत्सव सोहळा

**इंदिरानगर : वार्ताहर**

पाथर्डी फाटा परिसरातील प्रभाग क्रमांक ३१ मध्ये श्री गुरुदेव दत्त महाराज जयंतीचे औचित्य साधत पाथर्डी पंचक्रोशीतील सुप्रसिद्ध जागृत श्री शनैश्वर महाराज व हनुमान प्रतिष्ठान मंदिर येथे महाआरती, महाप्रसाद व भक्तिगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्यास माहिती अधिकार कायदा नाशिक जिल्हाध्यक्ष अनिल गायकवाड तसेच मर्दानी फाउंडेशनच्या अध्यक्षा ज्योती गायकवाड व शनैश्वर प्रतिष्ठानच्या माध्यमातून येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमासाठी माजी नगरसेवक अमोल जाधव, माजी नगरसेविका संगीता जाधव, पूजा शिवा तेलंग, शिवा तेलंग, अरविंद अथरडे, अजय पाटील, किशोर चौधरी, वैभव फेंडर, संजय हांडगे, पाठक, नितीन पवार, राऊत मामा,राजू जुन्नरे, कैलास सोनवणे, चेतन फेगडे यांसह परिसरातील अनेक मान्यवर व भाविक उपस्थित होते.

संस्थेच्या माध्यमातून याठिकाणी महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दत्त महाराजांची महाआरती करून झाली. त्यानंतर श्रीदत्त जन्मोत्सवाचा पाळणा मोठ्या भक्तिभावाने म्हणण्यात आला. याठिकाणी दत्त महाराजांच्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. अनिल गायकवाड व ज्योती गायकवाड यांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.भजनी मंडळाला भजनी वाद्य संच भेट देण्यात आला.या कार्यक्रमादरम्यान ख्यातनाम गायक प्रदीप वाघ, नितीन पारेवाला, वृषाली गोळे, ऊर्मिला शिंदे यांच्या भजनांचे सादरीकरण भाविकांना मंत्रमुग्ध करणारे ठरले.

## बीसीसीआयच्या विजय मर्चंट स्पर्धेसाठी नील चंद्रात्रेची महाराष्ट्र संघात यंदाही निवड

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या नील चंद्रात्रे याची बीसीसीआयच्या १६ वर्षांखालील विजय मर्चंट ट्रॉफी स्पर्धेसाठी यंदाच्या हंगामातही महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

मागील हंगामात सुरत येथे झालेल्या १६ वर्षांखालील विजय मर्चंट ट्रॉफी स्पर्धेत नील चंद्रात्रेने गोवा व वडोदरा या संघांविरुद्ध झालेल्या पाठोपाठच्या दोन सामन्यांत एकूण २५ बळी घेत अफलातून कामगिरी केली होती. त्या स्पर्धेत नीलने आपल्या भेदक डावखुऱ्या फिरकी गोलंदाजीने तीन सामन्यांत एकूण ३१ बळी घेत महाराष्ट्रात सर्वोत्तम, तर भारतात तिसरे स्थान मिळवले होते. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय आमंत्रितांच्या- इन्व्हिटेशन लीग व सुपरलीग क्रिकेट स्पर्धेत वेळोवेळी अतिशय प्रभावी अष्टपैलू कामगिरी केली आहे.

मुलापडू येथे ७ ते ३१ डिसेंबरदरम्यान तीन दिवसीय कसोटी स्वरूपात एलिट गटात महाराष्ट्राचे पाच साखळी सामने पुढीलप्रमाणे होणार आहेत : ७ डिसेंबर- हैदराबाद, १२ डिसेंबर- दिल्ली, १८ डिसेंबर- सौराष्ट्र, २३ डिसेंबर- हिमाचल प्रदेश, २९ डिसेंबर- हरियाणा. महाराष्ट्र संघ असा : प्रज्वल मोरे- कर्णधार व यष्टिरक्षक, एकनाथ देवडे- उपकर्णधार, नील चंद्रात्रे, ओम पाटील, तेजस गिलबिले - यष्टिरक्षक, प्रतीक कडलक, अर्जुन पाटील, मोहम्मद युसूफ मुजावर, क्षितिज येडे, अर्जुन साळुंके, शौर्य देशमुख, राजदीप मंडलिक, विश्वजित जगताप, रुद्र पाटील, मंथन पाटील व श्रेयस फडतरे.

## पंचवटीत पुरातन श्रीराम मंदिरात महाप्रसाद

**पंचवटी प्रतिनिधी :** सरदार चौक येथील साधारणपणे २०० वर्षांपूर्वी स्थापनेचा वारसा लाभलेल्या पुरातन श्रीराम मंदिरात मंगळवारी महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्व. महंत रामकुमारदास महाराज आणि स्व. महंत रामशोभादास महाराज यांच्या स्मरणार्थ हा कार्यक्रम पार पडला. श्रीराम मंदिराचे महंत माधवदास महाराज यांनी या भक्तिमय कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमास गोपी पांडे व परिवाराचे विशेष सहकार्य लाभले. याप्रसंगी महंत रामकिशोरशास्त्री महाराज, महंत भक्तिचरणदास महाराज, महंत रामस्नेहीदास महाराज, रामनारायणदास महाराज, महंत शंकरदास महाराज, महंत राजारामदास महाराज, महंत पीतांबरदास महाराज व भाविकांची उपस्थिती होती.

**ग्रामपंचायत कार्यालय, दुगाव ता. नाशिक जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र. ०५/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

शासन निर्णय क्र. निविदा-२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासन निर्णयानुसार)

ग्रामपंचायत दुगाव ता. नाशिक जि. नाशिक येथे होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दर पत्रकद्वारे निविदा मागवत आहे. सदर च्या तांत्रिक लिफाफा मध्ये जिल्हा परिषद नोंदणी, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र व पॅनकार्ड सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफामध्ये दरपत्रक सादर करण्यात यावे. सदरचा लिफाफा ०६/१२/२०२५ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक १३/१२/२०२५ सायंकाळी ५.०० वा. (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदर चे लिफाफे दिनांक १५/१२/२०२५ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वत: हजर असणे आवश्यक आहे अन्यथा त्या नंतर सदरच्या निविदासंबधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत दुगाव ता. नाशिक जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे व अंदाजपत्रके ग्रामपंचायतमध्ये बघण्यास मिळतील.

**कामाचे नाव** - (1 ) Providing G P office Vistarikaran Karane at Dugaon Tal Nashik Amt 999375 (2) Providing and Fixing Tiles to Sabhagruh (Vachanalay) Building at Dugaon Tal Nashik Amt 350792 (3) Provding Chain Link Fencing to Gp Office Building at Dugaon Tal Nashik Amt 299885 (4) Underground Drainage System at Gp Dugaon Tal Nashik Amt 249680 5) Additional Work for Repairs to Urinal Z P School Buildingat Dugaon Tal Nashik Amt 134349 (6) Construction of Well Compound to Anganwadi Building No 2 at Dugaon Tal nashik Amt 253202

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत दुगाव ता. नाशिक जि. नाशिक**

**श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डुबेरे, शाखा-ओझर,ता.निफाड, जि.नाशिक.**

**- गहाण घेणेच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस -**

तमाम लोकांस या गहाण घ्यावयाच्या मिळकतीच्या संबंधाने जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
१) **मिळकतीचे वर्णन - मौजे ओझर टाऊनशिप,** ता. निफाड जि. नाशिक येथिल बिनशेती प्लॉट मिळकती **भूमापन क्र. व उपविभाग २६३९/३/२६४८/२६४९ मधील प्लॉट मिळकती. १) प्लॉट नं. ६२ क्षेत्र १६०.८८ चौ.मी. २) प्लॉट नं. ६३ क्षेत्र १६३.३१ चौ.मी. ३) प्लॉट नं. ६४ क्षेत्र १६५.७५ चौ.मी.** यांसी चतु:सीमा रे.ऑ.रा. प्रमाणे
२) कर्जदाराचे नांव :- **श्री. राहूल संजय लड्ढा,** रा. ओझरमिग, ता. निफाड, जि. नाशिक.
३) संमती देणार :- **श्री. संजय नंदलाल लड्ढा**
४) कर्जाचा प्रकार :- **जमिन गृहतारण**
५) पतसंस्थेचे नांव :- **श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डुबेरे,** शाखा-ओझर ता. निफाड, जि. नाशिक
६) **नोटीसचा उद्देश :- टायटल व्हेरिफिकेशन**
७) वर कलम २ मध्ये नमूद केलेल्या कर्जदार यांनी वर कलम ५ यांत नमूद पतसंस्थेकडे वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत तारण ठेऊन कर्जाची मागणी केलेली आहे. सदर कर्जासाठी वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत या मिळकतीचे मालक यांचे संमतीने पतसंस्थेकडे गहाण देण्याचे मान्य व कबुल केले असून सदर कर्जास उपरोक्त नमूद मिळकत तारण देण्यास मिळकतीचे मालक यांनी संमती दिलेली आहे.
८) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्य मालकी, टायटल बाबत अगर मिळकत मालक यांचे मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास तसेच सदरची मिळकत इतर कोणाकडे गहाण, दान, लिन, लिज, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, करार मृत्युपत्र, अन्नवस्त्र व वित्तीय संस्थेचा बोजा, साठेखत, विसारपावती, , साठेखत, विसारपावती, विकसन करारनामा, जामीनकी, कोर्ट, दावा इ. कारणाने बोजा असल्यास अगर कोणाचाही काही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ **(सात)** दिवसाचे आंत आमचे कार्यालयांत तसेच पतसंस्थेचे कार्यालयांत लेखी साक्षांकित पुराव्यासह हरकती नोंदवाव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे अस समजून कर्ज देणेकामी तारण/गहाण घेतली जाईल व कर्ज वितरण करण्यात येईल. सदर मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा तसेच परस्पर वर्तमान पत्रामध्ये प्रसिद्ध केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी. सदर जाहीर नोटीस कर्जदार यांचे सांगणेवरून प्रसिद्ध करणेकामी पतसंस्थेमार्फत जाहीर नोटीस,
स्थळ-सिन्नर, दिनांक-०४/१२/२०२५ **आमचे मार्फत प्रसिध्द**

**श्री. प्रदिप लक्ष्मण वारुंगसे** (ॲडव्होकेट )
ऑफीस-लहामगे बिल्डींग, सिन्नर न्यायालयासमोर, सिन्नर, जि. नाशिक.

**चौकशीची जाहीर नोटीस**

जावक क्रमांक/३९३८/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक, जानकी प्लाज़ा, नाशिक-पुणे रोड, द्वारका सर्कल जवळ, नाशिक.

एस.आर.एन.क्रमांक NSK/21683/1860/25
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:846/25

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक मुक्तीदाता बहुउद्देशीय सामाजिक संस्था येवला बाबत।**
**न्यासाचा पत्ता :-द्वारा-, रामदास देवराम त्रिभुवन**, त्रिभुवन बदापूर रोड, सई कॉलनी, येवला, नाशिक, येवला
**अर्जदार-विनोद रामदास त्रिभुवन**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील १ | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | MEMBERSHIP FEE | ४५००.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. ४५००/- मात्र
(अक्षरी रुपये चार हजार पाचशे मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किवा सर्वेक्षण क्र | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

ब) स्थावर मिळकत: रोख रु.०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १८-११-२०२५ रोजी दिली.

शिक्का
**सही/- अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक**

**अहमदनगर जिल्हा पतसंस्था स्थैर्यनिधी सहकारी संघ मर्या. अहमदनगर**
**के. आर. खर्डे,** विशेष वसुली व विक्री अधिकारी
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये
संपर्क:-विंग: बी-२, फ्लॅट नं. ७. जैन स्थानक, लक्ष्मीबाई कुंकूलोळ संकुल, कोल्हार बु.//, तालुका : राहाता, जिल्हा : अहमदनगर, ४१३७१०
**जा.क्र.S.R.O/वसुली / ७७६** **दिनांक : २८/११/२०२५**

**स्थावर मालमत्ता विक्रीचा जाहीरनामा**

ज्याअर्थी ज्योती सहकारी पतसंस्था मर्या: कोपरगाव तालुका कोपरगाव जिल्हा अहमदनगर यांनी खालील नमूद केलेल्या थकबाकीदाराविरूध्द सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ब अन्वये वसुले दाखले मिळविले असून रितसर मागणी नोटीस व स्थावर मालमत्ता जप्ती हुकुम बजावला आहे. तरी ही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने मा. जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था अहमदनगर जि. अहमदनगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरून मी **के.आर. खर्डे, विशेष वसुली व विक्री अधिकारी** खालील नमूद मालमत्ता थकीत येणे वसुलीकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १५६ व नियम १०७ (११) अन्वये जाहीर लिलावाने विक्री करत आहे तरी स्थावर मालमत्ता लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यानी नमूद तारखेस व ठिकाणी वेळेस उपस्थित रहावे.

| अ क्र. | थकबाकीदाराचे नाव | वसुली दाखला / निवाडा रक्कम | वसुली दाखला / निवाडा क्र. | स्थावर मिळकतीचे वर्णन: मौजे | तालुका | गट नं./घर/प्लॉट नं. | क्षेत्रफळ | आकार | शेरा | बोजे तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कर्जदार : दिक्षित गणेश कृष्णाजी | | | | | | |
| १) | कर्जदार: **दिक्षित गणेश कृष्णाजी** जामीनदार-१: **पाटील सुनील नारायण** जामीनदार-२: **खैरे अनिल तानाजी** | ४१७३४९९ + रक्कम (मुद्दल): ४१७३४९९ यावरती दिनांक: २५/१०/२०१९ पासून द.सा.द.शे. १५% दराने व्याज + इतर खर्च + आदेशिकेचा खर्च | ८३२/२० दि. २८/०५/२०२० | सावळी विहीर | राहाता | १९५/४ | २.००.०० | २०.०० | **यापैकी दिक्षित गणेश कृष्णाजी यांचा हिस्सा** | |

**चर्तु:सीमा - नकाशाप्रमाणे**

**लिलावाचे ठिकाण : ज्योती सहकारी पतसंस्था मर्या, कोपरगाव तालुका कोपरगाव जिल्हा : अहमदनगर: मुख्य कार्यालय दिनांक: २९/१२/२०२५ वेळ: १२.०० वा.**
वरील स्थावर मालमत्तेवर नमूद थकबाकीदारांचा हक्क, दावा व हितसंबंध आणि मालमतेची अथवा काही भागांची किंवा त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाची अथवा कायद्याची विल्हेवाट लावण्याचा जो जो अधिकार आपल्या हितासाठी कायदेशीर मार्गाने चालवू शकतो. तो तो अधिकार जाहीर लिलाव करून अधिक करून सर्वाहून अधिक रक्कम बोलले त्यास लिलावात पुकारलेल्या वाजवी किमतीत त्या त्या शर्तीस व अटीत पात्र राहून विक्री केली जाईल. १) कर्जदाराने कर्ज रक्कम पूर्ण भरल्यास रद्द करण्यात येईल. २) लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या ठिकाणी वाचून दाखविण्यात येतील. ३) लिलाव तहकुब अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

शिक्का
सही/-
**के. आर. खर्डे,** विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्था स्थैर्यनिधी सह. संघ मर्या. अहमदनगर
सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये

**ग्रामपंचायत पिंपळगाव नजीक ता.निफाड जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र. ०२/२०२५-२६**

शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासन निर्णयानुसार)

ग्रामपंचायत पिंपळगाव नजीक ता.निफाड जि. नाशिक येथे होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दर पत्रकद्वारे निविदा मागवत आहे. सदरच्या तांत्रिक लिफाफामध्ये जिल्हा परिषद नोंदणी, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र व पॅनकार्ड सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफा मध्ये दर पत्रक सादर करण्यात यावे. सदरचा लिफाफा ०६/१२/२०२५ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक ११/१२/२०२५ सायंकाळी ५.०० वा. (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदर चे लिफाफे दिनांक १२/१२/२०२५ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवश्यक आहे अन्यथा त्या नंतर सदर च्या निविदा संबंधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत पिंपळगाव नजीक ता.निफाड जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे. व अंदाजपत्रके ग्रामपंचायत मध्ये बघण्यास मिळतील.

कामाचे नाव-1) CONSTRUCTING UNDERGROUND RCC PIPE DRAINAGE (NANDANWAN) AT PIMPALGAON NAJIK TAL NIPHAD DIST NASHIK EST. ATM. 375577/-2) CONSTRUCTING UNDERGROUND RCC PIPE DRAINAGE AT PIMPALGAON NAJIK TAL NIPHAD DIST NASHIK EST. ATM. 199801/-3) CONSTRUCTING UNDERGROUND RCC PIPE DRAINAGE AT PIMPALGAON NAJIK TAL NIPHAD DIST NASHIK EST. ATM. 299283/- 4) CONSTRUCTING PIPELINE AT PIMPALGAON NAJIK TAL NIPHAD DIST NASHIK EST. ATM. 325272/-5) CONSTRUCTING PIPELINE AT PIMPALGAON NAJIK TAL NIPHAD DIST NASHIK EST. ATM. 299613/-6) CONSTRUCTING INTERNAL CEMENT CONCRETE ROAD VILLAGE PIMPALGAON NAJIK TAL NIPHAD DIST NASHIK (PART-1)EST. AMT. 5,00,000/- 7)INTERNAL CEMENT CONCRETE ROAD VILLAGE PIMPALGAON NAJIK TAL NIPHAD DIST NASHIK (PART-2)EST. AMT. 2,50,000/- 8) PROVIDING CHAIN LINK IN SAHAKAR NAGAR AT VIALLAGE PIMPALGAON NAJIK TAL NIPHAD DIST NASHIK EST. AMT. 3,10,000/

**सही/- सरपंच/ प्रशासक** **सही/- ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत पिंपळगाव नजीक ता.निफाड जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय हातनोरे, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**जाहीर ई निविदा सूचना २०२५-२६ प्रथम प्रसिद्धी**

ग्रामपंचायत कार्यालय हातनोरे ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे १५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरून दिनांक ०५/१२/२०२५ पासून ते ११/१२/२०२५पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय हातनोरे, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय हातनोरे, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस**

तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका निफाड, पैकी जिल्हा परिषद नाशिक व पंचायत समिती निफाड हद्दीतील **मौजे वडाळीनजिक** या गांवचे शिवारातील शेतजमीन मिळकत यांसी **गट नं. ३२४/१, यांसी क्षेत्र एकूण क्षेत्र १. हे ३८, आकार रू.७.३९ पैसे,** पैकी लिहून देणार **श्री. निवृत्ती गंगाधर मोगरे** यांचे खरेदी मालकीचे **क्षेत्र ०० हे.०.९८ आर, आकार रू.५.२५ पैसे** यांचे खरेदी मालकीचे व कब्जावहिवाटीचे असल्याचे सांगून त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलास निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे सांगुन त्याचे सोबत व्यवहाराची बोलणी केली आहे व विसाराची रक्कमही स्विकारलेली आहे. तथापि उपरोक्त मिळकतीचे टायटल व्हेरिफिकेशनसाठी ही नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

सबब, उपरोक्त मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिन, लीज, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, हक्क, हितसंबंध, करार मदार मृत्युपत्र, जनरल मुखत्यार अथवा वित्तीय संस्थांचे बोजे अगर इतर कोणत्याही प्रकारचा बोजा अगर हक्क असल्यास अगर कोणाचीही सदर व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन खालील पत्यावर ७ दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतीचा विचार जाणार नाहीं. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारे लेखी हरकत प्राप्त न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजून तसा दाखला देण्यात येईल. व सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल, याची नोंद घ्यावी. कळावे ही जाहीर नोटीस, **ता. ०५/१२/२०२५**

**सही /- श्री निवृत्ती गंगाधर मोगरे**
**रा. वडाळीनजिक, ता. निफाड, जि. नाशिक**
**आमचे मार्फत प्रसिद्ध**

**जनार्दन रामनाथ देवरे,** ॲडव्होकेट व नोटरी
२२५, उद्योग भवन, दुसरा मजला, मुंबई आग्रा महामार्ग,
पिंपळगाव बसवंत, ता - निफाड, जि. नाशिक.

गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क
9404434628

**पाहिजेत**

वाडीवऱ्हे, नाशिक येथे गोठ्याच्या कामासाठी एक नोकर पाहिजे. मो. नं.९९२१२३३११७

--------------------

नाशिक येथील पॅथॉलॉजी लॅबसाठी फ्रेश तसेच अनुभवी Lab Technician पाहिजे. **संपर्क: ८९९९०५४९५७**

--------------------

कारसाठी अनुभवी, निर्व्यसनी, विवाहित नाशिकरोड रहिवासी ड्रायव्हर पाहिजे. अर्जासह भेटा **कागज पॅकेजिंग प्रा. लि.** स्टार झोन मॉल ३ रा मजला नाशिकरोड.

--------------------

**विकणे आहे**

दादर इस्ट 2 BHK 760 एरीया, नवीन बिल्डींग, लिफ्ट, 1 कार पार्क, माटुंगा वेस्ट 2 BHK 840 एरिया सेमी फर्नीष्ड , लिफ्ट, 1 कार पार्क, ओनरशीप सोसायटी 9136655744

**नोकरी विषयक**

बिल्डरच्या ऑफीससाठी ऑफीसबॉय व कोर्ट कचेरीचा माहितगार माणून पाहिजे. **मो. ९८६०३२०४१४**

--------------------

अनुभवी ऑफिस अकौन्टंट आणि टेलिकॉलर पाहिजेत. शिवाजीनगर, सातपूर, **मो.८९८३१०१०६६/९९७०६३०७१३**

**भाड्याने देणे**

पंचवटी कॉलेज समोर ३५०स्के. फुट गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क : ७४४७४८२७००

--------------------

शरणपूररोड, सुयोजित ट्रेड सेंटर ११००स्के. फुट ग्राऊंड फ्लोअर शॉप भाड्याने देणे आहे. ऑफिस, क्लिनिक यांना उपयुक्त. संपर्क ९९२२०८९७००

**CHANGE IN NAME**

My old name was 'Ajaysingh Bijendrasingh Jadon' has been changed to new name **'Ajay Bijendrasingh Jadon'** for passport issuance. As per affidavit no. DM 893693

--------------------

I hereby publish that my name on my husband's pension account mentioned as'Malati Madhav Dhopavkar' and as per the Gazette of Change of Name issued by Government of Maharashtra on 23-29, October-2025 changed as **'Malini Madhav Dhopavkar'** as per my KYC documents issued by Government.
Pleace:- Nashik
**Date:- 31/10/2025.**

**नावात बदल**

माझे जुने नाव शमीम अख्तर जाहिद खान व शमीम अख्तर जाहिद असे होते. नवीन नाव बदलून **शमीम दानिश शेख** असे प्रतिज्ञापत्राद्वारे करण्यात आले आहे.

--------------------

तमाम लोकांस कळविण्यात येते की, माझे माझ्या पतीच्या पेन्शन अकाउंटला नाव मालती माधव धोपावकर असे होते ते मी माझ्या सर्व शासकीय कागदपत्रांप्रमाणे दिनांक २३-२९, ऑक्टोबर-२०२५ रोजीचे महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रानुसार **मालिनी माधव धोपावकर** असे केलेले आहे. त्याकामी मी ही जाहीर खुलासा नोटीस देत आहे. कळावे. ही नोटीस. ठिकाण: नाशिक. **दिनांक:- ३१/१०/२०२५**

जाहिरात
छोटी किमया
मोठी

**ग्रामपंचायत कार्यालय, एकलहरे ता. नाशिक जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र. ११/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

शासन निर्णय क्र. निविदा - २०२१/प्र.क्र.७८/ बांधकाम-४ (या शासन निर्णयानुसार)

ग्रामपंचायत एकलहरे ता. नाशिक जि. नाशिक येथे होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दरपत्रकद्वारे निविदा मागवत आहे. सदरच्या तांत्रिक लिफाफामध्ये जिल्हा परिषद नोंदणी, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र व पॅनकार्ड सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफामध्ये दरपत्रक सादर करण्यात यावे. सदरचा लिफाफा ०६/१२/२०२५ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक १३/१२/२०२५ सायंकाळी ५.०० वा. (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदरचे लिफाफे दिनांक १५/१२/२०२५ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असताना कंत्राटदार स्वत: हजर असणे आवश्यक आहे अन्यथा त्यानंतर सदर च्या निविदासंबंधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत एकलहरे ता. नाशिक जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे व अंदाजपत्रके ग्रामपंचायतमध्ये बघण्यास मिळतील.

कामाचे नाव - 1 ) Providing Internal Road in Chide Wasti Premises at Eklhare Amt 400000 2) Under Ground Drainage System at Eklhare Tal Dist Nashik Amt 299910

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत एकलहरे ता. नाशिक जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय, गोवर्धन, ता. नाशिक जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र. ०५/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

शासन निर्णय क्र. निविदा - २०२१/प्र.क्र.७८/ बांधकाम-४ (या शासन निर्णयानुसार) ग्रामपंचायत गोवर्धन ता. नाशिक, जि. नाशिक येथे होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दरपत्रकद्वारे निविदा मागवत आहे. सदरच्या तांत्रिक लिफाफामध्ये जिल्हा परिषद नोंदणी, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र, व पॅनकार्ड सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफामध्ये दरपत्रक सादर करण्यात यावे. सदर चा लिफाफा ०६/१२/२०२५ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक १३/१२/२०२५ सायंकाळी ५.०० वा. (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदरचे लिफाफे दिनांक १५/१२/२०२५ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वत: हजर असणे आवश्यक आहे अन्यथा त्यानंतर सदरच्या निविदासंबंधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत गोवर्धन ता. नाशिक जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे व अंदाजपत्रके ग्रामपंचायतमध्ये बघण्यास मिळतील.

कामाचे नाव- 1) Providing Installing of Solar Street Lights (Gavat) at Govardhan Tal Dist Nashik Amt 499647

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत गोवर्धन ता. नाशिक जि. नाशिक**

जा.क्र.धसआ-१/४०३१/२०२५
धर्मादाय सह आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक, दि. २७.११.२०२५

**(नाशिक येथील मे. धर्मादाय सह आयुक्त-१ नाशिक विभाग, नाशिक यांचे न्यायालयात)**

**चौकशीची जाहीर नोटीस**

**प्रकरण/चौकशी क्र.१२/२०१६ कलम -४७**
**न्यासाचे नाव** : दि लासलगांव मर्चन्टस् असोसिएशन लि., लासलगांव, ता. निफाड, जि. नाशिक नोंदणी क्रमांक इ-६८/नाशिक
**मनोजकुमार रतनलाल जैन व इतर चार** **अर्जदार**
**विरुध्द**
**मोतीलाल हरलाल (मयत) व इतर** **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी दि लासलगाव मर्चन्टस् असोसिएशन लि., लासलगांव, ता. निफाड, जि. नाशिक नोंदणी **क्रमांक इ-६८/नाशिक** या न्यासाला कायदेशिर विश्वस्त नसल्याने नवीन विश्वस्तांची नेमणुक होवून मिळणे संदर्भात सादर केलेल्या अर्जावरुन प्रस्तुत चौकशी महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था कायदा १९५० चे कलम ४७ अन्वये मा. धर्मादाय सह आयुक्त-१, नाशिक यांचे न्यायालयात सुरु आहे. त्यामध्ये धर्मादाय सह आयुक्त-१, नाशिक यांनी अर्ज **क्र. १२/२०१६ मध्ये दि. २७.११.२०२५** रोजी आदेश पारीत केला आहे की, सदर न्यासाचे सभासद असलेल्या व्यक्तींची सदर न्यासाचे विश्वस्त म्हणून नेमणुक करण्यासाठी मुलाखती घेण्यासाठी विहीत नमुन्यात अर्ज, संमतीपत्र, ओळखपत्र व इतर आवश्यक दस्तऐवजांसह **दि.०७.०१.२०२६ रोजी ०४.०० वाजेपर्यंत** या कार्यालयाचे अधिक्षक (न्यायशाखा) यांचेकडे सादर करावे. त्याअर्थी, जे व्यक्ती उपरोक्त न्यासाचे सभासद आहे व उपरोक्त न्यासाचे विश्वस्त होण्यास इच्छुक आहेत त्यांनी या कार्यालयात उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यात अर्ज संमती पत्रासह व इतर आवश्यक सर्व दस्तासह **दि.०७.०१.२०२६ रोजी ०४.००** वाजेपर्यंत अधिक्षक (न्यायशाखा) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक यांचेकडे सादर करावे. त्यानंतर आलेल्या विहीत नमुन्यातील अर्जांचा विचार केला जाणार नाही व पुढील योग्य ते आदेश पारीत केले जातील याची नोंद घ्यावी. आज **दिनांक २७.११.२०२५** रोजी माझ्या सहीनिशी व धर्मादाय सह आयुक्त-१, नाशिक विभाग, नाशिक यांच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**सही/- अधिक्षक धर्मादाय सह आयुक्त, कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक.**

## संक्षिप्त ▸▸



### भाऊसाहेबनगरच्या स्काउटचा लखनऊतील जांबोरीत सहभाग

**कसबे सुकेणे : प्रतिनिधी**

लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे झालेल्या राष्ट्रीय स्काउट-गाइड जांबोरीमध्ये भाऊसाहेबनगरचे आठ स्काउट्स आणि स्काउटप्रमुख मनोज तुसे यांनी विशेष सहभाग नोंदवला. जांबोरी कालावधीत विविध प्रकारच्या स्पर्धा रॅपलिंग, स्काय सायकलिंग, मल्लखांब, विविध प्रकारचे साहसी खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, फूड प्लाझा, स्किल ओ रामा, कॅम्प फायर अशा विविध उपक्रमांमध्ये स्काउट्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला व उत्कृष्ट कामगिरी केली. राष्ट्रीय जांबोरीत प्रथमच इंटरनॅशनल नाइट सादर केली. त्यात महाराष्ट्राची लोकधारा हे गीत सादर करण्यात आले. यामध्ये नाशिकच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट नृत्य केले. जांबोरीत नाशिकचे स्काउट जिल्हा संघटक श्रीनिवास मुरकुटे व गाइड जिल्हा संघटक कविता वाघ यांच्या नेतृत्वाखाली १६९ स्काउट्स गाइड्स आणि २२ युनिट लीडर सहभागी झाले होते.

### राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत आर्यन देवरेचे यश

**नाशिक : प्रतिनिधी**



मानवधन सामाजिक, शैक्षणिक विकास संस्था संचालित प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मीडियम स्कूल, पाथर्डी फाटा येथील इयत्ता पाचवीतील विद्यार्थी आर्यन ध्रुवसिंग देवरे याने राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळविले. त्याने अबॅकस स्पर्धेत केवळ दहा मिनिटांत ९७ प्रश्न सोडवून तिसरा क्रमांक पटकावला. त्याच्या या कामगिरीची दखल घेत २०२५-२६ च्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. कमी वेळात अधिक प्रश्न सोडविण्याची त्याची क्षमता विशेष ठरली आहे. आर्यनचे यश हे त्याच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे फलित असल्याचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रकाश कोल्हे, सचिव ज्योती कोल्हे, मुख्याध्यापिका वैशाली पवार, अबॅकस शिक्षिका स्नेहल वारके, तसेच वर्गशिक्षिका जयश्री खैरनार यांनी सांगितले. सर्वांनी आर्यनचे अभिनंदन करत भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### सविता पोतदार यांच्या कवितेची निवड

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

सातारा येथे १ ते ४ जानेवारी या कालावधीत होणाऱ्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील मानाच्या निमंत्रितांच्या कविसंमेलनात महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा नाशिकरोडच्या सभासद कवयित्री सविता प्रशांत पोतदार यांची निवड झाली आहे. अनेक भावस्पर्शी काव्यरचनांसाठी प्रसिद्ध असलेल्या पोतदार यांनी विनोदी कथादेखील लिहिल्या आहेत. त्यांच्या निवडीचे अध्यक्ष उन्मेष गायधनी, उपाध्यक्ष रवींद्र मालुंजकर आणि सुदाम सातभाई, जिल्हा प्रतिनिधी नितीन ठाकरे, प्रशांत केंदळे, मिलिंद गांधी, प्रमुख कार्यवाह शिवाजी म्हस्के, कार्यवाह रेखा पाटील, कोषाध्यक्ष दशरथ लोखंडे, अलका अमृतकर, कामिनी तनपुरे, सुरेखा गणोरे, वृंदा देशमुख, कांचन पवार, मानसी घमंडी आदींनी स्वागत केले आहे.

### आज प्लॅटफॉर्म तिकीट विक्री बंद


**नाशिक : प्रतिनिधी**

महापरिनिर्वाण दिनानिमित्त रेल्वे स्थानकांवर वाढणारी गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेच्या भुसावळ मंडळाने एक निर्णय घेतला आहे. भुसावळ विभागातील नाशिकरोड, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला व बडनेरा या प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांची विक्री ६ डिसेंबर रोजी तात्पुरती बंद ठेवण्यात येणार आहे. रेल्वे स्थानकांवरील अनावश्यक गर्दी कमी करणे, प्रवाशांची हालचाल सुरळीत ठेवणे आणि सुरक्षितता सुनिश्चित करणे, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती रेल्वे प्रशासनाने पत्रकाद्वारे दिली.

## निधन वार्ता ▸▸

### रामदास देवरे

**देवळा : प्रतिनिधी**



तालुक्यातील वाजगाव येथील प्रगतिशील शेतकरी रामदास मालजी देवरे (७४) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भावजयी, एक मुलगा, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. येथील प्रगतिशील शेतकरी विश्वास देवरे यांचे ते वडील होत.



### आपत्कालीन स्थिती हाताळण्याचे कौशल्य हवे : जिल्हाधिकारी

**नाशिक : प्रतिनिधी**

आपत्कालीन प्रसंगात रुग्ण, त्याचे नातेवाईक आणि उपस्थित गर्दीवर योग्य नियंत्रण राखण्याची क्षमता प्रत्येक डॉक्टरांनी विकसित करणे अत्यावश्यक आहे. यामुळे रुग्णाला तत्काळ आणि प्रभावी उपचार देणे शक्य होते, असे मत जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी व्यक्त केले.

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात आयोजित कृषी रसायन विषबाधा ओळखणे आणि उपचार या विषयावरील वैद्यकीय परिषदेचे त्यांनी उद्घाटन केले. सार्वजनिक आरोग्य व कृषी विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, कॉर्टेव्हा ग्रीसायन्स, शिवार फाउंडेशन आणि महाविद्यालयाच्या मेडिसीन विभागाने संयुक्तपणे या परिषदेसाठी पुढाकार घेतला. परिषदेला मविप्रचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे, अमृता इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसचे विष नियंत्रण केंद्रप्रमुख डॉ. व्ही. व्ही. पिल्ले, जिल्हा आरोग्य अधिकारी राजेंद्र बागूल, शिक्षणाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे, अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे, तसेच अनेक तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते.

डॉक्टर व एमबीबीएस विद्यार्थ्यांशी संवाद साधताना जिल्हाधिकारी प्रसाद यांनी आपत्कालीन परिस्थितीत योग्य आकलन, शांतता, समन्वय व वेळेचे व्यवस्थापन यांचे विशेष महत्त्व स्पष्ट केले. कृषी रसायन विषबाधेची लक्षणे ओळखून तातडीने उपचार करण्याची गरज अधोरेखित करत तज्ज्ञांनीही मार्गदर्शन केले.

दीपप्रज्वलनाने परिषदेला प्रारंभ झाला. अधिष्ठाता डॉ. भामरे यांनी स्वागत केले. प्रा. मिलिंद देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जितेंद्र कोडिलकर यांनी आभार मानले. परिषदेला विद्यार्थ्यांसह डॉक्टर उपस्थित होते.

# येवल्यात नायलॉन मांजा वापरावर बंदी

## मांजाचा वापर केल्यास कडक कारवाईचा मुख्याधिकाऱ्यांचा इशारा

**येवला : प्रतिनिधी**

**पुढील जानेवारी महिन्यात मकरसंक्रांत आहे. या पार्श्वभूमीवर पतंग उडविण्यासाठी शहरात काही दुकानदारांकडून नायलॉन मांजा छुप्या पद्धतीने विक्री करण्यात येत आहे. सदर नायलॉन मांजावर बंदी असताना कोणत्याही विक्रेत्याने सदर मांजाची विक्री केल्यास त्याच्यावर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा येवला नगरपालिकेचे मुख्याधिकारी तुषार आहेर यांनी पत्रकाद्वारे दिला आहे.**



मुख्याधिकारी आहेर यांनी म्हटले आहे की, येवला शहरात नायलॉन मांजाचा वापर कोणीही करू नये, नायलॉन मांजामुळे नागरिक, बालक, दुचाकीस्वार, पक्षी तसेच जनावरांच्या जीविताला मोठा धोका निर्माण होत असून, अनेक अपघात व गंभीर दुखापतींच्या घटना समोर येत आहेत. हा धोका लक्षात घेता नायलॉन मांजाचा वापर पूर्णतः बंद करणे आवश्यक आहे. नायलॉन मांजा हा कायद्याने बंदी घालण्यात आलेला असून, त्याची विक्री, साठवणूक तसेच वापर करणे हा गुन्हा आहे. तरीही काही ठिकाणी बेकायदेशीररीत्या या मांजाची विक्री होत असल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे अनेक दुचाकीस्वारांच्या गळ्याला गंभीर जखमा झाल्याच्या घटना राज्यात घडल्या आहेत. तसेच, हा मांजा घातक असल्याने पक्ष्यांचे पंख कापले जाणे, त्यांचा मृत्यू होणे अशा हृदयद्रावक घटना सातत्याने घडत आहेत. येवला नगरपरिषदेच्या वतीने शहरातील सर्व नागरिक, दुकानदार, पतंग विक्रेते व पालक यांनी याबाबत दक्षता घ्यावी, असे आवाहन केले आहे. नायलॉन मांजाऐवजी केवळ सुताचा मांजा वापरण्याचे निर्देश देण्यात आले असून, पर्यावरणपूरक सण साजरे करण्याचे आवाहन केले आहे.

शहरात नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार असून, संबंधित दुकानदारांवर दंडात्मक कारवाईसह फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही मुख्याधिकारी आहेर यांनी दिला आहे. दरम्यान, नगरपरिषद, पोलीस प्रशासन व संबंधित विभाग यांच्या संयुक्त पथकाद्वारे येवला शहरात तपासणी मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहितीही पत्रकात मुख्याधिकारी आहेर यांनी दिली आहे.

> **शहरातील नागरिकांनी स्वतःची तसेच इतरांची सुरक्षितता लक्षात घेऊन नायलॉन मांजाचा वापर टाळावा, प्रशासनास सहकार्य करावे व कोणत्याही ठिकाणी नायलॉन मांजाची विक्री होत असल्याचे आढळल्यास तत्काळ नगरपरिषद किंवा पोलीस प्रशासनाला कळवावे.**
> **-तुषार आहेर, मुख्याधिकारी, नगरपरिषद, येवला**



### सात हजार ८०० रुपयांचा नायलॉन मांजा येवल्यात जप्त

#### नागडदरवाजा भागात एकावर कारवाई

**येवला : प्रतिनिधी**

मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर येवला शहरात नायलॉन मांजाची छुप्या पद्धतीने विक्री करणाऱ्या एका व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून ७ हजार ८०० रुपये किमतीचा नायलॉन मांजा जप्त केला.

मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर कायम बंदी असलेला नायलॉन मांजा छुप्या पद्धतीने शहरातील नागडदरवाजा भागातील परिसरात विकला जात असल्याची माहिती खबरी व्यक्तीकडून पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार संबंधित व्यक्ती राहत असलेल्या परिसरात पोलिसांनी छापा टाकून इमरान इकबाल शेख यास १८ नायलॉन मांजाच्या फिरकीसह ताब्यात घेतले. त्याच्यावर प्रचलित कायद्यानुसार कारवाई केली. त्यास नोटीस देण्यात आली आहे. पतंग उडविताना नायलॉन मांजाचा वापर तसेच विक्री करणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक अनिल भवारी यांनी दिली. या प्रकरणाची कारवाई पोलीस निरीक्षक अनिल भवारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार, सतीश मोरे, हवालदार गणेश सांगळे, महिला पोलीस सोनिया गरुड, मोनाली ठाकरे, शिपाई बिडकर आदींच्या पथकाने केली आहे.

### खंडणीप्रकरणी संतोष शर्मा विरोधात गुन्हा दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी** अंबड एमआयडीसी परिसरात सतत धमक्या देत उद्योजकाकडून तब्बल तीन लाख रुपयांची खंडणी उकळल्याप्रकरणी संतोष शर्मा याच्या विरोधात अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी निखिल नरेश राऊत (वय ५१, नाशिक येथील लघुउद्योजक) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपीने एक वर्षाहून अधिक काळ धमक्या देत पैशांची मागणी केली होती.

तक्रारीनुसार, ८ नोव्हेंबर २०२४ पासून ३१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान आरोपी संतोष शर्मा याने फिर्यादी राऊत यांच्या कंपनीविरुद्ध एमआयडीसी कार्यालयात अवैध बांधकामाची तक्रार दाखल केली होती. ही तक्रार मागे घेण्याचे आमिष दाखवून, तसेच कारवाई करण्याची भीती दाखवत आरोपीने वेळोवेळी धमक्या दिल्या. ऑक्टोबर २०२५ च्या चौथ्या आठवड्यात अंबड एमआयडीसीतील नितीन राऊत यांच्या कंपनीजवळ फिर्यादीकडून एक लाख ५० हजार रुपये आरोपीने घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे. पोलीस निरीक्षक नरूटे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप भंडे यांचीही तपासात मदत आहे.

### समृद्धीवरून नाशिक-बोरिवली ई-शिवाई बससेवा

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक आगारातर्फे समृद्धी महामार्गमार्गे धावणाऱ्या पहिल्या नाशिक-बोरिवली इलेक्ट्रिक वातानुकूलित शिवाई बससेवेचा लोकार्पण सोहळा नाशिक महामार्ग बसस्थानकात उत्साहात झाला. या बससेवेचे उद्घाटन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, प्रादेशिक व्यवस्थापक विजय गिते, विभाग नियंत्रक सचिन क्षीरसागर, तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी वाहन व चालकाचा सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून इलेक्ट्रिक शिवाई बस मार्गस्थ झाली. नाशिक विभागात सध्या ६५ इलेक्ट्रिक बसेस विविध प्रमुख मार्गांवर नाशिक-शिवाजीनगर (पुणे), त्र्यंबकेश्वर, शिर्डी, सप्तशृंगगड, सटाणा, नंदुरबार, बोरिवली, छत्रपती संभाजीनगर, कसारा आदी ठिकाणी प्रवासी सेवा सुरू करण्यात आल्या आहेत. समृद्धी महामार्गामुळे नाशिक-बोरिवली आणि नाशिक-छत्रपती संभाजीनगर प्रवास आता अधिक वेगवान व सुरक्षित होणार आहे. ५ डिसेंबरपासून नाशिक-बोरिवली ११ जाणाऱ्या व ११ परतणाऱ्या, तर नाशिक- छत्रपती संभाजीनगर दोन जाणाऱ्या व दोन परतणाऱ्या बससेवा नियमित धावू लागल्या आहेत. नवीन इलेक्ट्रिक वातानुकूलित शिवाई बससेवा प्रवाशांना जलद, सुरक्षित व आरामदायी प्रवासाचा नवा अनुभव देणार आहे.



| नाशिक- छत्रपती संभाजीनगर | |
|---|---|
| नाशिक- बोरिवली | |
| भाडे (दोन्ही मार्ग समान) | |
| पूर्ण तिकीट | ५०९ रुपये |
| अर्धे तिकीट | २५५ रुपये |
| महिला तिकीट | २६६ रुपये |

### रब्बीची ई-पीक पाहणी सुरू करण्याची मागणी

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने शेतकऱ्यांना आपल्या पीक पेरणीचा अधिकार देण्यासंबंधी ई-पीक पाहणी उपक्रम सुरू आहे, पण अद्याप पीकपेरा लागवड ई - पीक पाहणीद्वारे होत नसल्याची स्थिती असल्याने खरिपात या पीक पाहणीस कमी प्रतिसाद मिळाला. रब्बीत मात्र प्रतिसाद चांगला राहील असे दिसत असल्याचे कृषिमित्र संजय तानाजी गायधनी यांनी सांगितले.

सध्या गहू, हरभरा, मका, कांदा पेरणी व लागवड चालू आहे. पूर्वहंगामी पीक लागवड पूर्ण झाली आहे. परंतु, या लागवडीच्या नोंदी ऑनलाइन किंवा सातबारावर दिसत नसल्याची स्थिती आहे. कारण अद्यापही शासनाने ई-पीक पाहणी सुरू केलेली नाही.

अँड्रॉइड मोबाइलच्या मदतीने ई-पीक पाहणी अ‍ॅपवरून करावी लागते. रब्बी हंगामातील पीक पाहणी यांबाबत अनेक शेतकऱ्यांना नोंदणी करायची आहे. परंतु ही नोंदणी करता येत नाही. अ‍ॅप सध्या बंदच आहे. यामुळे शेतकरी पीककर्ज व पीकविमा अन्य बाबींसाठी पीकपेरा लावलेला सातबारा उतारा देऊ नाहीत.

नेटवर्कमध्ये अडचण येत असते. स्मार्ट फोन अनेकांकडे नाहीत. यामुळे पेरा नोंदणीस कमी प्रमाणात प्रतिसाद मिळतो. या स्थितीत पीक पाहणीची कृषी खात्यामार्फत व महसूलमार्फत शेतकऱ्यांना अडचण समजून घेऊन माहिती द्यावी, ही अपेक्षा आहे.

**शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे**

सध्या बहुतांश भागात गहू, हरभरा, मका, कांदा, द्राक्ष, ज्वारी रब्बीची पेरणी, लागवड सुरू आहे, पण अद्याप ई–पीक पाहणीचे अ‍ॅप बंदच आहे. अँड्रॉइड मोबाइल नसल्यामुळे शेतकऱ्यांना अडचण येत आहे. कधी नेटवर्क चालत नसल्यामुळे शेतकऱ्यांना अडचण येत आहे. महसूल विभागाने व कृषी विभागाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे.



### मनमाडला शिबिरात ९१ दात्यांनी केले रक्तदान

**मनमाड : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सेन्ट्रल रेल्वे मजदूर संघ कारखाना शाखेतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. एकनाथ पाटील अध्यक्षस्थानी होते. सचिन इंगळे, हेमंत पाटील व प्रकाश बोडके यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

शिबिरासाठी नाशिक ब्लड बँकेच्या पथकाने विशेष सहकार्य केले.शिबिराप्रसंगी आनंद गांगुर्डे, अक्षय माकूने, डॉ. मनीष क्षेत्रीय, डॉ. विनायक पांडे, राजेंद्र पगारे, अमीन शेख, नाथा उगले, सचिन सांगळे, प्रदीप गायकवाड, सतीशभाऊ केदारे, गुफरान खान, सागर गरुड, संजय बोडके, सिद्धार्थ पवार, अंबादास निकम आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सचिन इंगळे, एकनाथ पाटील, प्रकाश बोडके आदींची मार्गदर्शनपर भाषणे झाली. उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन नितीन पवार यांनी केले. प्रास्ताविक महेंद्र चौथमल यांनी केले. आभार गणेश हाडपे यांनी मानले.

रक्तदान शिबिरात ९१ दात्यांनी रक्तदान करून सामाजिक उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन कारखाना शाखेचे अध्यक्ष महेंद्र चौथमल, सचिव गणेश हाडपे, उपाध्यक्ष नितीन पवार, कार्याध्यक्ष प्रकाश बोडके, खजिनदार मुक्तार शेख, उपाध्यक्ष सोमनाथ सणस, महासचिव हेमंत माळी, वैभव कापडे, गौतम वाघ, जय पाठक, शुभम माळवतकर आदींनी केले.

### पाथर्डी फाटा परिसरात एमडी ड्रग विक्री करणारा तरुण अटकेत

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी फाटा परिसरातील एका इमारतीत एमडी या नशली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका २५वर्षीय तरुणाला पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडुन सुमारे २७ हजार ५०० रुपयांचा एमडी सह सव्वा दोन लाख रुपयांचा ऐवज जप्त केला

याबाबत अधिक माहिती अशी की ४ डिसेंबर रोजी गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, पाथर्डीशिवार परिसरातील लंबोदर हाइट्स या इमारतीत आरोपी एमडीची विक्री करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने दोन पंचांसह फ्लॅटवर छापा टाकला. तपासात आरोपी शुभम येवले (वय २५) हा एमडीचा साठा आणि विक्री करत असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्याकडून २७हजार५०० रुपये किंमतीचा ५.५ ग्रॅम एमडी, १लाख,४९,हजार रुपये रोख रक्कम आणि इतर ५०हजार २०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एकूण २ लाख २६ हजार७५० रुपये किंमतीचा माल पोलिसांनी ताब्यात घेतला.नाशिक गुन्हे शाखा युनिट २ ने एनडीपीएस कायद्यांर्गत पाहिजे असलेला आरोपी शुभम येवले याला अटक करून त्याच्याकडून ५.५ ग्रॅम एमडी (मॅफेड्रॉन) अंमली पदार्थ जप्त केला आहे. शहरात एमडीचे उत्पादन व विक्री करणाऱ्यांवर लक्ष ठेवून काटेकोर कारवाई करण्याच्या सूचना वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला पुढील चौकशीसाठी पोलिसांकडे सुपूर्द केले आहे. प्राथमिक तपासात हा आरोपी अंबड पोलीस ठाण्यातील पूर्वीच्या एका एनडीपीएस गुन्ह्यातही पाहिजे असल्याचे उघड झाले आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, उपआयुक्त (गुन्हे) किरणकुमार चव्हाण आणि सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी सपोनि हेमंत तोडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तसेच अंमली पदार्थ विरोधी पथकाने समन्वय साधून ही कारवाई यशस्वी केली.

# वडाळी नदीचा श्वास मोकळा होण्याची गरज

## नदीपात्रात प्लास्टिकचा कचरा, पाणवेली, काटेरी झुडपांचे साम्राज्य

**निफाड : तालुका प्रतिनिधी**

निफाड शहरालगत कादवा आणि विनता अशा दोन नद्यांचा संगम होतो. मात्र, याच नद्यांमध्ये गटारीचे पाणी सोडले जाते. प्लास्टिकचा कचरा, कागद, घरातील कचरा नदीपात्रात टाकला जात असल्याने नदीपात्रात पाणवेली, काटेरी झुडपे मोठ्या प्रमाणात उगवली. परिणामी, वडाळी नदीचा कोंडलेला श्वास मोकळा करण्याची गरज आहे.

धोडप किल्ल्याच्या डोंगर भागातून उगम पावणारी वडाळी नदी धोडंबे, वडाळीभोई, केद्राई, खडक ओझर, देवरगाव, सावरगाव, खडकमाळेगाव, वनसगाव, उगाव, खेडे, शिवडी, नांदुर्डी या सर्व परिसराला, पंचक्रोशीला सुजलाम् सुफलाम् करीत आणि कऱ्हा, शेलू व इतर छोट्या छोट्या नदी-नाल्यांना सोबत घेत निफाडच्या दिशेने झेपावते. जवळजवळ ५० किलोमीटरच्या तिच्या प्रवासाचा समारोप होतो निफाडच्या संगमेश्वर महादेवाच्या चरणी.

याच वडाळी नदी तीरावर वसलेल्या वनसगाव, तर चक्क त्रिवेणी संगमामुळे पावन झाले असल्याचेही बघू शकतो. याच नदीवर खडक ओझर येथे केद्राई धरणदेखील बांधण्यात आलेले आहे. निफाड शहराच्या उत्तर पश्चिम आणि दक्षिण अशा तीनही दिशांनी वडाळीने वळसा घातलेला दिसून येतो. निफाडला कादवा नदीचे सान्निध्य असले तरी निफाडच्या शिवारातील भूजल पातळी ही वडाळीला पूरपाणी आला तरच वाढते, असा स्थानिक शेतकऱ्यांचा अनुभव आहे. अशी ही निफाडची जीवनरेखा असलेली वडाळी नदी आज मात्र प्रचंड वाढते प्रदूषण, शहरीकरण, बेफाम वाढणाऱ्या पाणवेली, पान वनस्पती, गवत, गाळ, माती, वाळू माफियांकडून होणारे वाळू उत्खनन आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नदीकाठावरील सर्व खेडी, गावे आणि सर्वाधिक लोकसंख्या असलेले निफाड शहर यांच्या गटारीमधील सांडपाणी थेट नदीपात्रात सोडले जाणे, या सर्व घटकांमुळे वडाळी नदी शेवटच्या घटका मोजू लागली आहे. निफाड शहरातील तर जवळजवळ ८० टक्के सांडपाणी याच नदीत मिसळले जात असून, तेच खराब पाणी पुढे कादवा नदीत जाते आणि तेच दूषित पाणी निफाडच्या जलशुद्धीकरण केंद्रात आणले जाऊन विविध रासायनिक प्रक्रिया करीत निफाडकरांना पिण्यासाठी दिले जाते. सन २०२० मध्ये आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांनीदेखील स्वतः निफाड तालुक्यातील सावरगाव, रेडगावपासून निफाडपर्यंत पदयात्रा करीत कऱ्हा आणि विनता या दोन्ही नद्यांची पाहणी केली होती. या नद्यांची दयनीय अवस्था बघून ते दुःखी झालेले होते.

परिसरातील ग्रामस्थ, स्थानिक स्वराज्य संस्था आणि प्रशासन यांनी तत्काळ या नद्या वाचवण्यासाठी उपाययोजना न केल्यास या नद्यांबरोबरच आपली संस्कृतीदेखील धोक्यात येईल, असा गंभीर इशारा त्यांनी दिलेला होता. मात्र, त्यांच्या इशाऱ्याकडे कोणीही गंभीरतेने लक्ष दिले नसल्याने आज या नदीची अवस्था अतिशय केविलवाणी होऊन गेलेली आहे. वडाळीचा कोंडलेला श्वास कधी मोकळा होणार, हा प्रश्न पर्यावरणवाद्यांना सतावतो आहे.



> **कधीकाळी निफाडकरांसाठी पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत असलेली वडाळी नदी आज गाळ, माती, सांडपाणी, कचरा आणि गवत, वनस्पती यांच्यामुळे मृत्युपंथाला लागलेली आहे. तिचा श्वास कोंडला आहे. या लोकमातेला संजीवनी देण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांनी स्वतः या नदीची पाहणी केली. नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील अनेक नद्या प्रदूषणमुक्त करण्यासाठी मोहीम सुरू केलेली होती. मात्र, त्यात वडाळीचा समावेश नसल्यामुळे या नदीवर मोठा अन्याय होत आहे.**
> **- दीपक श्रीवास्तव, निफाड**

## संक्षिप्त

### मलढोण येथे भागवत कथा, ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन महोत्सवाला प्रारंभ

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील मलढोण येथे वै. भीमराज महाराज गेठे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ, श्री ज्ञानेश्वर पारायण व कीर्तन महोत्सवास गुरुवारपासून उत्साहात प्रारंभ झाला. गेल्या तीन वर्षांपासून या महोत्सवाचे आयोजन केले जाते. दैनिक कार्यक्रमात पहाटे ४ वाजता काकडा भजन, सकाळी साडेसहा वाजता विष्णुसहस्रनाम, साडेसात वाजता ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी १० वाजता भागवत कथा, दुपारी २ वाजता भजन, दुपारी ४ वाजता प्रवचन, सायंकाळी ५ वाजता हरिपाठ, तर सायंकाळी ६ ते ८ कीर्तन अशा धार्मिक कार्यक्रमांचे दररोज आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी कैलास महाराज येवले, तर शुक्रवारी तुकाराम महाराज जेजुरकर यांचे कीर्तन झाले. आज, शनिवारी (दि. ६) अमृतदास महाराज जोशी यांचे कीर्तन होणार आहे. रविवारपासून अनुक्रमे ज्ञानेश्वर महाराज कदम, जयंत महाराज बोधले, यशोधन महाराज साखरे, नारायण महाराज जाधव यांची सायंकाळी सहा वाजता कीर्तन होणार आहे. दि. ११ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता महंत रामगिरीजी महाराज (सरला बेट) यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसाद होणार आहे. या विविध कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. सुभाष महाराज गेठे व मलढोण ग्रामस्थांनी केले आहे.

### शालेय हॉकी स्पर्धेचा आजपासून थरार



**वावी : वार्ताहर**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर व कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे गौतम पब्लिक स्कूल, गौतमनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ ते ७ डिसेंबर रोजी राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धा गौतम पब्लिक स्कूलच्या भव्य मैदानावर होणार आहे. स्पर्धेसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा पूर्ण झाल्या आहेत. गौतम पब्लिक स्कूल सर्व तयारीनिशी सज्ज झाले आहे. स्पर्धेसाठी राज्यातील आठ विभागातील मुला- मुलींचे एकूण १६ हॉकी संघ सहभागी होणार आहेत, अशी माहिती प्राचार्य नूर शेख यांनी दिली. भव्य राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे विश्वस्त आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते आज, शनिवारी (दि. ६) सकाळी १०.३० वाजता होणार आहे. यावेळी पुणे विभागाचे क्रीडा उपसंचालक नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे उपस्थित राहणार आहेत. पारितोषिक वितरण संस्थेच्या सचिव चैतालीताई काळे यांच्या हस्ते होईल.

### दोडी महाविद्यालयात जागतिक एड्स सप्ताह

**सिन्नर : प्रतिनिधी** तालुक्यातील दोडी बुद्रुक येथील श्री ब्रह्मानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे शिक्षणमहर्षी दादा पाटील केदार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व दोडी बुद्रुत शासकीय रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिनानिमित्त एड्स दिन सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. या सप्ताहानिमित्त जनजागृती रॅली, निबंध स्पर्धा हे उपक्रम आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये एड्सविषयी जागरूकता वाढवणे, तसेच एड्सबद्दल गैरसमज दूर करणे आणि सुरक्षित व आरोग्यदायी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. आरोग्य समुपदेशक विलास बोडके यांनी एड्स प्रतिबंध संक्रमणाची कारणे प्रतिबंधात्मक उपाय आणि सामाजिक संवेदनशीलता मदत वाहिनी १०९७, शून्य आधारित एच.आय. व्ही. मोहीम, शाश्वत विकास व शपथ या विषयांवरील माहिती देण्यात आली. राष्ट्रीय योजना कार्यक्रम अधिकारी केदार राजेंद्र यांनी एचआयव्हीविषयी मिथक आणि तथ्य व यावर्षीचे घोषवाक्य हा विषय समजावून सांगत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी जनजागृती रॅली, निबंध व रांगोळी स्पर्धा मोहीम राबवून समाजात सकारात्मक संदेश दिला. विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे मानवी साखळी तयार केली होती.

### सिडकोत दोन ज्येष्ठांची १९ लाखांची फसवणूक, पोलिसांत तक्रार दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी** सिडको परिसरात दोन जणांनी वृद्ध नागरिकांची १९ लाखांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अंबड पोलीस ठाण्यात यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी जगन्नाथ वाणी (वय ६५) यांनी पोलिसांत तक्रार नोंदवली आहे. तक्रारीनुसार, २४ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर २०२५ या कालावधीत आरोपी प्रसाद राऊत आणि प्रसाद वाणी हे वेळोवेळी फिर्यादीच्या घरी जाऊन स्वतःला एसबीआय बँकेत लोन काढून देण्याचे काम करणारे म्हणून ओळख करून देत होते. या बहाण्याने त्यांनी फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर फ्लॅट दाखवून त्याची रजिस्ट्री करून देण्याचे आश्वासन देत एक अनोळखी व्यक्ती ही बिल्डरचा मुलगा असल्याचे सांगून फिर्यादीकडून एक लाख रुपये घेतले. यापेक्षा गंभीर बाब म्हणजे आरोपींनी फिर्यादीकडून एसबीआय बँकेच्या ब्लॅक चेकवर सह्या घेऊन त्यांच्या परवानगीशिवाय खात्यातील १८ लाख रुपये आरटीजीएसद्वारे एका सोनाराकडे पाठवले. या रकमेच्या बदल्यात सोने खरेदी केल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. तिघांनी संगनमत करून एकूण १९ लाखांची फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगवेंद्रसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक घुणावत करीत आहेत.

### श्री कॉम्बाइन्स प्रा. लि. कंपनीच्या संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी** नाशिकमधील श्री कॉम्बाइन्स प्रा. लि. कंपनीच्या संचालकांविरुद्ध ४९ लाख ४३ हजारांच्या फसवणुकीसह जातीय शिवीगाळ आणि मारहाणीचा गुन्हा मुंबई नाका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. धुळे जिल्ह्यातील राजकुमार पावरा (वय ४५), आदिवासी समाजातील ठेकेदार असून, त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. फिर्यादींच्या मते, ओएफसी कामासाठी नोव्हेंबर २०२३ मध्ये आरोपी संचालक दिनेश ब्राह्मणकर, संदीप ब्राह्मणकर आणि प्रशांत कुंभारे यांच्याशी चर्चा झाली होती. त्यानुसार त्यांनी दिलेले सब-कॉन्ट्रॅक्टचे काम फिर्यादीने पूर्ण केले. या कामाची एकूण रक्कम ७८लाख ९३ हजार ६०० रुपये होती. त्यातील २९ लाख ५० हजार रुपये अदा झाले. मात्र, उर्वरित ४९ लाख ४३ हजार ६०० रुपये कंपनीने देणे बाकी ठेवून फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद आहे. उर्वरित रक्कम मागण्यासाठी फिर्यादी फेब्रुवारी २०२५ मध्ये कंपनीच्या मुंबई नाका कार्यालयात गेले असता वाद निर्माण झाला. तक्रारीनुसार, आरोपी दिनेश ब्राह्मणकर यांनी फिर्यादी आदिवासी समाजातील असल्याचे माहीत असताना जातिवाचक अपमानास्पद शिवीगाळ केली. तसेच 'मी कुणाला घाबरत नाही, तुझे हातपाय तोडेन,' अशी धमकी देत मारहाण करून त्यांना कार्यालयातून हाकलून दिल्याचे फिर्यादीने सांगितले. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरकारवाडा विभागाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सुधाकर सुरवाडकर आणि पोलिस अधिकारी विश्वास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# तपोवन बचावासाठी खा. वाजेंची संसदेत बॅटिंग

## झाडे तोडून नाशिकचा श्वास संपवला जातोय

**नाशिक : प्रतिनिधी**



**नाशिकच्या तपोवन परिसरातील अठराशे झाडांच्या कत्तलीच्या निर्णयामुळे निर्माण झालेल्या संतापाची दखल थेट संसदेत घेण्यात आली आहे. नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी शुक्रवारी (दि.५) लोकसभेत शून्य प्रहरात तपोवन वृक्षतोडीचा मुद्दा जोरदारपणे मांडला. याआधी त्यांनी मुख्यमंत्री आणि पंतप्रधानांना पत्र लिहून वृक्षतोड तत्काळ थांबवण्याची मागणी केली होती. बुधवारी (दि. ३) त्यांनी तपोवन परिसराला भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला होता.**

लोकसभेत बोलताना खासदार वाजे म्हणाले की, तपोवन परिसर केवळ हिरवाईचा पट्टा नसून प्रभू श्रीरामाच्या वास्तव्याने पावन झालेला धार्मिक वारसा, जैवविविधतेचे केंद्र आणि नाशिकचे फुफ्फुस आहे. हिंदू धर्म निसर्गपूजनाची शिकवण देतो. अशा पवित्र भूमीत हजारो झाडे तोडणे म्हणजे श्रद्धा, पर्यावरण आणि सांस्कृतिक वारसा तिन्हीवर कुऱ्हाड, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. तपोवनात अनेक पक्षी, प्राणी व दुर्मिळ जैववैविध आढळत असून, या परिसंस्थेचा विनाश नाशिककरांच्या भावनांना वेदना देणारा असल्याचे ते म्हणाले.

दरम्यान, खा. वाजे यांच्या मजबूत, ठाम आणि भावनिक मांडणीमुळे तपोवन प्रश्न राज्याबाहेर जाऊन देशाच्या सभागृहातही प्रतिध्वनित झाला आहे. नाशिककरांचा संताप आणि आंदोलनाची ऊर्मी केंद्र सरकारने लक्षात घेतली पाहिजे, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला. संसदेतल्या प्रभावी भाषणाने स्पष्ट संकेत मिळाले की, तपोवन बचावासाठीचा लढा आता निर्णायक टप्प्यात आहे. नाशिककरांचा वैताग, जनभावना, धार्मिक महत्त्व आणि पर्यावरणीय धोका या सर्वांचा संगम असलेला हा मुद्दा आता सरकारकडून निर्णायक प्रतिसादाची वाट पाहत आहे.

### ...तर तपोवनात काय उरेल?

तपोवन भेटीदरम्यान खासदार वाजे यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. नागरिक, तपोवन बचाव समिती व पर्यावरण तज्ज्ञांकडून माहिती घेतल्यानंतर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यावेळी ते म्हणाले की, तपोवन या नावातच सर्वकाही आहे. वन नाहीसे झाले तर तपोवन फक्त सिमेंटचे जंगल उरेल. नाशिकचे फुफ्फुस कायमचे हरवेल. एक्झिबिशन सेंटरसाठीही त्याच परिसरात निविदा निघाल्याने नाशिककरांचा संशय अधिकच वाढल्याचे त्यांनी सांगितले.

### पर्यायी जागा, पण तपोवनच का?

खासदार वाजे यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. नाशिकमध्ये साधुग्रामसाठी पर्यायी जागा उपलब्ध असताना तपोवनच का निवडण्यात आले? पर्यावरण परिणाम अहवाल, तज्ज्ञांचे मत, सार्वजनिक चर्चा या सर्वांना पूर्णपणे बायपास करून निर्णय रेटण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी सांगितले. तपोवनाचा नाश करून हरितकुंभ कसा होणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

### गोदावरी प्रदूषणावर चुप्पी मात्र, वृक्षतोडीस उत्सुकता?

तपोवन भेटीप्रसंगी वृक्षतोडीच्या मुद्द्यासोबतच वाजे यांनी गोदावरी प्रदूषणाचाही विषय उपस्थित केला. झाडे तोडण्यासाठी प्रशासन एवढे सज्ज असते, पण गोदावरी प्रदूषण थांबविण्यासाठी जी गती हवी ती कुठे आहे, असा त्यांनी सवाल केला. सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी एसटीपी प्रकल्प पूर्ण होईल की नाही, अशी शंका त्यांनी व्यक्त केली.

## सिन्नर न.प.त उबाठाचं खातं उघडलं?

### उदय गोळेसर यांच्या बिनविरोध निवडीची शक्यता

**सिन्नर : प्रतिनिधी**



सिन्नर न.प.च्या पंचवार्षिक निवडणुकीत खासदार राजाभाऊ वाजे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने खाते उघडले असून, प्रभाग क्र. ५ 'अ'मधून शिंदेसेनेचे उमेदवार दर्शन पंढरीनाथ भालेराव यांनी माघार घेत असल्याचे पत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सादर केल्यामुळे शिवसेना उबाठा गटाचे उमेदवार उदय प्रभाकर गोळेसर यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.

दरम्यान, अवैध अर्जावरील हरकतींमुळे चार प्रभागांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. नगराध्यक्षपदासह उर्वरित जागांसाठी मंगळवारी (दि. २) मतदान प्रक्रियादेखील पार पडली आहे. प्रभाग क्र. २ अ, ४ अ, ५ अ व १० ब या प्रभागांसाठी २० डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्यांना माघारीसाठी १० डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. तथापि, प्रभाग क्र. ५ 'अ'मधून शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी करणारे दर्शन भालेराव यांनी माघार घेत असल्याचे पत्र शुक्रवारी (दि.५) निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सादर केले आहे. त्यामुळे या प्रभागात उदय प्रभाकर गोळेसर एकमेव उमेदवार शिल्लक आहेत. त्यांच्या बिनविरोध निवडीची औपचारिकता बाकी असल्याचे समजते. दरम्यान, निवडणूक कार्यक्रमादरम्यान माघारीच्या मुदतीत भालेराव यांनी माघार न घेता आता उमेदवारी माघारीसाठी अर्ज सादर केल्याने निवडणूक निर्णय अधिकारी हे भालेराव यांचा उमेदवारी अर्ज ग्राह्य धरतात की नाही यावरच गोळेसर यांच्या बिनविरोध निवडीचे गणित अवलंबून आहे.

### निवडणूक आयोगाकडून मागितले मार्गदर्शन

दर्शन भालेराव यांचा माघारीचा अर्ज प्राप्त झाला आहे. माघारी ग्राह्य धरण्यात येईल किंवा नाही यासंदर्भात निवडणूक आयोगाकडून मार्गदर्शन मागवले आहे. आयोगाच्या मार्गदर्शनक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल.

– **अभिजित कदम,** सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी

## झाडांसाठी घरकामगार मोलकरीण संघटना मैदानात

**नाशिक : प्रतिनिधी**



तपोवनातील झाडे तोडू नये यासाठी वेगवेगळ्या संघटना प्रशासनाच्या भूमिकेला कडाडून विरोध करत असताना आता नाशिक जिल्हा घरकामगार मोलकरीण संघटनेदेखील झाडांसाठी मैदानात उतरली आहे. प्रशासनाने ही झाडे तोडू नयेत, अशी मागणी यावेळी केली.

तपोवन परिसरातील तब्बल १८०० झाडांची तोड करण्याचा प्रस्ताव नाशिकच्या श्वासावरच वार करणारा आहे. या निर्णयाविरोधात शुक्रवारी (दि.५) नाशिक जिल्हा घरकामगार मोलकरीण संघटनेच्या सदस्या तपोवन येथे एकत्र आल्या. रोज सकाळी चार वाजता उठून कामाची तयारी करणाऱ्या, इतरांच्या घरात दिवसभर राबून स्वतःच्या कुटुंबाचा संसार चालवणाऱ्या या महिलांचा आज एकच मुद्दा होता, झाडं कापली तर आमच्या जगण्यावरच घाव बसेल. आमचा कुंभमेळ्याला विरोध नाही. आमचा धर्माला विरोध नाही. कुंभमेळा नाशिकची ओळख आहे आणि आम्ही त्याचा आदर करतो. पण कुंभमेळ्याच्या नावाखाली झाडं कापली जाऊ नयेत. त्यांनी सांगितले की धार्मिक कार्यक्रम असो किंवा सरकारी विकास योजना नुकसान मात्र निसर्गाचे होते आणि त्याचा फटका पहिल्यांदा गरीब, कामगार, घरकाम करणाऱ्या महिलांना बसतो. उन्हाळ्यातील उकाडा, पाण्याची टंचाई, प्रदूषणाचा त्रास याचा आम्हाला रोज त्रास होतो. मग झाडं कापताना आम्ही कशा काय शांत बसू? असा सवाल संघटनेने प्रशासनाला केला.

नाशिक जिल्हा घरकामगार मोलकरीण संघटना आयटक शहराध्यक्ष मीना आढाव, शहर सचिव प्राजक्ता कापडणे, छाया वराडे, हसीना शेख, सुषमा रामराजे आशा शिवडे, लता पाथरे, सुषमा उघडे, प्रणाली चंद्रमोरे, शोभा अभंग, बेबी वानखेडे, ज्योती पवार, ललिता ठोंबरे, ममताज शेख आदी महिला उपस्थित होत्या.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त नाशिकरोड स्टेशनवर भीमसैनिकांसाठी अन्नदान

**नाशिक रोड : विशेष प्रतिनिधी**



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव, नाशिकरोड समिती व संयोजक समितीचे प्रमुख सुनील कांबळे यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईच्या चैत्यभूमीला अभिवादन करण्यासाठी जाणाऱ्या भीमसैनिकांसाठी नाशिकरोड रेल्वे स्टेशनवर अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या अन्नदान उपक्रमात समितीचे प्रमुख सुनील कांबळे, कार्यक्रमाचे आयोजक माजी न्यायाधीश प्रकाश ताजनपुरे, अशोक आव्हाड, मुकेश वीर, अतुल भावसार, अक्षय बर्वे, अजित दिवेकर, सखाराम वीर, हर्षवर्धन दिवेकर, बलभीम वीर, दिलीप अहिरे, राजाभाऊ जाधव, अक्षय शेलार, आशिष इंगोले, अनिकेत नेतारे, सुरज केसर, अरबाज शेख, तेजस शेलार, किशोर भंडारे आदी उपस्थित होते.

## धनश्री शिंदे 'सुपर रँडोनर' किताब मिळवणारी महिला



**सिन्नर : प्रतिनिधी**

घर, कुटुंब, मुले, शाळा, दिनक्रम या सगळ्यांच्या भोवऱ्यात स्वतःसाठी वेळ काढणेही अवघड. पण या सर्व मर्यादांना मागे सारत घरच्या घरी जगणारी एक साधी गृहिणी धनश्री शिंदे यांनी महिलांसाठी असामान्य प्रेरणादायी उदाहरण ठेवत 'सुपर रँडोनर' हा प्रतिष्ठित किताब पटकावला आहे.

रँडोनर बनण्यासाठी २००, ३००, ४०० आणि ६०० किलोमीटरच्या चारही बीआरएम राइड्स एका वर्षात पूर्ण करायच्या असतात. पण धनश्री यांनी त्या फक्त २१ दिवसांत पूर्ण करून अद्वितीय कामगिरी केली. अफाट परिश्रम, लौकिक स्टॅमिना आणि अपवादात्मक वेळा धनश्री शिंदेंनी अद्भुत कामगिरी केली. २०० किमी- मर्यादा १३ तास, ११.३० तासांत पूर्ण, ३०० किमी- मर्यादा १८ तास, १५.३० तासांत पूर्ण, ४०० किमी- मर्यादा २७ तास, २१ तास २० मिनिटांत पूर्ण, ६०० किमी- मर्यादा ४० तास, ३५ तासांत पूर्ण (पोडियम फिनिश) ६०० किमीचा मार्ग नाशिक-संभाजीनगर-सोलापूर हायवे-पाडिळसंगी असा कठीण, उतार-चढावांनी भरलेला. अंधार, थंडी, अपरिचित रस्ता, मनात भीती आणि अचानक राइडदरम्यान चाक पंक्चर! ग्रुप पुढे निघून गेला. कोणतीही महिला याक्षणी खचली असती. पण धनश्री शिंदे खचल्या नाहीत. पंधरा मिनिटांत सायकल दुरुस्त करून त्यांनी पुन्हा वेग पकडला आणि दुपारपर्यंत ग्रुप जॉइनही केला. त्यांच्या धैर्याचा हा क्षण अनेक महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. धनश्री शालेय व महाविद्यालयीन काळातही उत्तम खेळाडू. सीडीआर भोसले विद्यालय व लासलगाव महाविद्यालयात धावणे, चालणे व रिलेयात राज्यस्तरीय पदकांशिवाय अनेक सन्मान त्यांच्या नावावर आहेत. घरात खेळाचे वातावरण, पतीची सायकलिंगची आवड, घरच्यांचा सर्वतोपरी पाठिंबा या सर्वांनी त्यांना पुन्हा खेळाकडे आकृष्ट केले. संपूर्ण नाशिक जिल्ह्यात त्यांच्या या कामगिरीचे कौतुक होत आहे. महिलांना फिटनेस, खेळ आणि धैर्याचा मार्ग दाखवणाऱ्या या गृहिणीने हजारो महिलांना नवी उमेद दिली आहे. प्रवास रस्त्याचा असतो, पण संघर्ष एकट्याचा. पंक्चर होऊ शकतं, रस्ता चुकू शकतो, थकवा येऊ शकतो, पण जिद्द सोडली नाही तर राइड पूर्ण होते. जबाबदाऱ्या आहेत म्हणून स्वप्नं थांबवायची नसतात, असे धनश्री शिंदे म्हणाल्या.

## शालेय दिव्यांग विद्यार्थ्यांना आ.आशुतोष काळेंचा मदतीचा हात

**वावी : वार्ताहर**



कोपरगाव मतदारसंघातील दिव्यांग विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा समावेशित शिक्षण व राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत आरोग्य तपासणीसाठी आणि विविध शासकीय कागदपत्रांसाठी सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे जाण्याकरिता आमदार आशुतोष काळे यांच्या पुढाकारातून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मोफत वाहन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

दिव्यांगत्व प्रमाणपत्र, कार्ड, आरोग्य तपासणी नोंदी, दिव्यांग सहाय्यक साधनांसाठी लागणारे पात्रता अहवाल, तसेच शालेय शिष्यवृत्ती अर्जांसाठी आवश्यक वैद्यकीय पडताळणी प्रमाणपत्र अशा अनेक कागदपत्रांच्या प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना कोपरगाव ते अहिल्यानगर प्रवास करताना वाहतुकीच्या गैरसोयींचा सामना करावा लागतो. दिव्यांगाना घेऊन पालकांना प्रवास करण्यात येणाऱ्या अडचणींचा गांभीर्याने विचार करून आ.आशुतोष काळे यांच्या पुढाकारातून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मोफत वाहन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या हस्ते या वाहनाला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले.

यावेळी डॉ. जितेंद्र रणदिवे, डॉ. सपना भंडारी, माजी नगरसेवक रमेश गवळी, फकीरमामू कुरेशी, राजेंद्र वाकचौरे, सुनील शिलेदार, शिवाजीराव खांडेकर, तुषार गलांडे, इम्तियाजभाई अत्तार, सोमना आढाव, संतोष शेलार, मनोज नरोडे, अमित आगलावे, सुनील फंड, वैभव कानडे, दादा नाईकवाडे, विजय त्रिभुवन, जनार्दन कदम, शुभम काळे, मुकुंद भुतडा, अर्जुन मरसाळे, राजेंद्र उशिरे, अनिरुद्ध काळे, सुवर्णा मगर, राजेंद्र पाखर, कांतिलाल गुरसळ, सचिन म्हस्के, राणी रोडे आदींसह दिव्यांग विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## 'आर्थिक सुरक्षा चक्र' योजनेमुळे प्रत्येक कुटुंबासाठी सुरक्षिततेचे कवच

### ग्रामीण भागात जीवनमान उंचावण्यासाठी प्रत्येक कुटुंबाचा होणार सर्व्हे

**सिन्नर : प्रतिनिधी**

**केंद्र सरकारच्या भारतीय डाक विभागाने ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबासाठी सुरक्षिततेचे कवच देण्यासाठी 'आर्थिक सुरक्षा चक्र' हा उपक्रम हाती घेतला आहे. त्याअंतर्गत ग्रामीण भागातील शाखा डाकपाल आणि ग्रामीण डाकसेवक गावातील प्रत्येक घरांना भेटी देऊन त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक सर्व्हे करणार आहेत. त्यातून नागरिकांना भारतीय डाक विभागाच्या विविध योजनांची माहिती पुरवली जाणार आहे. हा उपक्रम केवळ नाशिक विभागात राबविला जाणार आहे.**

भारतीय डाक
डाक सेवा-जन सेवा
India Post
Dak Sewa-Jan Sewa

सुमारे दीड शतकापासून भारतीय डाक विभाग जनतेच्या सेवेत आहे. त्यामुळे पोस्ट ऑफिसची विश्वासार्ह परंपरा आता अधिक सक्षम होत असून, बचत, गुंतवणूक, विमा आणि पेन्शन अशा सर्व गरजांना एकाच छताखाली कव्हर करणारी ही योजना नागरिकांच्या अपेक्षांना न्याय देणार आहे, अशी माहिती नाशिक डाक विभागाचे प्रवर डाक अधीक्षक प्रफुल्ल वाणी, सहाय्यक अधीक्षक योगेश शिंदे यांनी दिली.

गावागावांत पत्रे, पार्सल आणि अल्पबचतीच्या विविध योजना लोकांपर्यंत पोहोचवणारे पोस्ट ऑफिस आता पुढे जाऊन संपूर्ण कुटुंबासाठी आर्थिक कवच उभे करण्यास तयार झाले आहे. या 'आर्थिक सुरक्षा चक्र'अंतर्गत बचत खाते, अल्प व दीर्घ मुदतीची गुंतवणूक, कुटुंबासाठी विमा योजना, तसेच पेन्शन यांसारख्या जीवनावश्यक योजनांचा समावेश असून, एका कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा उद्देश या योजनेमागे आहे.

लवकरच गावातील शाखा डाकपाल नागरिकांशी प्रत्यक्ष भेटून योजनांची माहिती देणार आहेत. सर्वांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन डाक विभागाने केले आहे.

### आर्थिक सुरक्षा चक्र नेमके काय आहे?

प्रत्येक कुटुंबाचे भारतीय डाक विभागात सेव्हिंग, करंट, आरडी, पीपीएफ, विमा डाक जीवन विमा, अटल पेन्शन योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना याचे नागरिकांचे पोस्टात खाते आहे की नाही याबाबत पडताळणी केली जाणार आहे. त्यांच्या उत्पन्नानुसार त्यांना विविध योजनांमध्ये सुरक्षित गुंतवणूक करण्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. शेवटच्या घटकापर्यंत सदर योजना पोहोचविण्यासाठी ग्रामीण डाकसेवक काम करणार आहेत. त्यातून योग्य मार्गदर्शनाद्वारे नागरिकांना आर्थिक सुरक्षेबाबत माहिती दिली जाणार आहे.

> **केवळ नाशिक विभागातच 'आर्थिक सुरक्षा चक्र' उपक्रम सुरू केला आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबांना योग्य आणि विश्वासार्ह गुंतवणूक करण्यासाठी कर्मचारी मार्गदर्शन करणार आहेत. प्रत्येक कुटुंबासाठी आणि प्रत्येकासाठी या आर्थिक सुरक्षा चक्राचा उपयोग होईल, अशी अपेक्षा आहे.**
>
> **- प्रफुल्ल वाणी, प्रवर डाक अधीक्षक, नाशिक**



'कृउबा'कडून वसूल केल्या जाणाऱ्या शुल्काविरोधात व्यापारी एकवटले ▶▶ पान २

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



येवल्यात कुत्र्यांचा सहा जणांना चावा; बंदोबस्ताची मागणी ▶▶ पान २

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ नाशिक, शनिवार, दि. ६ डिसेंबर २०२५


## संक्षिप्त ▶▶



### उत्तर महाराष्ट्रात पहिला 'लीडलेस पेसमेकर' प्रत्यारोपण यशस्वी

नाशिकच्या हृदय उपचारात ऐतिहासिक पाऊल

**नाशिक : प्रतिनिधी**

उत्तर महाराष्ट्रात पहिल्यांदाच अत्याधुनिक दुसऱ्या पिढीतील लीडलेस पेसमेकरचे यशस्वी प्रत्यारोपण नाशिकमध्ये करण्यात आले. नाशिकच्या वरिष्ठ इंटरव्हेन्शनल कार्डियोलॉजिस्ट डॉ. सीमा अजय नक्षणे (गवळी) यांनी अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये ही अत्यंत महत्त्वाची शस्त्रक्रिया पार पाडली. यामुळे नाशिकच्या हृदय उपचार क्षेत्रात नवे पर्व सुरू झाले आहे. रुग्ण हा एक वृद्ध पुरुष असून, फक्त पंधरा दिवसांपूर्वी त्याची अँजिओप्लास्टी करण्यात आली होती. तो दुहेरी रक्त पातळ करणाऱ्या औषधांवर असल्याने पारंपरिक पेसमेकर बसविताना गंभीर रक्तस्राव किंवा संसर्गाचा धोका निर्माण होण्याची शक्यता जास्त होती. अशा जटिल परिस्थितीत छातीत पॉकेट तयार करून वायर घालावी लागणारी पारंपरिक पद्धत अत्यंत जोखमीची ठरली असती. या परिस्थितीत डॉ. नक्षणे यांनी लीडलेस तंत्रज्ञानाचा पर्याय निवडत पेसमेकर प्रत्यारोपित केला. हे उपकरण अतिशय सूक्ष्म, वायरविरहित असून, पायाच्या शिरेतून कॅथेटरद्वारे थेट हृदयात बसविले जाते. डॉ. सीमा अजय नक्षणे (गवळी) म्हणाल्या, लीडलेस पेसमेकर हे हृदयरुग्णांसाठी एक क्रांतिकारी पर्याय ठरत आहेत. पारंपरिक पेसमेकरच्या तुलनेत ही प्रक्रिया अधिक सुरक्षित, वेदनारहित आणि लवकर पुनर्वसन करणारी आहे. याप्रसंगी डॉ. कांचन भांबरे, डॉ. गिरीश बच्छाव, अनुप त्रिपाठी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# महायुतीत तणाव; तपोवनात शिंदेसेनेचे आंदोलन

## भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न; प्रतीकात्मक करवत, कुऱ्हाड जाळून निषेध

**नाशिक : प्रतिनिधी**

**तपोवनातील वृक्षतोडीवरून महायुतीतच संघर्ष निर्माण झाला असून, अजित पवारांनंतर आता शिंदेसेनेनेदेखील या प्रकरणात उडी घेत शुक्रवारी (दि.५) तपोवनातील साधुग्राममध्ये आंदोलन केले. तसेच यावेळी प्रतीकात्मक करवत, कुऱ्हाड जाळून प्रशासनाचा निषेध केला. आणि अठराशे वृक्षतोडीचा प्रस्ताव मागे घेण्याची जोरदार मागणी केली. दरम्यान, तपोवनातील वृक्षांवरून महायुतीत ठिणगी पडली असून, याद्वारे भाजपला एकाकी पाडण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येत आहे.**





शिवसेना शिंदे गटाच्या वतीने तपोवन येथील वृक्षतोडीस तीव्र विरोध करताना पदाधिकारी. दुसऱ्या छायाचित्रात झाडांना राखी बांधताना महिला पदाधिकारी. (छाया : सोज्वळ साळी)

शिंदेसेनेचे उपनेते तथा जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, महानगरप्रमुख प्रवीण तिदमे आदींसह महिला पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेनेकडून (शिंदे गट) आंदोलन करत वृक्षतोडीच्या प्रस्तावित निर्णयाला तीव्र विरोध करण्यात आला. महायुतीतील घटक पक्षांकडूनच आंदोलन केले जात असल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. गेल्या काही दिवसांपासून तपोवनातील वृक्षतोडीच्या मुद्द्याच्या विरोधात विविध संघटना, पर्यावरणप्रेमी, वृक्षप्रेमी यांच्याकडून आंदोलन केले जात आहे. तपोवन परिसरात शिंदेसेनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्ते शेकडोंच्या संख्येने एकत्र येत हातात वृक्षतोडीला विरोध दर्शविणारे फलक घेत जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी वृक्षतोड थांबवा, अन्यथा तीव्र परिणाम भोगा, असा इशारादेखील देण्यात आला. प्रशासनाची भूमिका संशयास्पद हा मुद्दा संवेदनशील आणि अत्यंत महत्त्वाचा आहे. कोणीही या विषयात राजकारण आणू नये, ही झाडंच राहिली नाहीत तर काय होईल. साधुसंतांना कुंभमेळा साजरा करण्यासाठी झाडेच लागतात, मला वाटत नाही की, कोणीही साधुसंत येथील झाडे तोडून येथे साधुग्राम बांधण्यास तयार होईल. हा मुद्दा आम्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कानावर टाकू आणि नाशिककरांच्या भावना त्यांच्यापर्यंत पोहोचवू. एकदा आपण प्रशासनाशी बोला, प्रशासन नक्की काय करते आहे? प्रशासनाचा विचार काय? असा प्रश्न आपण त्यांना विचारा, असे आम्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सांगणार असून, प्रशासनाची ही भूमिका संशयास्पद असल्याचा आरोप शिंदेसेनेचे उपनेते अजय बोरस्ते यांनी केला आहे.

### पोलिसांचा चोख बंदोबस्त

आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी शहर पोलिसांनी तातडीने मोठा पोलिस बंदोबस्तदेखील तैनात करण्यात आला होता. नाशिक शहर पोलिस आणि दंगा नियंत्रण पथक यावेळी तैनात करण्यात आले होते.

### महिला पदाधिकाऱ्यांनी वृक्षांना बांधल्या राख्या

महिलांकडून वृक्षांना राख्या बांधण्यात आल्या. यावेळी आंदोलनात सहभागी असलेल्या शिंदेसेनेच्या महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून ओवाळणी करून येथील वृक्षांना राख्यादेखील बांधण्यात आल्या. सदर वृक्ष म्हणजे आमचे भाऊ, असा संदेशदेखील यावेळी देण्यात आला. हे झाड आमचे भाऊ असून, याच्यावर कुठलीही कुऱ्हाड चालू देणार नसल्याची भूमिकादेखील यावेळी शिंदेसेनेच्या महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून घेण्यात आली.

### साधुग्राम साधूंसाठी की संधिसाधूंसाठी?

साधुग्राममधील झाडे तोडण्यासाठी प्रशासन एवढा अट्टहास का करत आहे? मुळात नाशिककरांची भावना भाजपला का दिसत नाही, तसेच साधुग्राममधील जागा साधूंसाठी की संधिसाधूंसाठी, यावरच संशय येतो आहे. जनता जनार्दन असून, जनतेपेक्षा कोणीही मोठे नाही हे भाजपनेही लक्षात घ्यावे. त्यांनाही जनतेत जावे लागणार आहे. शिवसेनेची नाळ नेहमीच सर्वसामान्य नागरिकांशी जुळलेली असून, सत्ता असो किंवा नसो, त्यांच्या हक्कासाठी सदैव रस्त्यावर असते. **– अजय बोरस्ते,** उपनेते, शिंदेसेना

### नाशिकला भकास करणारा विकास नको

नाशिकला भकास करून विकास आम्हाला नकोय. कुंभमेळ्याच्या नावाखाली ३३ वर्षे ही जमीन खासगी ठेकेदाराच्या ताब्यात देण्याचा हा उद्योग आहे. ठेकेदारीसाठी १७०० झाडांची कत्तल करणे महापाप आहे. जिथे संवेदना तिथे शिवसेना कायम आहे. झाडे तोडून कुंभमेळा साजरा करणे साधू–महंतांनाही आवडेल काय? वृक्षतोडीला आमचा विरोधच राहील. महापालिका प्रशासनाने या प्रकरणी तत्काळ भूमिका स्पष्ट करून ही झाडे तोडली जाणार नाहीत, याची ग्वाही द्यावी. **–प्रवीण तिदमे,** महानगरप्रमुख, शिंदेसेना

# कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नागपूरला बेमुदत उपोषण

**नाशिक : प्रतिनिधी**

समग्र शिक्षा योजनेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी गेल्या २० वर्षांपासून सुरू असलेल्या अन्यायाविरोधात हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी (दि. ८) नागपूर येथील यशवंत स्टेडियमवर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. शासन सेवेत समायोजन करून कायम करावे किंवा स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी, या दोनच मागण्यांसाठी हे तीव्र आंदोलन छेडण्यात आले आहे.

राज्य कार्याध्यक्ष सुनील दराडे (सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, समग्र शिक्षा - जि. प. नाशिक), कायदेशीर सल्लागार यशवंत रायसिंग (विषयतज्ज्ञ, नाशिक), राज्य सरचिटणीस पराग चाकोरीकर (कनिष्ठ अभियंता, त्र्यंबकेश्वर), जिल्हाप्रमुख सोमनाथ भाबड (विषयतज्ज्ञ, नाशिक) आणि महिला जिल्हाप्रमुख अनिता देशमुख (दस्तऐवज व संशोधन सहाय्यक) यांनी या आंदोलनाची माहिती दिली.

समग्र शिक्षेतील कर्मचारी दोन दशकांपासून अतिशय अल्प मानधनावर विविध शैक्षणिक कामे करीत आहेत. २० वर्षांत एकही मागणी मान्य झालेली नाही, तर अनेक कर्मचाऱ्यांच्या सेवासमाप्तीचा कालावधी ३ ते ६ महिने एवढाच शिल्लक आहे. पुढील चार वर्षांत तब्बल ५० टक्के कर्मचारी सेवाबाहेर जाण्याच्या मार्गावर आहेत.



मानधनात आठ वर्षांपासून वाढ नाही, अन्य कोणत्याही शासकीय सेवासुविधा मिळत नाहीत.

अभ्यास समितीचा अहवाल अंतिम, तरीही निर्णय नाही. ४ मार्च २०२५ च्या शासन निर्णयानुसार स्थापलेल्या अभ्यास समितीच्या २५ जून, २२ ऑगस्ट आणि ४ सप्टेंबर अशा तीन बैठकाही पूर्ण झाल्या असून, अहवाल शासनाकडे दाखल आहे. मात्र, गेल्या १ वर्ष ५ महिन्यांपासून शासन सेवेत समायोजनाचा निर्णय प्रलंबित आहे.

याच योजनेतील अर्ध्या कर्मचाऱ्यांना ८ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयान्वये कायम करण्यात आले; परंतु उर्वरित कर्मचाऱ्यांबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. कर्मचारी संघटनेनुसार, पंजाब, सिक्कीम, मणिपूरसह अनेक राज्यांत समग्र शिक्षेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम केले गेले आहे. आसाम, मध्य प्रदेश, छत्तीसगडमध्ये २०११ पासून वेतन आयोगानुसार पगार आणि सेवा सुविधा देण्यात येतात. काही राज्यांत सेवेत असताना मृत्यू झाल्यास कुटुंबाला अनुकंपा भरती दिली जाते, परंतु महाराष्ट्रात कोणतीही सुविधा उपलब्ध नाही.

सेवेत असताना मृत्यू झालेल्या २५७ कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत मिळालेली नाही. तुटपुंज्या मानधनामुळे आरोग्य, शिक्षण, कर्ज, कौटुंबिक गरजा आणि भविष्यातील सुरक्षिततेची मोठी समस्या निर्माण झाली आहे. ५८ वर्षांनंतर कोणताही आर्थिक लाभ उपलब्ध नाही.

आंदोलनकर्त्यांनी इशारा दिला आहे की, आमरण उपोषण सुरू झाल्यानंतर पाच दिवसांत योग्य निर्णय न झाल्यास ६व्या दिवसापासून आम्ही मुलांसह संपूर्ण कुटुंबासह आंदोलनात सामील होऊ. नैराश्यातून एखादी अघटित घटना घडल्यास त्यास शासन व प्रशासन जबाबदार राहील.

या आंदोलनात अन्नत्याग, शंखनाद, थाळीनाद, घंटानाद, टाळनाद, आक्रोश, भीक मागो, मूक आंदोलन आणि आत्मक्लेश आंदोलन अशा विविध प्रकारांचा समावेश आहे.

# घरपट्टी थकबाकीचा डोंगर ९२० कोटींवर

## चार महिन्यांत सातशे कोटी वसुलीचे मनपाला आव्हान

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरातील करदात्यांकडील थकबाकीचा आकडा तब्बल ९२० कोटींवर पोहोचला आहे. या थकबाकीत चालू मागणी सहाशे कोटी व शास्तीची ३८७ कोटी, असे मिळून हा आकडा नऊशे कोटींच्या घरात गेला आहे. चालू आर्थिक वर्षातील वसुली दोनशे कोटींपर्यंत गेली असून, उर्वरित सव्वासातशे कोटींच्या थकबाकीचा डोंगर कसा पार करायचा, असा प्रश्न महापालिकेसमोर आहे.

घरपट्टीद्वारे वसूल होणाऱ्या रकमेतून महापालिका विविध विकासकामे करत असते. त्यामुळे महापालिकेसाठी उत्पन्नाचे मुख्य साधन आहे. दरम्यान, घरपट्टी वसुली अत्यंत कासवगतीने होत असल्याने त्याचा फटका बसत असल्याचे चित्र आहे. अभय योजनेत अवघी ७५ कोटींची वसुली झाली. अभय योजनेद्वारे किमान शंभर कोटींची वसुली होण्याचे उद्दिष्ट होते; परंतु ७५ कोटींवरच शास्तीची थकबाकी रखडल्याने पुढील चार महिन्यांत ७२५ कोटी वसुलीचे शिवधनुष्य पेलायचे आहे. एवढी मोठी रक्कम कर विभाग कशी वसूल करणार, हे पाहावे लागणार आहे.

### निवडणुकीमुळे वसुलीला अडथळे


महापालिकेच्या कर विभागाच्या हाती नवीन आर्थिक वर्ष लागण्यापूर्वी चार महिन्यांचा कालावधी आहे. मात्र, महापालिका निवडणूक येत्या एक–दोन महिन्यांत होण्याची शक्यता आहे. त्याकरिता निवडणुकीच्या कामकाजासाठी कर विभागातील अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनाही कामाला लावल्याने थकबाकी वसुलीला ब्रेक लागणार आहे. परिणामी, २०२५–२६ या आर्थिक वर्षातील थकबाकीचा डोंगर कमालीचा वाढणार आहे.

### गतवर्षापेक्षा १५ कोटींची अधिक वसुली

गेल्या वर्षी २०२४–२५ च्या आर्थिक वर्षात एप्रिल ते नोव्हेंबरदरम्यान १८० कोटींची वसुली झाली होती. चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते नोव्हेंबर महिन्यात १९५ कोटींचा भरणा करदात्यांनी केला. ही रक्कम मागील वर्षापेक्षा १५ कोटींनी अधिक आहे.



शहरात घरपट्टीधारकांची संख्या पाच लाख १३ हजारांच्या घरात आहे. चालू घरपट्टीची मागणी तीनशे कोटींच्या घरात आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याकरिता महापालिकेला २५ टक्के हिश्श्याची रक्कम जमा करायची आहे. चारशे कोटींचे बॉण्ड उभारले आहेत. उर्वरित रकमेसाठी कर विभागाकडून जास्तीत जास्त वसुलीसाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

आरओसी-२०२५-२६/क्र-५/C४३८९



थंडी वाढल्याने सुकामेव्याच्या मागणीत वाढ
पान २

• नाशिक आज
# गांवकरी



'केजीएस'कडून ६.५ कोटींची बुडीत रक्कम अदा पान २

gavakari.in gavkarinews.com
नाशिक, शनिवार, दि. ६ डिसेंबर २०२५

## संक्षिप्त

### कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे आज संवादिनी संमेलन

**नाशिक : प्रतिनिधी**

विख्यात संवादिनीवादक स्व. पंडित अप्पा जळगावकर यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे संवादिनी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी (दि. ६ डिसेंबर) सायंकाळी साडेसहा वाजता कुसुमाग्रज स्मारकात होणाऱ्या या संवादिनी संमेलनात पंडित अप्पा जळगावकर यांचे शिष्य आणि मानसपुत्र प्रसिद्ध संवादिनीवादक सुरेश फडतरे, तसेच पंडित सुभाष दसककर यांचे संवादिनीवादन होणार आहे. सुरेश फडतरे यांना तबला साथ हनुमंत फडतरे यांची आहे. सुभाष दसककर यांना संवादिनी साथ सूरश्री दसककर करणार आहेत. तबला साथ सुजित काळे यांची आहे. पंडित अप्पा जळगावकर यांनी संगीत क्षेत्रात मोलाची कामगिरी केली असून, संवादिनी वादनाचे क्षेत्र, साथसंगत आणि एकल संवादिनीवादन आपल्या सौंदर्यपूर्ण वादनाने समृद्ध केले आहे. अशा तपस्वी कलावंतांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित या कार्यक्रमास रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रतिष्ठानतर्फे करण्यात आले आहे.

### अत्याचारग्रस्त दिवंगत व्यक्तीच्या वारसांना शासकीय नोकरीची संधी

**नाशिक : प्रतिनिधी**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ अंतर्गत दाखल खून प्रकरणातील दिवंगत व्यक्तीच्या कुटुंबातील एका पात्र वारसाला शासकीय/निमशासकीय नोकरी देण्याबाबतचा निर्णय २० नोव्हेंबर २०२५ रोजी शासनाने घेतला आहे. जिल्ह्यातील सन २०१२ ते २०२५ या काळातील एकूण ३४ प्रकरणांचा समावेश यात होत आहे. अत्याचारग्रस्त कुटुंबातील व्यक्ती/ वारसाने सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नाशिक-पुणे रोड, नाशिक येथे शासननिर्णयात नमूद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करावा, असे आवाहन समाजकल्याण सहाय्यक आयुक्त देवीदास नांदगावकर यांनी केले आहे.

### सरिता दिवाला विद्यापीठाचा ध्वजधारकाचा बहुमान

**नाशिक : प्रतिनिधी**

नांदेड येथे २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सर्व खेळांत सहभागी होणाऱ्या एसएनडीटी महिला विद्यापीठाचा ध्वजधारक होण्याचा बहुमान एसएमआरके महिला महाविद्यालय, नाशिकची राष्ट्रीय सुवर्णपदकविजेती खेळाडू सरिता दिवा हिला देण्यात आला आहे. महाविद्यालय आणि नाशिक खो-खोच्या इतिहासात प्रथमच सरिता दिवा या खो-खो खेळाडूला हा बहुमान मिळाला आहे. ही नाशिकच्या क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानाची बाब आहे. ती संस्कृती नाशिक आणि स्व. सुरेखाताई भोसले निवासी खो-खो प्रबोधिनीची खेळाडू आहे, याचा सर्वांना सार्थ अभिमान आहे. सरिता दिवाला या राष्ट्रीय स्पर्धेत मिळालेला हा मनाचा तुरा ती आपल्या खेळातील कौशल्याच्या जोरावर सार्थ ठरवेल आणि आपल्या संघासाठी उत्तम कामगिरी करेल, असा विश्वास प्रशिक्षकांनी व्यक्त केला.

### प्रचार-प्रसार प्रमुखपदी लौकिक प्रभुणे यांची निवड

**नाशिक : प्रतिनिधी**

श्रीदत्त जयंतीच्या दिवशी नारायणरत्न प्रकाशराव प्रभुणे महाराज यांनी श्री लोकनाथतीर्थ स्वामी महाराज महायोग ट्रस्ट, जागतिक मुख्य केंद्र नाशिक येथे भारत प्रचार-प्रसार प्रमुखपदासाठी लौकिक प्रभुणे यांच्या नावाची घोषणा केली. यावेळी लौकिक प्रभुणे यांनी प्रभुणे महाराजांचे आशीर्वाद घेत अनेक साधकांच्या साक्षीने पदभार स्वीकारला. शक्तिपाताचार्य नारायणकाका ढेकणे महाराज यांचा पादुका प्रचार व प्रसार दौरा भारतभर करणार आहोत, असे त्यांनी सांगितले.

### युवाशक्ती फाउंडेशनतर्फे राज्यात आठ रोजगार मेळाव्यांचे नियोजन

**नाशिक : प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि युवाशक्ती फाउंडेशन (नाशिक) यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या आठही विभागीय केंद्रांतर्गत १८ ते ३५ वर्षे वयोगटातील बेरोजगार तरुण-तरुणींसाठी आठ रोजगार मेळाव्यांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार येत्या शुक्रवारी (दि. १२ डिसेंबर) सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ मुख्यालयातील कृषी विज्ञान केंद्र येथे पहिल्या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनाखाली होणाऱ्या या मेळाव्यासाठी महाराष्ट्रातील वीसपेक्षा अधिक नामांकित व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमधील दोन हजार १५० हून अधिक रिक्त पदे उपलब्ध असणार आहेत. या नोकरी मेळाव्यासाठी सर्व शाखांतील पदवीधर, आयटीआय (सर्व ट्रेंड्स), डिप्लोमा, इंजिनिअरिंग (इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल), सीएनसी ऑपरेटर आणि सीपेट शिक्षण पूर्ण केलेले, तसेच दहावी, बारावी उत्तीर्ण व अनुत्तीर्ण झालेले विद्यार्थी मोफत अर्ज करू शकतात.

# जिल्हाधिकारी कार्यालयावर शिक्षकांचा आक्रोश मोर्चा







नाशिक : प्राथामिक व माध्यमिक शिक्षकांतर्फे विविध मागण्यांसाठी शुक्रवारी काढण्यात आलेला आक्रोश मोर्चा. (छाया : रविकांत ताम्हणकर)

## ९ डिसेंबरला मंत्रालयासमोर आंदोलनाचा इशारा

**नाशिक : प्रतिनिधी**

**सेवेत रुजू करून घेताना आमच्यामध्ये गुणवत्तापूर्ण पात्रता होती. एवढ्या वर्षे सेवा दिल्यानंतर तुम्ही आता आमची पात्रता परीक्षेच्या माध्यमातून तपासणार का? असे अनेक सवाल उपस्थितीत करत जिल्ह्यातील माध्यमिक व प्राथमिक शिक्षकांनी शुक्रवारी (दि.५) जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढला. यावेळी राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करण्यास विलंब करत असल्याचा निषेध नोंदवला.**



नाशिक : आक्रोश मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आल्यावर उपस्थिताना संबोधित करताना राजू देसले. (छाया : रविकांत ताम्हणकर)

या आक्रोश मोर्चात वीसहून अधिक प्रमुख माध्यमिक व प्राथमिक शिक्षक संघटनांचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गोल्फ क्लब मैदानावरून दुपारी १२ वाजता मोर्चाला सुरुवात झाली. मोर्चाच्या सुरुवातीला महिला शिक्षक, त्यानंतर पुरुष शिक्षक अशा क्रमवारीने मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मार्गस्थ झाला. यावेळी शिक्षकांनी विविध घोषणा दिल्या. 'रद्द करा रद्द करा टीईटी परीक्षा रद्द करा', 'शिक्षक एकजुटीचा विजय असो' यांसारख्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. हा मोर्चा त्र्यंबक नाका, सीबीसीएसमार्गे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर येताच मोर्चेकरी शिक्षकांनी ठिय्या मांडल्याने मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. सुमारे एक तासाहून अधिक काळ ही सभा सुरू होती. यावेळी विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी लवकरात लवकर सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करण्याची मागणी केली.

### या आहेत मागण्या

- जुन्या निकषाप्रमाणे संचमान्यता करावी.
- शाळास्तरावरील अशैक्षणिक कामे बंद करावीत.
- १ नोव्हेंबर २०२५ पूर्वी नियुक्त व १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी.
- शिक्षणसेवक योजना रद्द करून नियमित वेतनश्रेणी लागू करावी.
- शिक्षण क्षेत्रातील कंत्राटीकरण थांबवावे.




### या संघटनांचा सहभाग

राज्यभरात शिक्षकांच्या वीसहून अधिक प्रमुख संघटना कार्यरत आहेत. या मोर्चात माध्यमिक शिक्षक, शिक्षक मनसे सेना, मुख्याध्यापक, टीडीएफ, पदवीधर, आदिवासी शिक्षक, प्राथमिक शिक्षक संघ, समता शिक्षक, मागासवर्ग शिक्षक संघटनांसह अन्य शासकीय–निमशासकीय संघटना सहभागी झाल्या होत्या.

### पंधराशेहून अधिक शाळा बंद राहिल्याचा दावा

आक्रोश मोर्चात जिल्हाभरातील आठ हजारांहून अधिक प्राथमिक व माध्यमिक शिक्षक सहभागी झाले होते. साडेअकरापर्यंत सुमारे सात हजार शिक्षक गोल्फ क्लब मैदानावर जमले होते. त्यानंतरही मोर्चात सहभाग घेण्यासाठी शिक्षक येतच होते. त्यामुळे महापालिका, जिल्हा परिषद,तसेच विनाअनुदानित, अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आणि उच्च माध्यमिकच्या १,५०० हून अधिक शाळा शुक्रवारी बंद राहिल्याचा दावा आंदोलक शिक्षकांनी केला आहे.

**“ मी कायम शिक्षकांच्या पाठीशी असून, तुमच्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी पाठपुरावा करणार आहे. शिक्षणमंत्र्यांना भेटलो असून, प्रश्न निकाली काढण्याची मागणी केली आहे. शिक्षकांमध्ये अशीच एकजूट राहू द्या. मागण्या मान्य झाल्याशिवाय मीदेखील मागे हटणार नाही.**
**- भास्कर भगरे, खासदार**

**“ सरसकट पात्रता परीक्षा लागू केली, ती रद्द करावी. १५ मार्च २०२५ पर्यंत संचमान्यता निर्णय रद्द करावा. शिक्षकांवर निवडणुकीच्या कामासारखी अशैक्षणिक कामे लादू नयेत. जुनी पेन्शन योजना लागू करून वस्तीशाळा शिक्षकाची सेवा नोकरीला लागल्यापासून ग्राह्य धरावी.**
**- काळूजी बोरसे, राज्य नेते, शिक्षक समिती**

**“ सन २०१३ पूर्वी नियुक्त झालेल्या सर्व माध्यमिक व प्राथमिक शिक्षकाना टीईटी परीक्षा अनिवार्य करू नये. त्यामुळे राज्य सरकारने लवकरात लवकर सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी.**
**- नंदलाल धांडे, अध्यक्ष, खासगी प्राथमिक शिक्षक महासंघ, नाशिक**

## तपोवनातील वृक्षतोडीविरोधात दिव्यांगांची रॅली



**नाशिक : प्रतिनिधी**

तपोवनातील झाडे तोडण्याचा निर्णय रद्द करून एक्झिबिझन सेंटरच्या निविदा प्रक्रियेस स्थगिती देऊन, एकही झाड तोडता कामा नये, या मागणीसाठी शुक्रवारी (दि. ५) तपोवन भागात दिव्यांग बांधवांनी रॅली काढली. यावेळी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी रवींद्र टिळे, संतोष मानकर, ललित पवार, बबलू मिर्झा, बच्चू निकाळजे, ललितताई पवार, दत्तू बोडके, अनिल भडांगे, विशाल पाटील, नितीन गवळी, प्रमोद केदारे, सोमनाथ नागरे, राजू देसले, प्रभाकर धात्रक, तल्हा शेख, हिरामण मनोहर, ओमकार वेळमकर, विजय सोनार, राजेंद्र गायकवाड, संजय पवार, वंदना शिंदे, वैशाली चव्हाण, मनीषा स्वामी, दिनेश स्वामी, पी. एच. जोशी, हिरामण गोड, राहुल मुदकर, विजय वाळवे, मतेनकर, पुष्पलता देवरे यांसह दिव्यांग बांधव व नागरिक उपस्थित होते.

यावेळी दत्तुभाऊ बोडके यांनी 'रामायणा'मध्ये रावणाचा नाश करण्यासाठीच्या लढाईत प्रभू श्रीरामचंद्रांना जशी वानरसेनेने सहभाग घेऊन मदत केली, त्याप्रमाणे आता तपोवन याठिकाणी साधू-संतांच्या नावाखाली सरकार, महानगरपालिका जे प्रदर्शन केंद्र करणार आहे, त्याला विरोध करण्यासाठी शहर-जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी जोरदार पाठिंबा दिला.

सरकार आणि महानगरपालिकेने झाडे तोडण्याचा निर्णय रद्द करून, प्रदर्शन केंद्राच्या निविदा प्रक्रियेला स्थगिती दिली नाही, तर आम्ही दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने राजीव गांधी भवन, महापालिका आयुक्त कार्यालयात आंदोलन करू, असा इशाराही देण्यात आला.

## प्रभाग ३० मध्ये पाण्याची नासाडी

**इंदिरानगर : वार्ताहर**

येथील प्रभाग क्रमांक ३० मध्ये एकीकडे गेल्या काही दिवसांपासून पाण्याची कृत्रिम टंचाई निर्माण झाली आहे. दुसरीकडे, पाणी गळतीचे संकट तीव्र बनले आहे. परिसरातील अण्णा भाऊ साठेनगर, मदारनगर, मेहबूबनगर, सादिकनगर, तसेच गरीब नवाज मस्जिद परिसरात लाखो लिटर पाणी रस्त्यावर वाहत असल्याचे चित्र दिसत आहे. या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष द्यावे, अशी मागणी माजी नगरसेविका डॉ. दीपाली कुलकर्णी यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

योग्य प्रमाणात पाणी मिळावे यासाठी प्रभागातील वस्त्यांमध्ये नव्याने आठ इंची व्यासाच्या पाण्याच्या पाइपलाइन बसविण्यात आल्या. मात्र, त्यानंतर काही नागरिकांकडून अनधिकृतपणे नव्या लाइनवर कनेक्शन घेतले गेले. अधिक दाबाने पाणी मिळावे म्हणून मोठ्या व्यासाच्या नव्या पाइपलाइनवर कनेक्शन हलवण्यात आले. जुन्या पाइपलाइनवरील जोडण्या बंद करण्याची तसदी कोणीही घेतली नाही. त्यामुळे जुन्या पाइपलाइनमधून प्रचंड प्रमाणात पाणी बाहेर पडत आहे. या गळतीमुळे दररोज लाखो लिटर पाणी रस्त्यावर वाहत असून, परिसरात मोठ्या प्रमाणात चिखल साचलेला आहे. पाणी साचल्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. विशेषतः लहान मुले व ज्येष्ठ नागरिक ताप व अन्य आजारांना बळी पडत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. पाणी गळतीमुळे आरोग्याचे संकट आणि पाण्याचा प्रचंड अपव्यय होत आहे. महापालिका प्रशासनाने तातडीने अनधिकृत नळकनेक्शन बंद करून गळती रोखावी, अशी मागणी माजी नगरसेविका डॉ. दीपाली कुलकर्णी यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

### तातडीने गळती रोखण्याची मागणी

**“ पाणीगळती गेल्या एक वर्षापासून चालू आहे. जशी नवीन पाइपलाइन झाली तेव्हापासून ही गळती होत आहे. तक्रार करावी इतकी छोटी पाणीगळती नाही तरी त्यावेळी अभियंता रवींद्र धारणकर यांच्याकडे तक्रार केली होती. आतादेखील पूर्व विभागाचे अधिकारी रवींद्र धारणकरच आहेत. अनेकदा तोंडी तक्रार करून झाली, पण काहीही उपयोग झाला नाही. आता तरी तक्रारीची दखल घेऊन पाणीगळती थांबवावी.**
**- डॉ. दीपाली कुलकर्णी**

# महामानव भारतरत्न डॉ. आंबेडकरांच्या अस्थींचा 'स्तूप'

## सय्यद पिंप्रीतील प्रेरणास्थान; विचारांचा वारसा कायम टिकून

**सिडको : दिलीपराज सोनार**

**महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ संविधानाचे शिल्पकार किंवा सामाजिक समतेचे प्रतीक नसून, अनेकांच्या जीवनात प्रेरणेचा स्रोत ठरले आहेत. त्यांच्या विचारांचे व कार्याचे जतन करणे, हे केवळ ऐतिहासिक कर्तव्य नाही, तर समाजासाठी एक संस्कारप्रधान संदेश आहे. नाशिक तालुक्यातील सय्यद पिंप्री गाव या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे ठरते. कारण येथे बाबासाहेबांच्या अस्थींचा पवित्र स्तूप धम्मवस्तीत उभारण्यात आला आहे.**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची मैत्री इतिहासात सुप्रसिद्ध आहे. या मैत्रीच्या आठवणी जपणारे सिद्ध पिंप्रीचे भूमिपुत्र पी. एल. लोखंडे हे बाबासाहेबांचे खंदे समर्थक होते. डॉ. आंबेडकर यांच्या निधनानंतर त्यांच्या अस्थींचे जतन करण्याचे श्रेय दादासाहेब गायकवाड आणि पी. एल. लोखंडे यांनी घेतले. नाशिकपासून सुमारे १८ किलोमीटर अंतरावर असलेल्या सय्यद प्रिंपी या गावात स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने आणि दानशूर व्यक्तींच्या मदतीने सुंदर स्तूप उभारला गेला. तेथे ३० मे १९५८ रोजी बाबासाहेबांच्या पवित्र अस्थींचे रोपण करण्यात आले.

स्तूपाच्या लोकार्पणप्रसंगी मुकुंदराज आंबेडकर, दादासाहेब गायकवाड, पी. एल. लोखंडे आणि गावातील नागरिक उपस्थित होते. स्तूपाच्या मागच्या बाजूला मुकुंदराज आंबेडकर यांच्या हस्ते बोधिवृक्ष लावण्यात आला होता. तो आजही तितकाच पवित्र आणि जिवंत आहे. दरवर्षी ३० मे या दिवशी या ठिकाणी वर्धापन दिन उत्साहात साजरा केला जातो. त्यामुळे बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा स्थानिक समाजात कायम टिकून राहतो.

गेल्या १५ वर्षांत सोशल मीडियाच्या माध्यमातून सय्यद पिंप्री येथील स्तूपाचा प्रचार मोठ्या प्रमाणात झाला. परिणामी १४ एप्रिल व ६ डिसेंबर या दिवशी अनुयायांची उपस्थिती विशेष वाढली आहे. जे समाजबांधव ६ डिसेंबर रोजी दादर (मुंबई) येथील चैत्यभूमीवर जाऊ शकत नाहीत, ते सय्यद पिंप्रीला येऊन बाबासाहेबांना मानवंदना देतात. स्थानिक युवा मंडळी व समाजबांधव यावेळी सुरक्षा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष व्यवस्था करतात.

### प्रेरणेचे प्रतीक

कर्मवीर दादासाहेब गायकवाड, पी. एल. लोखंडे आणि ग्रामस्थांच्या प्रयत्नांतून उभारलेला हा स्तूप केवळ ऐतिहासिक वास्तू नाही, तर समाजासाठी प्रेरणास्थान ठरला आहे. बाबासाहेबांचे विचार, त्यांचे जीवन, सामाजिक न्यायासाठी केलेले कार्य आणि शिक्षणाचे महत्त्व याठिकाणी नेहमीच अनुभवता येते. अशा ठिकाणी जाऊन आपल्याला फक्त इतिहासाचा अनुभव नाही, तर समाजसेवेची, समतेची आणि मानवतेची जाणीवही होते. सहा डिसेंबरला नाशिक तालुक्यातील सय्यद पिंप्री येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थींच्या स्तूपास मानवंदना देऊन त्यांचा आदर व्यक्त करणे, ही केवळ परंपरा नाही, तर प्रत्येक समाजबांधवाचे कर्तव्य आहे. हा स्तूप आजही आपल्या समाजासाठी प्रेरणेचे प्रतीक आहे आणि समाजातील नवतरुणांसाठी मूल्यांचा मार्गदर्शक आहे.

## संक्षिप्त



### इगतपुरीत गुरुचरित्र पारायणाची सांगता

**इगतपुरी : प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ मंदिराचा वर्धापन दिन व दत्तजयंतीनिमित्त अखंड नामजप सप्ताह व गुरुचरित्र पारायण सांगता सोहळ्यानिमित्त श्री स्वामी समर्थ मंदिर ग्रुप ट्रस्टतर्फे गुरुचरित्र पारायण सप्ताहाचे आयोजन केले होते. पारायणात १६१ भाविकांनी सहभाग नोंदवला होता. शुक्रवारी (दि. ५) पारायणाची सांगता होऊन महाप्रसादाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे आयोजन श्री स्वामी समर्थ मंदिर ट्रस्टचे मार्गदर्शक अध्यक्ष संदीप किर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वितेसाठी मार्गदर्शक देवीदास शिंदे, ट्रस्टचे उपाध्यक्ष चंद्रकांत वालझाडे, खजिनदार संदीप दिवटे, शनैश्वर पतसंस्थेचे चेअरमन बाळासाहेब वाघचौरे, ज्ञानेश्वर शिंदे, प्रकाश केदार यांनी योगदान दिले. पारायणाचे नियोजन अमोल क्षीरसागर, बापू काळे, गणेश साळुंके, ज्ञानेश्वर आंबेकर, लांडे काका, एकनाथ भोर, योगेश शेलार, लहू भगत, अविनाश कडू, गौतमी किर्वे, माया आव्हाड, सुनंदा शेलार यांनी केले.



### निफाडला दिव्यांगांना साहित्य वाटप

**निफाड : तालुका प्रतिनिधी**

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त निफाड पंचायत समितीतर्फे दिव्यांग विद्यार्थ्यांना टीएलएम साहित्य गटविकास अधिकारी नम्रता जगताप, गटशिक्षणाधिकारी विलास साळी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. याप्रसंगी दिव्यांग विद्यार्थ्यांचा निफाड पंचायत समितीच्या प्रशासनाने पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. साहित्य वाटप करण्यासाठी आयडी समन्वयक मुकेश जगताप, विशेष शिक्षक दौलत जामकर, विजया अवचार, अर्चना राणे, स्नेहल गिते, शीला मोरे, रेणुका घोटेकर, वनिता मंडलिक, विषयतज्ज्ञ विजय खालकर, आत्माराम न्याहारकर, प्रमोद चव्हाण, साळुंखे आदी उपस्थित होते.

### मौजे सुकेणे विद्यालयाची लघुनाटिका प्रथम

**कसबे सुकेणे : प्रतिनिधी**

मौजे सुकेणे (ता. निफाड) येथील कर्मवीर रावसाहेब थोरात माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर सादर केलेली लघुनाटिका प्रथम आली. तालुकास्तरावर झालेल्या केंद्रस्तरीय स्पर्धेतही सदर नाटिका पहिली आली होती. नाशिक येथील रावसाहेब थोरात सभागृहात झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत पुन्हा प्रथम क्रमांक मिळविला. या विद्यार्थ्यांनी मोबाइलचे फायदे व तोटे याविषयी नाटिका सादर केली होती. नाटिकेत यश देशमुख, संचिता नळे, खुशी बोरा, राज राहणे, ईश्वरी काळे, वेदांत हळदे, दर्श भोजने, समृद्धी पागेरे यांनी सहभाग नोंदविला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती डी. बी. मोगल, उपाध्यक्ष विश्वास मोरे, तालुका संचालक शिवाजी गडाख, संचालिका शोभा बोरस्ते, प्राचार्य रायभान दवंगे, उपमुख्याध्यापक अनिल परदेशी यांनी अभिनंदन केले.

### अंदरसूल महाविद्यालयात संविधान दिन

**येवला : प्रतिनिधी**

तालुक्यातील अंदरसूल येथील मातोश्री शांताबाई गोविंदराव सोनवणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात झाला. भारताच्या संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि संविधानातील मूल्ये यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या वतीने पुष्पहार अर्पण करण्यात आला. संस्थेचे प्रशासकीय अधिकारी आर. बी. गायकवाड, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य सचिन सोनवणे, प्राचार्या डॉ. सुवर्णा म्हस्के, माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री परदेशी उपस्थित होत्या. शेवटी विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने संविधान वाचन करण्यात आले. याप्रसंगी वैष्णवी माळी, प्रतीक्षा वाकचौरे, प्रतिभा कोटमे, गणेश आमोदकर, शिवप्रसाद शिरसाट, मयूर भागवत, मयूर खैरनार, वरद मिसाळ आदी उपस्थित होते.




## टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत एसकेडी स्कूल संघ विजेता

**देवळा : प्रतिनिधी**

तालुक्यातील भावडे येथील एसकेडी इंटरनॅशनल स्कूलमध्ये टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा घेण्यात आल्या. यात जिल्ह्यातील नऊ शाळांनी सहभाग नोंदविला होता. एस.के.डी. इंटरनॅशनल स्कूलने विजेतेपद पटकाविले. प्रारंभी जिल्हा क्रीडा समन्वयक व एस.के.डी. स्कूलचे प्राचार्य एस. एन. पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले.

व्हीकेडी विद्यालयाचे प्राचार्य एन. के. वाघ, पर्यवेक्षक सुधीर सोनवणे, सागर कैलास, बबलू देवरे आदी प्रमुख पाहुणे होते. स्पर्धेत एस.के.डी. इंटरनॅशनल स्कूल भावडे, ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल नाशिक, फ्लाईंग कलर्स द युनिव्हर्सल स्कूल नाशिक, जेम्स इंग्लिश मीडियम स्कूल नाशिक, एक्सल पब्लिक स्कूल नाशिक, एम.व्ही.पी. सनराइज स्कूल आणि एसटी रिसेंट पालोटी स्कूल नाशिक या संघांनी खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. यात अंतिम सामना एस.के.डी. इंटरनॅशनल स्कूल भावडे विरुद्ध ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल नाशिक यांच्यात झाला. एस.के.डी. इंटरनॅशनल स्कूलने विजेतेपद पटकाविले.

तसेच मुलींच्या संघानेही विजयश्री संपादित केली. विजयी संघाला क्रीडाशिक्षक मुदस्सर सय्यद, ययाती जाधव, राजू देवरे, किरण चव्हाण, ललित शिरसाठ यांचे मार्गदर्शन लाभले. राहुल पाटील यांनी पंच म्हणून, तर महेंद्र चव्हाण यांनी स्पर्धेचे निवेदक म्हणून भूमिका पार पाडली.

# 'केजीएस'कडून ६.५ कोटींची बुडीत रक्कम अदा

## नवीन व्यवस्थापनाकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा



पिंपळगाव निपाणी : केजीएस शुगर कारखान्याच्या नव्या व्यवस्थापनाकडून शेतकऱ्यांची बुडीत रक्कम शेतकऱ्यांना अदा करताना संचालिका सोनिया होळकर. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित असलेले शेतकरी. (छाया : समीर पठाण)

**लासलगाव : वार्ताहर**

**निफाड तालुक्यात असलेल्या पिंपळगाव निपाणी येथील केजीएस शुगर ॲण्ड इन्फ्रा. कॉर्पोरेशन लिमिटेड या साखर कारखान्याच्या नवीन व्यवस्थापनाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. कारखान्याच्या मागील व्यवस्थापनाकडे थकीत असलेली आणि शेतकऱ्यांनी जवळपास बुडीत म्हणून गृहीत धरलेली सुमारे सहा कोटी पाच लाख रुपये इतकी रक्कम नवीन व्यवस्थापनाने संबंधित शेतकऱ्यांना अदा केली आहे.**

हा कारखाना सहा वर्षांहून अधिक काळ बंद होता. ऑक्टोबर २०२५ मध्ये लासलगावचे कृषी उद्योजक संजय होळकर यांच्या ग्रेनाँच इंडस्ट्रीज समूहाने हा कारखाना खरेदी करून त्याचे कामकाज पुन्हा सुरू केले आहे. कारखाना सुरू झाल्यानंतर नवीन व्यवस्थापनाने तातडीने मागील व्यवस्थापनाच्या काळात थकीत असलेल्या शेतकऱ्यांच्या देण्यांची पूर्तता करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. नवीन व्यवस्थापनाने शेतकऱ्यांची ही थकीत रक्कम तीन टप्प्यांमध्ये अदा केली. सुरुवातीच्या टप्प्यात २३६ शेतकऱ्यांना, त्यानंतर ७० शेतकऱ्यांना आणि आता तिसऱ्या टप्प्यात ४७० शेतकऱ्यांचे पेमेंट देण्यात आले. एकूण ७७६ शेतकऱ्यांना थकीत रक्कम देण्यात आली आहे. एकूण सुमारे ६ कोटी ५ लाख रुपयांहून अधिक रक्कम शेतकऱ्यांना मिळाली आहे. केवळ बुडीत रक्कमच नव्हे, तर ऊस वाहतूक आणि इतर देणीसुद्धा अदा केली.

ही एकूण रक्कम ६.५ कोटींच्या आसपास आहे. संचालिका सोनिया होळकर यांच्या हस्ते या रकमेचे वाटप करण्यात आले. मागील व्यवस्थापनाच्या काळात अनेक ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे पैसे थकीत होते. ज्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आले होते. नवीन व्यवस्थापनाने शेतकऱ्यांचे हित जपण्याची भूमिका घेतल्यामुळे आणि सहा वर्षांपासून बंद असलेल्या कारखान्याचे बॉयलर अग्निप्रदीपन पेटवल्यामुळे स्थानिक ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण आहे.

स्थानिक पातळीवर ऊस गाळपाची सोय झाल्यामुळे तसेच बुडीत रक्कम परत मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचा कारखान्याच्या नवीन व्यवस्थापनावरील विश्वास वाढला आहे.

कारखान्याचे चेअरमन संजय होळकर, संचालिका सोनिया होळकर, सत्यजित होळकर, कार्यकारी संचालक आदित्य होळकर, संचालक प्रकाश दायमा, प्रभाकर रायते, कारखान्याचे जनरल मॅनेजर सुखदेव शेटे, जनरल मॅनेजर घोरपडे, वसंत शिंदे, शेतकी अधिकारी पटेल, देसले व कारखान्याच्या सर्व खात्यांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



## श्रीरामनगर-सोनेवाडी मार्ग काटेरी झाडांपासून मुक्त

### ग्रामपंचायत अधिकारी देसाईंच्या प्रयत्नांना यश

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत श्रीरामनगर येथे ग्रामपंचायत, शेतकरी आणि ग्रामस्थ यांच्या एकजुटीने महत्त्वपूर्ण रस्ता साफसफाईचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आले. श्रीरामनगर-सोनेवाडी (खु.) या महत्त्वपूर्ण मार्गावर गेल्या अनेक महिन्यांपासून दोन्ही बाजूंनी काटेरी झाडांचे साम्राज्य निर्माण झाले होते. या झाडांमुळे शेतकऱ्यांना मालवाहतूक करताना अडथळे निर्माण होत होते तसेच दिनक्रमातील वाहतुकीला मोठा धोका निर्माण झाला होता.

ग्रामस्थांच्या वारंवार होत असलेल्या अडचणींची दखल घेत ग्रामपंचायत अधिकारी आम्रपाली देसाई पवार यांनी तातडीने उपाययोजना आखली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीने नागरिकांमधून लोकवर्गणी जमा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर ग्रामपंचायत कर्मचारी, स्थानिक शेतकरी आणि रस्त्यालगतची शेती असलेले नागरिक यांनी मोठ्या संख्येने पुढाकार घेत एकत्र श्रमदान केले. अभियानांतर्गत काटेरी झाडांचे निर्मूलन आव्हानात्मक असले तरी ग्रामस्थांच्या पाठिंब्यामुळे हे काम काही तासांतच पूर्ण झाले. काटेरी झाडी हटल्याने रस्त्याचे स्वरूप पूर्णतः बदलले असून, वाहतूक आता सुरळीत सुरू झाली आहे. शेतमाल वाहतुकीतील अडथळे दूर झाल्याने दिलासा मिळाला असून, ग्रामीण भागातील विकासाला नवे बळ मिळाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## निफाड तालुक्यात शासनातर्फे १३७० शिक्षकांना प्रशिक्षण

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, निफाड पंचायत समिती व शांतीलाल मुथा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने निफाड तालुक्यातील नांदुर्डी येथील जनता विद्यालयात १३७० शिक्षकांना तीनदिवसीय शासकीय मूल्यवर्धन प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षणामध्ये विभाग १ मध्ये स्व-जाणीव, विभाग २ मध्ये वैयक्तिक जबाबदाऱ्या, विभाग ३ मध्ये नातेसंबंध, विभाग ४ मध्ये सामाजिक जबाबदाऱ्या आदी विभागांच्या मुद्द्यांनुसार व्याख्यान, लिखाण, गटकार्य, प्रश्नोत्तरे, समस्यांचे निराकरण, विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास, मानसिक विकास, सामाजिक विकास, मूल्यवर्धन उपक्रमांमध्ये अंतर्भूत मूल्ये, अभ्यासक्रमाची उद्दिष्टे, क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती आदींबाबत पहिली ते आठवीच्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. प्राचार्य रंजना लोहकरे, समन्वयक डॉ. बाबासाहेब बडे, गटशिक्षणाधिकारी विलास साळी, विस्तार अधिकारी वसंत गायकवाड, लता भरसट यांच्या मार्गदर्शनाखाली विषयतज्ज्ञ विजय खालकर, आत्माराम न्याहारकर, समन्वयक हनुमान शिकारे, निंबा बोरसे, रमेश गुरगुडे, पंकज गांगुर्डे, स्वाती बोरसे, सचिन चव्हाण, मनोहर निचित, किरण शिंदे आदींनी प्रशिक्षण दिले.

## के. के. वाघच्या विद्यार्थ्यांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**नाशिक : प्रतिनिधी**



नाशिक येथील के.के. वाघ कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी कृषिदूत म्हणून चांदवड तालुक्यातील मौजे वडनेरभैरव येथील शेतकऱ्यांना कृषीविषयक मार्गदर्शन करीत आहेत.

कृषिदूत नुकतेच गावात दाखल झाले असून, पुढील तीन महिने शेतकऱ्यांबरोबर राहणार असून, हे कृषिदूत शेतकऱ्यांना शेतीविषयक नवे तंत्रांची माहिती, सुधारित शेतीपद्धती, पिकांचे नियोजन, खत व्यवस्थापन, जैविक शेती, सिंचन पद्धत, माती परीक्षण, माती विश्लेषण, रासायनिक खते व बियाणे यांचा वापर, पिकांचे संगोपन, पिकांचे व्यवस्थापन आणि विविध सरकारी योजनांचा लाभ कसा मिळवायचा, याबद्दल मार्गदर्शन करणार आहेत.

कृषी महाविद्यालयाचे कृषिदूत विद्यार्थी अथर्व चकोर, ओम आव्हाड, ऋषिकेश बडगुजर, प्रथमेश भालेराव, यश भोर, पीयूष भालेराव, रोहित बोडके यांनी गावचे प्रथम नागरिक सरपंच रावसाहेब (आबा) भालेराव, ग्रामसेवक योगेश माळी व ग्रामस्थ व शेतकरी यांची भेट घेऊन या उपक्रमाविषयी माहिती दिली. यावेळी या उपक्रमाच्या माध्यमातून गावातील शेतकऱ्यांना निश्चितपणे या कृषिदूतांकडून मिळणाऱ्या मार्गदर्शनाचे व सल्ल्याचा गावातील शेतीमध्ये नक्कीच सकारात्मक बदल घडतील, असा विश्वास सरपंचांसह शेतकऱ्यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनादेखील प्रत्यक्षात शेतीचे ज्ञान आणि अनुभव मिळतो तसेच गावकऱ्यांना आधुनिक शेतीच्या पद्धतींविषयी माहिती मिळते. या विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, डॉ. की. एम. सेवलीकर, प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, प्रा. तुषार उगले, प्रा. परमेश्वरी पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

## तब्बल १०५ दात्यांनी केले रक्तदान

### माळवाडीत महात्मा फुले पुण्यतिथीनिमित्त उपक्रम

**देवळा : प्रतिनिधी**

तालुक्यातील माळवाडी येथे महात्मा जोतिराव फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त सलग सहाव्या वर्षी रक्तदान शिबिर झाले. समाजसुधारक महात्मा फुले यांच्या विचारांना सलामी देत यंदा तब्बल १०५ दात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली. प्रारंभी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आणि सत्यशोधक पद्धतीने खंडोबाची तळी भरण्यात आली. यावेळी देवळा बाजार समितीचे सभापती योगेश आहेर, मविप्रचे माजी संचालक प्रमोद पाटील, संचालक भाऊसाहेब पगार, शिवनिश्चल ट्रस्टचे अध्यक्ष प्रा. यशवंत गोसावी, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील आहेर, देवळा नगरपंचायतीचे माजी उपनगराध्यक्ष जितेंद्र आहेर, अंकुश सोनवणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदा पाटील, डॉ. अविनाश गोरे, डॉ. गणेश वानोळे, डॉ. योगेश अहिरे, समता परिषद तालुकाध्यक्ष रमेश अहिरे, आबा खैरनार उपस्थित होते. धुळे येथील झेड. बी. पाटील महाविद्यालयाचे प्रा. डॉ. शशिकांत खलाणे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. नांदगाव महाविद्यालयाचे प्रा. रवींद्र सुरसे यांनी महात्मा फुले यांच्या कार्यावर आणि सामाजिक विचारांवर प्रबोधन केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी क्रांतिसूर्य महात्मा फुले क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष साहेबराव बागूल, सचिव जयराम सोनवणे आदींसह बापूसाहेब बच्छाव, नामदेव बागूल, तात्याभाऊ भदाणे, दावल भदाणे, बापू क्षीरसागर, रमेश बागूल, यशवंत जाधव, दीपक शेवाळे, किरण अहिरे, सागर बागूल, राजेश निकम आदींनी परिश्रम घेतले.



**विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान**

पार्थ बागूल, दीक्षा आहिरे, रमन भदाणे, नामदेव जगदाळे, तुषार गायकवाड, प्रांजल शेवाळे, विराज शेवाळे, प्रीतेश शेवाळे, हेमंत बागूल, ज्ञानेश्वरी बागूल, उन्नती बागूल, उमेश अहिरे, हर्षल बागूल, दक्ष बच्छाव आदींसह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा सन्मान करण्यात आला.

## 'चांदवडी रुपय्या'चे पुरस्कार जाहीर

**चांदवड : वार्ताहर**

शब्द, संस्कार आणि समाजभान यांचा सुंदर मेळ घालत कार्यरत असलेल्या येथील चांदवडी रुपय्या साहित्य कला रसिक मंडळातर्फे यंदाचे मानाचे पुरस्कार जाहीर करण्यात आले. मंडळाचा 'चांदवडी रुपय्या लक्षवेधी पुरस्कार' नाशिकचे ज्येष्ठ पत्रकार व सांस्कृतिक अभ्यासक फणिंद्र मंडलिक यांना, तर 'चांदवडी रुपय्या साहित्य प्रेरणा पुरस्कार' मालेगाव येथील साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र दिघे यांना जाहीर झाला आहे. ही निवड राजेंद्र उगले, प्रतिभा खैरनार, विजय निरभवणे, भागवत मांदळे, संदीप गुजराथी, रवींद्र केदा देवरे, सविता दिवटे आणि वाल्मीक सोनवणे यांच्या विशेष समितीने केली आहे. मंडळ अध्यक्ष रावसाहेब जाधव, सचिव सागर जाधव जोपूळकर, उपाध्यक्ष रवींद्र देवरे, डॉ. राजेंद्र मलोसे आदींनी निवडीचे स्वागत केले आहे. पुरस्कार वितरणाचा तपशील लवकरच कळविण्यात येईल, असे मंडळातर्फे सांगण्यात आले.

## हिवाळी शिबिराच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासावी

### प्राचार्य शिंपी : सुराणा महाविद्यालयाचे शिबिर

**दिघवद : वार्ताहर**

विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर हा राष्ट्रीय सेवा योजनेचा अविभाज्य घटक असून, स्वयंसेवकांनी शिबिराच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासावी. शिक्षणाचा उपयोग व्यक्तिगत जीवनाबरोबरच सामाजिक अडचणी दूर करण्यासाठी करा, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. डी. एन. शिंपी यांनी केले.

चांदवड येथील पी. डी. सुराणा कनिष्ठ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर उर्धूळ येथे होत आहे. शिबिराचे उद्घाटन सरपंच कविता ठाकरे यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. शिंपी बोलत होते.

याप्रसंगी प्रतिष्ठित ग्रामस्थ दत्तू ठाकरे यांनी गावाला मिळालेल्या स्वच्छ गाव, सुंदर गाव पुरस्कारात महाविद्यालयाचा वाटा असल्याचे गौरवोद्गार काढले. तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष रेवन ठाकरे आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य वाय. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. जी. आर. गांगुर्डे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एस. डी. जगताप यांनी सूत्रसंचालन केले. आभार तनया खुटे या विद्यार्थिनीने मानले.

याप्रसंगी उपसरपंच मीराबाई ठाकरे, श्रीहरी ठाकरे, मुख्याध्यापिका भागूबाई ठाकरे, मुख्याध्यापक ए. एम. अहिरराव, अशोक नवले, प्रा. व्ही. डी. बागूल, प्रा. एस. जी. रोकडे, सुखदेव बाबूराव खुटे, प्रा. वाय. व्ही. देवरे, प्रा. के. एस. चोरडिया, प्रा. निरंजन गायकवाड, प्रा. प्रा. जी. एन. गांगुर्डे, प्रा. के. डी. गांगुर्डे, प्रा. श्रीमती ए. बी. ठाकरे, प्रा. एस. व्ही. सोनवणे, प्रा. एम. आर. ठाकरे, ग्रामपंचायत कर्मचारी दत्तू पाटील, विकास साबळे आदींसह मोठ्या संख्येने परिसरातील ग्रामस्थ व स्वयंसेवक उपस्थित होते.

## थंडी वाढल्याने सुकामेव्याच्या मागणीत वाढ

### किराणा दुकानांत गर्दी; लासलगावकर घेताहेत गुलाबी थंडीचा अनुभव

**लासलगाव : वार्ताहर**

गेल्या दोन-तीन दिवसांपासून लासलगावसह परिसरात पुन्हा थंडीचा जोर अधिक वाढला असून, रात्री व पहाटेच्या वेळी चांगलीच थंडी पडत असल्यामुळे लासलगावकर या गुलाबी थंडीचा अनुभव घेताना दिसत आहेत.

या थंडीत आरोग्यास फायदा व्हावा, यासाठी सुकामेवा अर्थात ड्रायफ्रूटला प्रचंड मागणी वाढल्याचे येथील ड्रायफ्रूट विक्रेत्यांनी सांगितले आहे.



सुकामेवा घेण्यासाठी लासलगाव येथील ड्रायफ्रूट विक्रेत्यांकडे तसेच किराणा दुकानांत ग्राहकांची गर्दी वाढली आहे. सुकामेवामध्ये काजू आणि बदाम यांच्या भावात जास्त अधिक फरक आहे. म्हशीच्या तुपापेक्षा गायीचे तूप आरोग्यासाठी उत्तम असल्याने त्यासाठी मागणी वाढली आहे. थंडीत पोषक आहार तयार करताना सुकामेव्याच्या लाडूला अधिक पसंती आहे. त्यामुळे लाडूसाठी साहित्य घेण्याकडेही नागरिकांचा कल दिसून येतो आहे.

रोजचे जेवण हे फक्त एक पोट भरण्यासाठी मदत करते; परंतु थंडीमध्ये वाढत्या भुकेमुळे ड्रायफ्रूट्स हे शरीरास परिपूर्ण ठरत असतात. यात सर्वच स्तरामधून चांगल्या प्रमाणात मागणी होते आहे. थंडीच्या दिवसांत भूक अधिक वाढत असल्यामुळे सुकामेवा हे उत्तम प्रकारचे औषध आहे जे प्रत्येकाने घ्यायलाच हवे, जेणेकरून शरीरातील रोगप्रतिकारकशक्ती टिकून राहते आणि शरीराला ऊर्जा मिळते.

> **थंडीची चाहूल लागल्यामुळे ग्राहक सुकामेव्याच्या खरेदीला पसंती देत आहेत. यात खारीक, खोबरे, काजू, बदाम, मनुका यांना मोठी मागणी आहे. सुकामेवामध्ये काजू आणि बदामच्या भावात जास्त फरक आहे. काही दिवसांत थंडी वाढणार असल्याने सुकामेव्याच्या मागणीत वाढ झाली आहे.**
> **-ड्रायफ्रूट विक्रेता, लासलगाव**

**सुकामेव्याचे भाव (सुकामेवा दर प्रतिकिलो)**

बदाम ७६० ते ८००, काजू ८८० ते ९००, खारीक ३२० ते ३५०, पिस्ता १२००, जर्दाळू १००० ते १२००, अक्रोड १००० ते १४००, अंजीर १२०० ते १३५०, खोबरे १८० ते २००, गूळ ५०, किसमिस ३२० ते ३५०, डिंक २८० ते ३००, गोडंबी ७००, तूप ४५० ते ५०० रु. प्रतिकिलो.

# पळसे गटात इच्छुकांची भाऊगर्दी; काट्याची लढत

## उमेदवारांना मोठ्या समस्यांचा करावा लागेल सामना

**जिल्हा परिषद पळसे गट**

सुनील पवार
९८९०४४६१०१

**राज्यभरात मागील दोन महिन्यांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वारे जोमाने वाहू लागल्याने अनेकांनी निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यकारी मंडळांचा कालावधी फेब्रुवारी २०२२ मध्ये संपला आहे. कोरोना महामारी, इतर मागासवर्गीय आरक्षण, उच्च न्यायालयातील याचिका, अशा एक ना अनेक कारणांनी या निवडणुका लांबणीवर पडल्या. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार अखेर या निवडणुका डिसेंबर व जानेवारीत पार पडणार असल्याचा अदांज वर्तवला जात आहे. २ डिसेंबर रोजी नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुका पार पडल्या असल्या, तरी काही प्रभागांत अपील असल्याने त्या निवडणुका मात्र २० डिसेंबर रोजी होणार आहेत. त्यानंतर डिसेंबरअखेरपर्यंत जिल्हा परिषद व जानेवारीअखेरपर्यंत महानगरपालिका निवडणुका होण्याची चिन्हे आहेत. पळसे जि. प. गटात मात्र इच्छुकांची भाऊगर्दी पाहावयास मिळत आहे.**

नाशिक जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाचे आरक्षण सर्वसाधारण गटासाठी असल्याने अनेक मातब्बर इच्छुकांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. पळसे गटातील सर्वाधिक मोठे गाव असणाऱ्या पळसे येथे इच्छुकांची संख्या जास्त दिसत असली, तरी शेवटच्या क्षणापर्यंत कोणाचा तंबू राहतो, हे सांगणे सध्या तरी कठीण आहे. मागील बारा-तेरा वर्षांच्या कालावधीत मतदारांचा मोठा अपेक्षाभंग झाला आहे. ज्या अपेक्षेने मतदारांनी सन २०१२ मध्ये हा गट अनुसूचित जातीसाठी राखीव असल्याने माजी मंत्री बबनराव घोलप यांच्या कन्या तनुजा घोलप यांना शिवसेनेने उमेदवारी दिली होती, तर त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रसने अलका साळुंके या एका सर्वसाधारण परिवारातील महिलेला उमेदवारी दिली होती.

या आमनेसामने लढतीत मतदारांनी घराणेशाही नाकारत सर्वसाधारण असणाऱ्या अलका साळुंके यांच्या गळ्यात विजयाची माळ घातली. सन २०१७ लादेखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे यशवंत ढिकले, शिवसेनेचे जगन्नाथ आगळे आणि अपक्ष उमेदवार संजय तुंगार यांच्या तिरंगी लढतीत राष्ट्रवादी काँग्रेसने भरघोस मतांनी विजय मिळवला आणि शिवसेनेला पराभव पत्कारावा लागला होता.

आगळे व तुंगार यांच्यात मतांची विभागणी झाल्याने ढिकलेंचा विजय सोपा झाला होता. त्यात पळसे गावातून चार उमेदवार असल्याने आगळे यांना विजयापासून दूर गावातच राहावे लागले होते. मात्र, आता २०२५ च्या निवडणुकीत शिंदे-पळसे ही दोन गावे एकत्रित आली तर? यावर कार्यकर्ते मात्र आपापसांत चर्चा करत असून, एकत्रित आल्याने दोन्ही गावांचा मोठा फायदा होऊ शकतो, अशीदेखील चर्चा आता होत आहे. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार सरोज आहिरे यांना या गटात २०१९ व २०२४ अशा दोन्ही विधानसभा निवडणुकांत मोठी आघाडी मिळाली आहे. त्यामुळे हा मतदारसंघ राष्ट्रवादीचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. अशा परिस्थितीत यावेळीसुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट) पक्षाकडे इच्छुकांची भाऊगर्दी पाहायला मिळते. भाजपदेखील पळसे गटात रणनीती आखत असल्याने येणाऱ्या निवडणुकीत कोण कोणाबरोबर असेल की, स्वतंत्र लढतील, हे येणारी परिस्थिती ठरवेल, हे मात्र नक्की!

शिवसेना उबाठाचे उपजिल्हाप्रमुख जगन्नाथ आगळे यांनीदेखील उबाठाची उमेदवारी करण्यासाठी कंबर कसली आहे. जिल्हाध्यक्ष विष्णुपंत म्हैसधुणे यांचा गिरणारे गट राखीव झाल्याने ते पळसे गटात निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. नाशिक तालुका शेतकी संघाचे सभापती होऊन गेलेले शरद गायखे यांचीदेखील जोरदार तयारी सुरू आहे. माजी सदस्य यशवंत ढिकले, जयराम ढिकले यांनीदेखील आपली दावेदारी सांगितली आहे. माजी खासदार देवीदास पिंगळे व आमदार सरोज आहिरे यांच्यासह पक्ष काय निर्णय घेतो त्यावर पुढील राजकीय गणिते मांडली जातील. शिवसेना शिंदे गटातून जिल्हाप्रमुख अनिल ढिकले आणि संजय तुंगार, नवनाथ गायधनी या गटातून इच्छुक आहेत. भारतीय जनता पक्षाने शिंदे गावचे सरपंच बाजीराव जाधव यांना ग्रीन सिग्नल दिला असल्याची चर्चा असून, तेही संवाद दौऱ्यामधून नागरिकांना साथ घालत आहेत.



शिंदे गाव : छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक विद्यालयासह नवीन वसाहतीकडे जाणाऱ्या रस्त्याची झालेली दुरवस्था.




सिद्ध पिंप्री : येथे उभारलेले अद्ययावत प्राथमिक आरोग्य केंद्र.

### २०१७ चे विजयी उमेदवार



यशवंतराव ढिकले



उज्ज्वला जाधव



विजया कांडेकर

### विजयी उमेदवार गट-गण

- **पळसे गट :**
  यशवंतराव ढिकले (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
  मिळालेली मते- ७,३००

- **पळसे गण :**
  उज्ज्वला जाधव (शिवसेना उबाठा गट)
  मिळालेली मते- ३,९००

- **सिद्ध पिंप्री गण :**
  विजया कांडेकर (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
  मिळालेली मते- ३,९४०

### गट-गणात द्वितीय क्रमांकाची मते

- जगन्नाथ आगळे - ६,३००
- अलका गायधनी- ३,८००
- सिंधूबाई ढिकले- २,६४०

### गटाची लोकसंख्या

- लोकसंख्या : ४५ हजार

### गट-गणात इच्छुक उमेदवार

**जगन्नाथ आगळे, संजय तुंगार, अनिल ढिकले, शरद गायखे, दीपक गायधनी, यशवंत ढिकले, सुरेश ढिकले, नवनाथ गायधनी, राहुल धात्रक, अजित गायधनी, गणेश गायधनी, यशवंत ढिकले, मधुकर ढिकले, कुंदन ढिकले, बाळासाहेब तुंगार, भास्कर ढिकले, बाजीराव जाधव, किरण नरवडे, नामदेव ढिकले, नंदू नरवडे, सुनील हो. गायधनी, सुनील गायधनी, पवन कहांडळ.**

### पळसे गटात १२ गावे

**पळसे, शिंदे, सिद्ध पिंप्री, चांदगिरी, जाखोरी, कालवी, गंगापाडळी, ओढा, शिलापूर, लाखलगाव, सुलतानपूर, विंचूरगवळी.**

### झालेली विकासकामे

- शिवरस्ता.
- गाव तेथे आंगणवाडी.
- जाखोरी ते जोंगली रस्ता.
- सभामंडप.
- मुख्य रस्ते.
- शिवार रस्ते.

### प्रलंबित कामे

- शिंदे येथे छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक विद्यालय रस्ता.
- पिण्याच्या पाण्याची ठोस उपाययोजना.
- प्रमुख रस्ते.
- गावागावांतील उपरस्ते.
- अभ्यासिका.
- ग्रामीण शिवार रस्ते.
- आरोग्य केंद्रात सुविधेचा अभाव.
- कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी उपाययोजना महत्त्वाची.
- स्वच्छतागृह.
- राखीव भूखंडावर जॉगिंग ट्रॅक.
- नाना-नानी पार्क.
- जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची सुधारणा.

### नागरिक म्हणतात...



मागील दहा वर्षांपासून गटात हवा तितका विकास होऊ न शकल्याने अनेक विकासात्मक कामे अपेक्षापेक्षा कमी झाली. रस्ते, अंगणवाड्यांवरच विकासाचे चक्र स्थिरावले आहे. नुसता माणूस चांगला असून चालत नाही, तर विकास करणारा पाहिजे. आजही अनेक कामे प्रलंबित असून, ज्या उमेदवाराकडे विकासाचा दूरदृष्टी आहे आणि तो कामे करू शकतो त्याने प्रतिनिधित्व करावे. केवळ राजकारणाची हौस म्हणून उभे राहू नये. शिवाय राजकारणाचे व्यावसायीकरण न करता जनतेची कामे होणे महत्त्वाचे आहे.
**- रमेशशेठ कटाळे,** माजी सरपंच, चांदगिरी



जिल्हा परिषद गटाच्या निवडणुका येत्या काही दिवसांत होणार आहेत. प्रत्येक जण आपल्या परीने प्रचार करतो; परंतु याआधी जे निवडून गेले त्यांनी निवडून आल्यावर मागेदेखील फिरून पाहिले नाही. विकास हा शब्द फक्त नावापुरताच राहिला. एकाही गावात ठोस असे विकासाचे काम नसल्याने अनेक गावे मागील दहा- बारा वर्षांत अविकसित राहिली. येणाऱ्या निवडणुकीत योग्य उमेदवार निवडून दिला जावा आणि गावाचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे.
**- संदीप आ. गायधनी,**
सामाजिक कार्यकर्ते, पळसे



गेल्या दहा ते बारा वर्षांपासून सिद्ध पिंप्री ते रानमळा रस्त्याची समस्या प्रलंबित आहे. लोकप्रतिनिधी केवळ निवडणुका आल्या की विकासकामांचे आश्वासन देतात; परंतु सिद्ध पिंप्री ते रानमळा हा तीन किलोमीटरचा रस्ता अद्याप न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.
**- शंकर ढिकले,** नागरिक, सिद्ध पिंप्री-रानमळा



ओढा गावाच्या हद्दीत असलेला हिंदुस्ताननगर हा भाग अजूनही विकासापासून वंचित आहे. येथे रस्त्यासह स्मशानभूमी, तसेच अंगणवाडी, बालकांना, ज्येष्ठ नागरिकांना मैदान विकसित होणे गरजेचे होते; परंतु या भागाकडे सातत्याने दुर्लक्ष झालेले आहे. केवळ निवडणुका सुरू झाल्या की, मगच राजकीय नेते येथे दौरे करतात.
**- गणपत ढवळे,** हिंदुस्ताननगर, ओढा



गावात वृद्ध नागरिकांसाठी नाना-नानी पार्क व्हावे. गेली दहा-बारा वर्षांपासून पळसे गटाचा पाहिजे त्या प्रमाणात विकास झालेला नसल्याने उमेदवार निवडून देताना याचाही विचार व्हावा. मागासवर्गीय समाजासाठी शासनाच्या ज्या काही योजना आहेत त्या तळागाळातील समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम हे लोकप्रतिनिधीचे असते. मात्र, येणाऱ्या काळात जो कोणी लोकप्रतिनिधी निवडून येईल त्याने वंचित घटकांसाठी कामे करणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळात तो ते काम करेल, ही अपेक्षा.
**- मदन साळवे,** ज्येष्ठ नागरिक, शिंदेगाव

## निवडणूक आयोगाने मतदारांचा विश्वास गमावला : डॉ. चलवादी

**पुणे :** प्रत्यक्षात लोकशाही यंत्रणा अंमलात आणण्यासाठी निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे. मतदारांना त्यांचे सरकार निवडण्याच्या अधिकाराची अंमलबजावणीसाठी कार्यरत राज्य निवडणूक आयोगाचा कारभार मात्र संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. पारदर्शकताअभावी आयोगाने मतदारांचा विश्वास गमावला आहे, अशा शब्दांत बहुजन समाज पक्षाचे प्रदेश महासचिव, पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ. हुलगेश चलवादी यांनी आयोगाच्या कारभारावर ताशेरे ओढले. अगोदर 'व्हीव्हीपॅट' मशिन न वापरण्याचा आणि आता निवडणूक निकाल पुढे ढकलण्याचा निर्णय आयोगाच्या अकार्यक्षमतेकडे बोट दाखवणारा आहे. राज्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाची मर्यादा ओलांडली जात असताना आयोगाने याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे होते. असे न करता आयोगाने आरक्षणाची मर्यादा ओलांडली असतानादेखील निवडणुका जाहीर केल्या. मुद्दा न्यायप्रविष्ट झाल्यानंतर ऐन निवडणुकीच्या रणधुमाळीत आयोगाने हा मुद्दा न्यायालयावर सोडल्याचे डॉ. चलवादी म्हणाले.
आयोगाचे हे वर्तन मतदारांसह राजकीय पक्ष, उमेदवार, कर्मचारी, अधिकाऱ्यांची नाराजी ओढावणारे असल्याचे डॉ. चलवादी म्हणाले. निवडणुकीच्या तारखेत वारंवार बदल करणे, मतदारयादीसंदर्भात ठोस भूमिका न घेणे, हे निर्णय असंवैधानिक वाटतात, असे डॉ. चलवादी म्हणाले.

## इगतपुरीतील स्ट्राँगरूममध्ये ईव्हीएम बंदोबस्तात सील

### मतमोजणी लांबल्याने इगतपुरीत उमेदवारांनी घेतली धास्ती

**इगतपुरी : प्रतिनिधी**
**इगतपुरी नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी शहरातील नागरिकांनी मतदान केले. त्याची मतमोजणी दुसऱ्याच दिवशी होणार होती, पण ती पुढे ढकलल्याने उमेदवारांसह कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. आता ही मतमोजणी दि.२१ डिसेंबरला होणार असल्याने सर्वच राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी धास्ती घेतली आहे.**

नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांसह वीस नगरसेवकपदाचे उमेदवार निवडून येतील, असा दावा भाजपकडून संजय इंदुलकर (माजी नगराध्यक्ष) यांनी केला, तर शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी (अजित पवार गट) नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांसह २१ जागा आम्हीच जिंकू, असा दावा राष्ट्रवादी नेते तथा माजी उपनगराध्यक्ष फिरोज पठाण व शिवसेनेकडून युवानेते संजय खातळे यांनी केला आहे. शिवसेना उबाठा गटाकडूनही पाच ते सहा नगरसेवकपदाचे उमेदवार निवडून येणार असल्याचा दावा नवल सोनार यांनी केला आहे. गेल्या २० वर्षांपासून नगरपरिषद निवडणुकीची मतदानाची टक्केवारी ६८ ते ६९ इतकीच होत आहे. अनेक मतदारांनी विकासकामांच्या मुद्यासह सुविधा, शिक्षण, आरोग्य, पाणी, शौचालय, रस्ते, पार्किंग, मार्केट आदी सुविधाच पुरवल्या जात नाहीत. नगरपरिषदेची हद्दवाढ झालेल्या आदिवासी बांधवांना नगरपरिषदेकडून कोणतीही सुविधा उपलब्ध झाली नसल्याने मतदान करणे अनेकांनी टाळल्याचे ज्येष्ठांकडून सांगण्यात आले.




**इगतपुरी : नगरपरिषद निवडणूक मतमोजणीच्या हॉलची उमेदवारांचे प्रतिनिधी म्हणून पाहणी करताना माजी आमदार काशीनाथ मेंगाळ, संजय खातळे व पदाधिकारी.**

यंदा मतदारांची संख्या २५ हजार ७७ होती. पुरुष १२ हजार ५११, तर महिला मतदार १२ हजार ५६६ होत्या. त्यामुळे गेल्या साडेसात वर्षांच्या कालावधीत फक्त ६०९ नवीन मतदार वाढले. यंदाही ६८.६८ टक्केच मतदान झाल्याने ०.१५ इतकेच मतदान वाढल्याचे चित्र स्पष्ट झाले. यंदाच्या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांनी पक्षांतर केल्याने अनेकांनी आरोप-प्रत्यारोप केले. मात्र, मतदान संपताच शहरातील वातावरण शांत झाल्याचे दिसले.

यंदा ओबीसी महिला राखीव आरक्षण पडल्याने चार महिला उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होत्या. मात्र, दुरंगीच लढत झाल्याचे बोलले जाते. मतदान झालेल्या सर्व ईव्हीएम मशिन नाशिक-मुंबई महामार्गालगत आयटीआय केंद्रात ठेवण्यात आल्या आहेत. त्यांची देखरेख २४ तास ठेवली असून, इगतपुरी पोलीस ठाण्याचे पाच पोलीस कर्मचारी, एसआरपी पोलीस कर्मचारी आठ व प्रशासकीय कर्मचारी प्रत्येकी आठ तासांसाठी एक कर्मचारी ठेवला आहे. तसेच सीसीटीव्हीचे तेरा कॅमेरे बसविले आहेत. स्ट्राँगरूमच्या मुख्य दरवाजावर एक बंदुकधारी पोलीस कर्मचारी व एक अग्निशमन दलाचे वाहन ठेवण्यात आले आहे. प्रत्येक पक्षाच्या उमेदवाराचे प्रतिनिधी येथे आल्यास त्यांची रजिस्ट्रवर नाव, ओळखपत्र तपासून सही घेऊन त्यांना बाहेरून स्ट्राँगरूम व हॉल दाखविण्यात येत आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार अभिजित बारवकर, इगतपुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी किशोर चव्हाण यांनी दिली.

## संक्षिप्त




### भाटगावला फलक रेखाटनातून संविधानाला अनोखी मानवंदना

**चांदवड : वार्ताहर**

येथील शिक्षण मंडळ भगूर संचलित नूतन माध्यमिक विद्यालय, भाटगाव (ता. चांदवड) येथे संविधान दिन उत्साहात झाला. कलाशिक्षक देव हिरे यांनी शाळेच्या दर्शनी फळ्यावर रंगीत खडूंच्या माध्यमातून आकर्षक फलक रेखाटन साकारून भारतीय संविधानाला अनोखी मानवंदना दिली. २६ नोव्हेंबर संविधान दिनाचे औचित्य साधून हे विशेष रेखाटन करण्यात आले. ''आपलं संविधान, आपला अभिमान'' हा संदेश देत देव हिरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाचे महत्त्व चित्राद्वारे अधोरेखित केले. संविधान हे कोणत्याही देशाच्या बांधणीचा पाया असून, भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशाला एकता, न्याय, समता आणि बंधुता या मूल्यांच्या आधारावर जोडण्याचे काम संविधानाने केले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राला प्रदान केलेली संविधानातील मौलिक तत्त्वे, मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविणे आणि त्यांना जागरूक नागरिक बनविणे, या उद्देशाने जनजागृतीपर हे रेखाटन केल्याचे कलाशिक्षक देव हिरे यांनी सांगितले.



### नांदगावला दिव्यांगांना शैक्षणिक साहित्य

**नांदगाव : प्रतिनिधी**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये जागतिक अपंग दिनाचे औचित्य साधून दिव्यांग विद्यार्थ्यांना शालोपयोगी शैक्षणिक साहित्याचे वाटप मुख्याध्यापिका ज्योती काळे, उपमुख्याध्यापक दीपक चव्हाण, पर्यवेक्षक अविनाश शेवाळे यांच्यासह उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापिका काळे यांनी अपंग दिनाचे महत्त्व सांगताना दिव्यांगांच्या समस्या, हक्क आणि त्यांच्या जीवनातील आव्हानांबद्दल सामान्य जनतेमध्ये जागृती निर्माण होणे. त्यांना आदर आणि संधी मिळाव्यात यासाठी प्रोत्साहन देणे. दिव्यांग व्यक्तींना सहानुभूती न दाखवता, त्यांना संधी उपलब्ध करून त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यास प्रेरित करणे. दिव्यांग व्यक्ती कला, विज्ञान, क्रीडा किंवा तंत्रज्ञान अशा जीवनाचा प्रत्येक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांचा गौरव करणे, असे सांगितले.

### कार्तिक सोनवणेची राष्ट्रीयस्तरावर निवड

**पिंपळगाव बसवंत : प्रतिनिधी**



क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय नागपूर येथे १९ वर्षांआतील मुले शालेय सॉफ्टबॉल क्रीडा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत पिंपळगाव बसवंत येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कर्मवीर काकासाहेब वाघ कनिष्ठ महाविद्यालयातील कार्तिक प्रभाकर सोनवणे या खेळाडूची राष्ट्रीयस्तरावर होणाऱ्या सॉफ्टबॉल स्पर्धेत महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड झाली. या विद्यार्थ्याला प्रा. हेमंत पाटील, प्रा. सागर कडलग, प्रा. जी. टी. आहेर यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धक विद्यार्थ्याच्या या यशाबद्दल मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, निफाड तालुका संचालक शिवाजी गडाख, संचालिका शोभा भागवत बोरस्ते, स्थानिक व्यवस्थापन समिती अध्यक्ष रवींद्र मोरे, सुनील पाटील व मविप्र शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, प्राचार्य सुरेश जाधव, उपप्राचार्य दिलीप माळोदे आदींनी अभिनंदन केले.

### वडांगळी विद्यालयात जागतिक दिव्यांग दिन

**सिन्नर : प्रतिनिधी**

मविप्र संचलित वडांगळी (ता. सिन्नर) येथील न्यू इंग्लिश स्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय तसेच अभिनव बालविकास मंदिरमध्ये जागतिक दिव्यांग दिनानिमित्त कार्यक्रम झाला. मुख्याध्यापक बाळासाहेब खैरनार, पर्यवेक्षक मच्छिंद्र धातडक यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात दिव्यांग विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन त्यांचा सन्मान केला. व्यासपीठावर दिव्यांग समितीप्रमुख राजाराम खेताडे, सुभाष ठोक, संदीप म्हस्के, कैलास काळे, शंकरराव सांगळे, राजश्री जाधव, गीतांजली लाडे, विलास गोसावी, संदीप वारुंगसे, तुकाराम सानप आदी उपस्थित होते. मुख्याध्यापक खैरनार, ज्येष्ठ शिक्षक शंकरराव सांगळे यांनी दिव्यांग दिनाबाबत माहिती दिली. बाळासाहेब सांगळे यांनी सूत्रसंचालन केले. कैलास काळे यांनी आभार मानले.

### श्रीरामनगरमध्ये रक्त तपासणी शिबिर

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान'अंतर्गत श्रीरामनगर येथे आरोग्य विभाग आणि ग्रामपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने मोफत रक्त तपासणी शिबिर झाले. संत शिरोमणी सावता महाराज मंदिराच्या प्रांगणात भरविलेले हे शिबिर सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत चालले. महिला सक्षमीकरणासह कुटुंबाच्या आरोग्यसुरक्षेवर लक्ष केंद्रित करणाऱ्या 'स्वस्त नारी, स्वस्त परिवार' या उपक्रमांतर्गत गावातील महिला व पुरुषांनी आपली रक्त तपासणी करून घेतली. प्राथमिक आरोग्य तपासणी, हिमोग्लोबिन चाचणी, साखर तपासणी आदी विविध तपासण्या तज्ज्ञ वैद्यकीय पथकाकडून करण्यात आल्या. आरोग्य विभागाच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये आरोग्य जागरूकता वाढीस लागेल, अशी आशा ग्रामपंचायतीने व्यक्त केली.

### आरूढ विद्यालयात गीता जयंती

**कसबे सुकेणे : प्रतिनिधी**

म्हाळसाकोरे येथील आरूढ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गीता जयंती आणि जागतिक एड्स दिन संयुक्तपणे साजरा करण्यात आला. प्राचार्य एस. के. शिंदे अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर पर्यवेक्षिका वंदना आहेर, उपशिक्षक पांडुरंग घुले, एस. एल. रायते, भीमराव निरभवणे, संजय वल्टे, श्रीमती सी. सी. डेर्ले, श्रीमती धोंगडे, श्रीमती व्ही. एस. राजोळे आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते श्रीमद्‌भगवद्‌गीता या ग्रंथाचे पूजन करण्यात आले. उपशिक्षक एल. ई. शेलार यांनी हिंदू धर्मात गीता जयंतीला विशेष महत्त्व असल्याचे सांगितले. जागतिक एड्स दिवसानिमित्त विज्ञान शिक्षिका श्रीमती व्ही. एस. राजोळे यांनी एड्स रोगाची कारणे, लक्षणे, उपाय याविषयी माहिती दिली. प्राचार्य शिंदे यांनी आपण जीवनात यश तसेच आनंद आणि शांती मिळू शकतो. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने गीता ग्रंथाचे पठण करून त्यात सांगितलेली सूत्रे जीवनात आचारणात आणावीत, असे सांगितले. श्रावणी अडसरे हिने सूत्रसंचालन केले.

# रस्ता मोजणी अधिकाऱ्यांना पाठविले परत

## घोटी-त्र्यंबकेश्वर वाढीव रस्त्याचा प्रश्न; पोलिसांनी शेतकऱ्यांना घेतले ताब्यात



**घोटी : आंदोलन करताना शेतकरी. दुसऱ्या छायाचित्रात पोलीस प्रशासनाने ताब्यात घेतलेले शेतकरी.**

**घोटी : प्रतिनिधी**

**इगतपुरी तालुक्यातील घोटी-त्र्यंबकेश्वर रस्त्याबाबत इगतपुरी तालुका कृती समितीतर्फे गेल्या एकवीस दिवसांपासून साखळी उपोषण सुरू असून, शुक्रवारी (दि. ५) पहिने येथे मोजणी सुरू असताना कृती समितीतर्फे मोजणी अधिकाऱ्यांना परत पाठवले. मात्र, पोलीस प्रशासनाने दबाव टाकत आंदोलकांना ताब्यात घेऊन उपोषणस्थळी परत सोडून दिले आहे.**

दरम्यान, शेतकरी कृती समितीतर्फे पोलीस प्रशासन व भूसंपादन अधिकाऱ्यांचा निषेध करण्यात आला. प्रशासनाने दंडुकेशाहीचा वापर केला तर वैतरणा धरणात जलसमाधी घेण्यात येईल, असा इशारा शेतकरी कृती समितीने दिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांनीदेखील प्रशासनाचा निषेध नोंदवत कुटुंबप्रमुखांच्या जीवाला काही झाले तर पोलीस प्रशासन व भूसंपादन अधिकारी जबाबदार राहतील, असा इशारा दिला आहे. विशेष म्हणजे घोटी-त्र्यंबकेश्वर परिसरात धरणामध्ये मोठ्या प्रमाणात जमिनी संपादित झाल्या असताना पुन्हा वाढीव रस्त्यात २२ मीटर दोन्ही बाजूंनी संपादन करून शेतकऱ्यांच्या रोजीरोटीवर पाय देण्याचे काम प्रशासन करत असल्याचा आरोप माजी आमदार काशीनाथ मेंगाळ यांनी केला आहे.

दरम्यान, पोलिसांना निवेदन देत वैतरणा धरणात जलसमाधी घेण्याचा इशारा दिला आहे. मोजणीला सुरुवात केली तर कृती समितीने थेट इशारा देत प्रशासनाला जबाबदार धरले आहे. यावेळी पोलीस प्रशासनाने माजी आमदार मेंगाळ यांच्यासह शेतकरी कृती समितीचे अध्यक्ष नागेश गायकर, राष्ट्रवादीचे प्रदेश चिटणीस उमेश खातळे, सचिव नागेश गायकर, कुंडलिक जमधडे, किसन गायकर, गणपत खकाळे, राजेंद्र गायकर, भरत बरकले, अक्षय भोर, विवेक कुटके, ज्ञानेश्वर महाले, अक्षय गायकर, नवनाथ कोठुळे, हरिभाऊ अंबपुरे, संतोष अंबपुरे, मयूर कमलाकर, भाऊराव दगळे, गणेश महाले, बाजीराव तांबे, गणेश वाजे आदींसह शेतकऱ्यांना ताब्यात घेतले होते. त्यानंतर त्यांना सोडून देण्यात आले.

# ज्ञानाच्या महासागरास स्काय लॅम्पची मानवंदना

## चांदवडच्या विद्यार्थ्यांची मुक्तिभूमीत अनोखी कलाकृती

**चांदवड : वार्ताहर**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून चांदवड येथील तरुण कलाकाराने 'ज्ञानाच्या अथांग महासागरास' एका वेगळ्या शैलीत मानवंदना दिली आहे.

श्री नेमिनाथ महाविद्यालयाचा विद्यार्थी आणि कवी असलेल्या किरण केदारे याने चक्क स्काय लॅम्पवर डॉ. बाबासाहेबांची प्रतिकृती साकारून मुक्तिभूमीच्या ऐतिहासिक प्रांगणातून अनोखे अभिवादन केले आहे.

तालुक्यातील भोयेगाव येथील रहिवासी आणि नेमिनाथ जैन महाविद्यालयात एम.ए. (इतिहास) या वर्गात शिक्षण घेणारा विद्यार्थी किरण केदारे याने आपल्या कुंचल्यातून ही किमया साधली आहे. किरण याने ॲक्रलिक रंगांचा वापर करत अडीच फुटांच्या स्काय लॅम्पवर अवघ्या साडेचार तासांच्या अथक परिश्रमाने डॉ. बाबासाहेबांची हुबेहूब आणि सुबक प्रतिकृती रेखाटली.



**शून्यातून विश्वाकडे एक रूपक.**

ही कलाकृती साकारण्यामागे आणि स्काय लॅम्प आकाशात सोडण्यामागे एक विचारपूर्वक रूपक मांडण्यात आले आहे. तयार केलेला हा स्काय लॅम्प मुक्तिभूमीच्या ऐतिहासिक भूमीतून आकाशाच्या दिशेने सोडण्यात आला. पेटत्या स्काय लॅम्पने ज्याप्रमाणे जमिनीवरून आकाशाच्या दिशेने झेप घेतली, अगदी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या युगंधराने अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत (धुळीत) जन्माला येऊनदेखील जगातील विद्वानांच्या मालिकेत आपल्या अफाट ज्ञानाच्या सामर्थ्यावर कधीही न विझणारे अढळ स्थान निर्माण केले.

# येवल्यात अल्पसंख्याकांसाठी तीन कोटींच्या कामांना मंजुरी

## मंत्री छगन भुजबळ यांचे विशेष प्रयत्न

**येवला : प्रतिनिधी**

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ व विधान परिषदेचे आमदार पंकज भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून येवला तालुक्यातील अल्पसंख्याक समुदायाच्या विकासासाठी तीन कोटी रुपयांची विविध विकासकामे मंजूर करण्यात आली आहेत. यामध्ये शादीखाना, संरक्षक भिंत तसेच कब्रस्तान अनुषंगिक कामांचा समावेश आहे.

मंत्री भुजबळ यांच्या प्रयत्नांतून येवला तालुक्यातील दोन कोटी त्यांच्या विविध विकासकामांना मंजुरी मिळाली आहे. तालुक्यातील पाटोदा येथे शादीखाना बांधण्यासाठी ५० लाख, ग्रामपंचायत रेंडाळे अंतर्गत न्याहारखेडे बुद्रुक शादीखाना बांधण्यासाठी २५ लाख, ग्रामपंचायत रहाडी येथे शादीखाना बांधण्यासाठी २५ लाख, रस्ते सुरेगाव येथे शादीखाना बांधण्यासाठी २० लाख, कौटखेडे येथे शादीखाना बांधण्यासाठी २० लाख, एरंडगाव बु. कब्रस्तानसाठी बैठक व्यवस्था करण्यासाठी १५ लाख, उंदीरवाडी येथे शादीखाना बांधण्यासाठी २० लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.

# नवे निरपूरला रस्त्याने घेतला मोकळा श्वास

## सामाजिक कार्यकर्ते महाजन यांनी स्वखर्चातून केली दुरुस्ती

**सटाणा : तालुका प्रतिनिधी**

तालुक्यातील नवे निरपूर येथील शिवपांदण रस्त्याची सामाजिक कार्यकर्ते सुनील महाजन यांनी स्वखर्चातून दुरुस्ती केली असून, रस्त्याने मोकळा श्वास घेतल्यामुळे शेतकऱ्यांतर्फे समाधान व्यक्त होत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जिल्हा परिषदेच्या निवडणुकीबाबत चर्चा होत असताना गटनिहाय आरक्षणाबाबत अद्याप चित्र स्पष्ट झालेले नाही. इच्छुक उमेदवारांमध्ये संभ्रम असून, काहींनी प्रचारफेरीसह निवडणूकपूर्व मोर्चेबांधणी बासनात गुंडाळण्याचे



चित्र आहे.

सद्य:स्थितीत सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मागण्या प्रलंबित राहत आहेत. बागलाण तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते सुनील महाजन यांना शेतकऱ्यांनी रस्त्याची समस्या सांगितल्यानंतर नवे निरपूर ते नवेगाव रस्त्यादरम्यान असलेल्या शिवपांदण रस्त्यांची स्वखर्चातून जेसीबीद्वारे काटेरी झुडपे हटविण्यासह दुरवस्था दूर केली. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे या भागातील ग्रामस्थांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. त्याचसोबत परिसरात परतीच्या पावसाने तालुक्यात दाणादाण उडवली होती. पिकांबरोबर पावसामुळे येण्या-जाण्यासाठी आवश्यक असणारे रस्ते पूर्णतः पाण्याखाली गेल्याने, शेतातून बाहेर पडण्यासाठी ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. परिसरातील शेतकरी यांनी एकत्र येत दीड ते दोन किलोमीटर रस्त्याची दुरवस्था व रस्त्याच्या आजूबाजूला असणारे काटेरी झुडपे काढण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सुनील महाजन यांच्याकडे रस्त्याबद्दल आपबीती मांडली. महाजन यांनी स्वखर्चातून रस्त्याची दुरुस्ती व काटेरी झुडपे काढण्याचा शब्द शेतकऱ्यांना दिला आणि दुसऱ्याच दिवशी या रस्त्याचे काम सुरू केले. यानंतर सदर रस्त्याने मोकळा श्वास घेतला असून, शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.



# 'झाडांसाठी आमचा आवाज, भविष्यासाठी आमची जबाबदारी'

**नाशिक : प्रतिनिधी**

श्री प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेली नाशिकनगरी आणि तपोवन ही भूमी प्राचीन काळापासून अत्यंत पवित्र मानली जाते. प्रभू रामांनी अनेक वर्षे तपोवनमध्ये वास्तव्य केले असल्याचा पुराणात उल्लेख आढळतो.

अशा या पवित्र स्थळावर कुंभमेळा २०२७ साठी साधुग्राम उभारण्याच्या तयारीदरम्यान सुमारे १७०० झाडांवर तोडणीची शक्यता व्यक्त केली जात आहे. पर्यावरण आणि जैवविविधतेच्या दृष्टीने हा गंभीर विषय असून, नागरिकांत चिंता व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर ग्लोबल व्हिजन स्कूल, अंबड, नाशिक येथील विद्यार्थ्यांनी प्रभावी पथनाट्य सादर करून ''ही १७०० झाडे वाचवा'' असा दमदार संदेश दिला. झाडे ही केवळ हिरवाईचे प्रतीक नसून, मानवाच्या जीवनासाठी आवश्यक असलेली 'फुफ्फुसे' आहेत, हे त्यांनी प्रभावी अभिनयातून मांडले. हे पथनाट्य शाळेतील एनसीसी कमांडोज विद्यार्थी यांनी सादर केले. अभिनय, घोषवाक्ये व प्रभावी संवादांच्या माध्यमातून या छोट्या सैनिकांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समाजासमोर अधोरेखित केले.

कार्यक्रमात ग्लोबल व्हिजन शाळेच्या संचालिका विजयालक्ष्मी मणेरीकर यांनी संत तुकाराम महाराजांचा ''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे'' हा अभंग उद्धृत करत वृक्षसंवर्धनाचे आध्यात्मिक आणि पर्यावरणीय महत्त्व स्पष्ट केले. ''वृक्ष हे आपले निसर्गस्नेही नातेवाईक आहेत, त्यांचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे,'' असे त्यांनी सांगितले. पथनाट्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी ठामपणे मांडले की, वृक्षतोड थांबवली गेली पाहिजे, कारण झाडे ही मानवी विकासासाठीच नव्हे तर मानवी अस्तित्वासाठी अत्यावश्यक आहेत. विद्यार्थ्यांचा हा आवाज प्रशासन आणि समाजमनाला नक्कीच स्पर्श करेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# शाळा बंद आंदोलनात शिक्षकांचा सहभाग

## लासलगावला मागण्यांबाबत मुख्याध्यापकांना निवेदन

**लासलगाव : वार्ताहर**

नाशिक जिल्हा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समितीच्या वतीने आयोजित एकदिवसीय शाळा बंद आंदोलनात लासलगावमधील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षक - शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या आंदोलनामध्ये सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दैनिक शालेय कामकाज न करता विविध मागण्यांचे निवेदन शाळेच्या मुख्याध्यापकांना दिले.


निवेदनात सर्व शिक्षकांसाठी असलेली टीईटी परीक्षेची अट रद्द करावी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अन्यायकारक संचमान्यता रद्द करावी, सर्व शिक्षकांना सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करावी, शिक्षकांची ऑनलाइन व शैक्षणिक कामे बंद करावी,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीची प्रक्रिया तत्काळ सुरू करावी, अशा प्रमुख १४ मागण्यांचा समावेश निवेदनात होता. याप्रसंगी शिक्षक नेते गणेश महाले व सतीश पवार यांनी मनोगत व्यक्त केले. शासनाने सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा, असे आवाहन केले. या शाळा बंद आंदोलनात लासलगावमधील श्री महावीर विद्यालय, जैन प्राथमिक शिक्षण मंदिर, जिजामाता कन्या विद्यालय, लोकनेते दत्ताजी पाटील विद्यालय, जिजामाता प्राथमिक शाळा, सरस्वती विद्यालय, नॅशनल उर्दू हायस्कूल, जि. प. प्राथमिक शाळा या सर्व शाळांतील शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.



# शिरवाडे वणीत शंभर कवी रंगवणार काव्यसंमेलन

## कुसुमाग्रजांच्या मूळ गावी रविवारी पहिले सातबारा साहित्य संमेलन

**दिक्षी : प्रतिनिधी**



कविवर्य कुसुमाग्रजांच्या मूळगावी शिरवाडे वणी येथे कवितेच्या सातबाऱ्यावर शेतीमातीचा शब्दमळा फुलविण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून मराठी भाषेवर प्रेम करणारे सुमारे शंभर कवी आपले स्थानिक सकस शब्दबियाणे घेऊन महाराष्ट्रातील या पहिल्याच अनोख्या अशा सातबारा संमेलनात आपला पीकपेरा नोंदविण्यासाठी येत आहेत. संकल्प बहुद्देशीय सेवाभावी संस्था नाशिक आयोजित महाराष्ट्रातील हे पहिले असे अनोखे सातबारा साहित्य संमेलन कवितेचे गाव समिती शिरवाडे वणी, ग्रामपंचायत शिरवाडे वणी व स्थानिक ग्रामस्थांच्या मोलाच्या सहकार्याने होत आहे, अशी माहिती सातबारा संमेलन-२०२५ चे आयोजक तथा संकल्प बहुद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष संजय आहेर, समन्वयक बाळासाहेब गिरी व पुस्तकांचे गाव समिती अध्यक्ष शरदराव काळे यांनी दिली.

ज्ञानपीठ पुरस्कारविजेते महाराष्ट्रभूमीचा व मराठी भाषेचा अभिमान असलेले कविवर्य कुसुमाग्रज तथा तात्यासाहेब शिरवाडकर यांच्या मूळ गावी आणि महाराष्ट्र शासनाने घोषित केलेल्या महाराष्ट्रातील पहिल्या कवितेच्या गावात अर्थात शिरवाडे वणी (ता. निफाड, जि. नाशिक) येथे रविवारी (दि. ७) हे संमेलन होत आहे.

कविवर्य कुसुमाग्रज स्मारक सभागृह शिरवाडे वणी येथे सकाळी दहा वाजता निफाड तालुक्याचे आमदार दिलीपराव बनकर यांच्या हस्ते उद्‌घाटन होणार आहे. प्रसिद्ध ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक विजयकुमार मिठे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. संमेलनाचे मुख्य आकर्षण आहेत ते म्हणजे महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध लोककवी प्रा. प्रशांतदादा मोरे हे या काव्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून दिवसभर उपस्थित राहणार आहेत.

संमेलनास प्रमुख अतिथी म्हणून पिंपळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती नानासाहेब पाटील शिरसाट, जिल्हा दूध संघाचे माजी चेअरमन शिवाजीराव ढेपले, कवितेचे गाव समिती अध्यक्ष शरदराव काळे, महसूल अधिकारी शीतल कुयटे, गायक संजय डेरे, सरपंच दिलीपराव खैरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात प्रथमच होत असलेल्या या अनोख्या शेतीमाती व ग्रामीण संस्कृतीवर आधारित संमेलनात राज्याच्या विविध भागातून सुमारे शंभर कवी विविध कविता सादर करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. शेती, माती, संस्कृती, शेतकरी याच्या समस्या वगैरे विषयांवर कवितेतून ऊहापोह कवी, कवयित्री करणार आहेत.

दिवसभर चालणारे हे संमेलन सकाळी दहा वाजता सुरू होईल, दुपारी भोजनासह चहा, नाष्टा वगैरे सर्व सुविधा आयोजकांनी योजल्या आहेत.

संपूर्ण दिवसभर यात वैचारिक कवितांचा आस्वाद घेण्यासाठी, कवितेच्या गावाला भेट देण्यासाठी, कुसुमाग्रजांची पायधूळ भाळी लावण्यासाठी, साहित्यिक आनंद घेण्यासाठी परिसरातील सर्व साहित्यिक, साहित्यप्रेमी, शेतकरी, शिक्षक, विद्यार्थी व नागरिकांनी सर्वांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन संकल्प संस्था अध्यक्ष विडंबनकार कवी संजय आहेर, समन्वयक गझलकार बाळासाहेब गिरी, उपसरपंच श्यामराव माळी, ग्रामविकास अधिकारी अनिल कदम, आयोजक मुकुंद ताकाटे, डॉ. चिदानंद फाळके, वैजयंती सिन्नरकर, सुभाष उमरकर, किरण मेतकर, शरद पवार आदींनी केले.

**संमेलनात विशेष पुरस्कारांचे वितरण**

संमेलनात पाच विशेष पुरस्कारदेखील दिले जाणार आहेत. त्यात जनार्दन बंगाळे, महसूल अधिकारी बुलढाणा यांना आदर्श मंडळ अधिकारी पुरस्कार, तलाठी अशोक चितळकर, श्रीरामपूर तहसील यांना आदर्श ग्राममहसूल अधिकारी पुरस्कार, सोमनाथ जगताप, निफाड तहसील नांदुर्डीचे कोतवाल यांना आदर्श महसूल सेवक पुरस्कार यांच्यासह चिंचखेड दिंडोरी येथील संजय नथू संधान यांना आदर्श शेतकरी पुरस्कार व आशा सुनील आगळे (देवपूर ता. निफाड) यांना आदर्श महिला शेतकरी पुरस्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिले जाणार आहेत.